बा॰ वा॰
८५१

भूगोलावरील साहसी प्रवासी

म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : बा.वा.
दा. क्र. ८५१

BVBK-0400951

५,

# भूगोलावरील साहसी प्रवासी

भाग पहिला

वि. आ. मोडक

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
दा. क्र. ९५१ दिनांक ......
विषय किशोर क्र. ४४८

संयुक्त साहित्य
लक्ष्मी रोड, पुणे २

BVBK-0400951

संयुक्त साहित्य

© वि. आ. मोडक, पुणे
प्रथमावृत्ती : इ. स. १९३१
द्वितीयावृत्ती : इ. स. १९३९
तृतीयावृत्ती : इ. स. १९६७ जुलै

मुखपृष्ठ :
दलाल आर्ट स्टुडिओ, मुंबई

आतील चित्रे :
स्टुडिओ सालकर, पुणे

प्रकाशक :
दामोदर दिनकर कुलकर्णी
संयुक्त साहित्य
३७९ नारायण पेठ,
पुणे २

मुद्रक :
वि. ग. माटे
विश्वकर्मा मुद्रणालय ( प्रा. ) लि.
४०९ नारायण पेठ, पुणे २

किंमत अडीच रुपये

## ...म निवेदन

थमावृत्तीसंबंधी निवेदन

**श्रीमती नाथीबाई दामोधर ठाकरसी महिला पाठशाळा**, पुणे, या ...थेतर्फे १९३० च्या दिवाळीच्या सुट्टीत भरलेल्या शिक्षकांच्या वर्गा... '**भूगोल विषयाचे अध्यापन**' याविषयी मी जी व्याख्याने दिली ... व्याख्यानांत मी असे प्रतिपादिले होते की, "द्वितीयावस्थेतील मुलांना ... भूगोल शिकवावयाचा तो धाडसी प्रवाशांनी केलेल्या प्रवासांच्या ...र्णनांच्या आधारे शिकविणे फलदायी आहे." त्याच वेळी मी असेही म्हटले होते की, "नव्या जगाचा शोध लावणाऱ्या सुप्रसिद्ध **कोलंबसा**पासून तो थेट **गौरी-शंकरावर** चाल करून जाणारे **आयर्व्हिन, मॅलरी, नॉर्टन** इत्यादी वीर आणि **अमेझॉन** नदीच्या दाट जंगलाची माहिती मिळविण्याकरिता गेलेले पितापुत्र **कर्नल फॉसेट**पर्यंत किती तरी नूतन देशशोधकांची अंगावर शहारे आणणारी, व कादंबरीतील आश्चर्यकारक ...र्णनांनासुद्धा फिकी पाडणारी, चित्तवेधक, तथापि खऱ्या भौगोलिक ...रिस्थितीची योग्य कल्पना आणून देणारी, प्रवासवर्णने आज उपलब्ध आहेत. **आपल्या मराठी भाषेमध्ये या पुस्तकांचा सध्या पूर्ण अभाव आहे ही गोष्ट खरी. पण त्यामुळे निराश होण्याचे कारण नाही. मराठीतून भूगोल शिकवावयाचा हे एकदा निश्चित झाले म्हणजे पुस्तकांच्या राशी बाहेर पडतील.**"

२. तेव्हापासून माझे मन माझ्या कानात पुन्हा पुन्हा असे विचारीत राही की आपल्या मराठी भाषेमध्ये अशा पुस्तकांचा जो पूर्ण अभाव आहे, तो नाहीसा करणे अशक्य आहे काय? त्याचप्रमाणे पुढेमागे या विषयावरील 'पुस्तकांच्या राशी बाहेर पडतील' अशी जी आशा मी प्रदर्शित केली, ती खरी करण्यास आपणच का सुरुवात करू

नयेस ? दुसरा प्रश्न सोडविला की पहिला प्रश्न आपोआप सुटणारा होत म्हणून दुसरा प्रश्नच या प्रस्तुत पुस्तकाच्या रूपाने मी सोडविला आहे. हा प्रश्न सोडविण्याची माझ्यावर नैतिक जवाबदारी होती. कारण 'भूगोल या विषयाचे अध्यापन' या विषयाचा व्याख्याता मीच होतो.

३. येथे प्रथमच हे सांगणे आवश्यक आहे की, प्रस्तुत पुस्तक हे द्वितीयावस्थेतील म्हणजे आताच्या ७, ८, व ९ या वर्गांतील विद्यार्थ्यांना वाचण्यास खरोखरच उपयोगी पडावे या हेतूने मी हे लिहिले आहे. आणि विशेषतः मराठी ट्रेनिंग कॉलेजातील होतकरू शिक्षकांना आणि जे शिक्षकाचा धंदा आज करीत असून ज्यांना या विषयावरील इंग्रजी भाषेतील पुस्तके वाचता येत नाहीत, यांना या पुस्तकाचा बराच उपयोग होईल अशीही आशा आहे.

४. या पुस्तकात केवळ भूगोलच आहे असे मात्र नाही. यात इतिहास, भूगोल, प्राचीन संस्कृती आणि चरित्रविषयक वाङ्मय या सर्वांची सांगड घालण्याचा मी यथायोग्य प्रयत्न केला आहे. ज्याप्रमाणे मूळ बखरीतून त्या काळचा इतिहास मुलांकडूनच रचून घेण्यात येतो ( आणि ही नवी पद्धती इतिहासाच्या अध्यापनात रूढ होऊ लागली आहे ) त्याचप्रमाणे प्रवाशाच्या प्रवासवर्णनावरून मुलांकडून भूगोलावरील प्रवास करवून घेण्यात यावा; आणि ही पद्धती भूगोलात रूढ व्हावी, अशी मनीषा आहे. तेव्हा याच दृष्टीने या पुस्तकाचे विशेष वाचन व्हावे एवढ येथे सूचित करून ठेवावेसे मला वाटते.

५. हे निवेदन पुरे करण्यापूर्वी 'समर्थ भारत' छापखान्याचे चालक माझे चिरपरिचित स्नेही श्री. **सदाशिव रामचंद्र सरदेसाई** यांनी मुद्रक या नात्यापेक्षा स्नेहाचे नाते लक्षात घेऊन हरप्रकारे मला मदत करून उपकृत करून ठेविल्यावद्दल मी त्यांचे अंतःकरणपूर्वक आभार मानतो. प्रुफे तपासण्याचे काम मी जवळ जवळ त्यांच्यावरच सोपविल्यासारखे केले

होते, आणि त्यांनी ते स्वत:चे समजूनच केले. या पुस्तकात जी चित्रे किंवा जे नकाशे घातले आहेत, त्यांचे ब्लॉक चित्रशाळेचे व्यवस्थापक **रा. रा. शंकर नरहर जोशी** यांनी त्यांच्याशी माझ्या 'भूगोलावरील काही विचित्र प्राणी' या पुस्तकामुळे जो स्नेहसंबंध जडला तो लक्षात घेऊन लवकर व सुरेख करून दिले आहेत, त्याबद्दल त्यांचाही मी आभारी आहे. त्याचप्रमाणे माझे व्यवसायबंधू आणि सन्माननीय परम स्नेही **प्रो. वा. म. जोशी** यांचे प्रोत्साहन तर मला नेहमीच मिळत असते, तेव्हा त्यांच्याबद्दल जेवढी कृतज्ञता व्यक्त करावी तेवढी थोडीच आहे. पुस्तकाच्या पुठ्ठ्यावरील जे दर्शनी चित्र आहे, त्याच्या रचने-संबंधी योग्य कल्पना दिल्याबद्दल माझे दुसरे व्यवसायबंधु व स्नेही **प्रि. ना. म. आठवले** यांचाही उल्लेख येथे मी आदरपूर्वक करीत आहे. असो. या सर्वांचे पुन्हा एकदा मन:पूर्वक आभार मानून हे 'प्रथम-निवेदन' पुरे करितो.

लेखक

गीताजयन्ति
शके १८५२

**वि. आ. मोडक,**
अनाथबालिकाश्रम, हिंगणे.

( **द्वितीयावृत्तीसंबंधी निवेदन** )

आठ वर्षांनी का होईना, पण ही द्वितीयावृत्ती काढण्याचा सुयोग मला लाभला याविषयी मला आनंद वाटत आहे. "विद्यार्थिवर्गात तुमची 'साहसी प्रवासी' ही पुस्तके प्रिय झाली आहेत" असे माझे परम स्नेही, प्राध्यापक व नूतन मराठी विद्यालयाचे सध्यांचे प्रधानाध्यापक श्रीयुत **नानासाहेब नारळकर** यांनी आणि इतर शिक्षकांनीही मला अनेक वेळा सांगितले आहे. तरी विद्यार्थिवर्गाचा मी ऋणी आहेच.

शिक्षक-वर्गाला या पुस्तकाचा किती उपयोग झाला, याचा अंदाज मात्र मला आलेला नाही, हे मी प्रांजलपणे प्रगट करू इच्छितो. खंडाचा भूगोल सुरू करण्यापूर्वी खंडाचा शोध कसा लागला, याची माहिती या पुस्तकाद्वारा दिल्याने ती विद्यार्थ्यांना अति आवडते, याचा अनुभव मी स्वत: अनेक वेळा घेतलेला आहे; आणि इतर शिक्षकांनी या मार्गाचा अवलंब केल्यास त्यांनाही असाच अनुभव येईल, अशी माझी खात्री आहे.

याही खेपेस माझे परमस्नेही 'समर्थ भारत' छापखान्याचे चालक श्रीयुत **सदाशिव रामचंद्र सरदेसाई** यांनी माझी नड लक्षात घेऊन, छपाईचे सर्व प्रकारचे काम अति त्वरेने पण सुरेख करून दिले आहे, याविषयी मी त्यांचे हार्दिक आभार मानतो.

**( तृतीयावृत्तीसंबंधी निवेदन )**

माझ्या साहसी प्रवासी, भाग १ व २ या पुस्तकांच्या पहिल्या आवृत्ती संपून वीस वर्षे होऊन गेली. तथापि, या पुस्तकांबद्दल बऱ्याच शाळांकडून व नागरिकांकडून मागणी मधूनमधून येत असते. पण भूगोलविषयक पाठ्यपुस्तकांच्या लेखनकार्यातच मी गुंतून गेलो होतो, म्हणून आणि इतर कारणांमुळेही, या पुस्तकाची तिसरी आवृत्ती काढण्याकडे माझे दुर्लक्षच झाले होते. आणि श्रीयुत मधुकरराव व किशाभाऊ कुलकर्णी, संयुक्त साहित्य याचे चालक, यांनी जर उचल खाली नसती, तर मी स्वत: तिसरी आवृत्ती काढण्यास कदाचित् उद्युक्तही झालो नसतो. तरी या तिसऱ्या आवृत्तीचे श्रेय साहजिकच श्रीयुत कुलकर्णी बंधूंनाच द्यावयास पाहिजे. आणि ते मी अत्यानंदाने देत आहे.

या साहसप्रिय प्रवाशांसंबंधी माझ्या मनात जो आदर वसत आहे तो मी पुढील कवितेत व्यक्त करीत आहे.

## वृत्त-शार्दूलविक्रीडित

ओलांडोनि अफाट सागर तसे होड्यातुनी सानुल्या
ते रात्रदिन पाहती गगन की तोडीत लाटा भल्या
झाले वीर कितीक आजवर ते ज्या शोधिले भूतला
खंडांच्या घन जंगलांत शिरुनी तेथील सिंधुस्थला ।। १

तैसे ते नरवीर झुंजति पदी वर्षानुवर्षे किती
थंडी वा हिमवात सोसुनि तसे धैर्ये हिमांच्या लती
मागे टाकुनि खोल खिंडि धवला गाठावया ते स्थिर
पृथ्वीचे ध्रुव, कष्ट कष्ट करती. होती अती आतुर ॥ २ ॥

एके उत्तर दिक् म्हणोनि दुसरा गाठी तथा दक्षिण
पेरी तोहि अमुंडसेन नमतो राष्ट्रध्वजा लावुन
लागोनी बहुशोध गोल ठरली पृथ्वीस मोजीयले
उत्तुंगा शिखरावरीहि चढुनी उत्तुंग की जाहले ।। ३ ।।

घेती श्रेयच तेनसिंग-हिलरी कीर्ती मिळे त्यास ती
तेथे ते पद ठेविती मिळुन की, दोघे तसे मानती.
आता शोध करावयास सजले चंद्रास गाठावया निघति जे
तेथोनी पुढती अनंत गगनी जातील झेपावया ।। ४ ।।

धन्य धन्य हे नरवीर ! त्यांना शतशः प्रणाम !

१५ ऑगस्ट; १९६७ — वि. आ. मोडक

## अनुक्रमणिका : पृष्ठ


१. भारतवर्षीय प्राचीन जलपर्यटन ९

२. पोलो बंधू आणि मार्को पोलो २३

३. नाविकांचा नेता राजपुत्र हेन्री ४०

४. क्रिस्तोफर कोलंबस ५५

५. वास्को-द-गामा ७४

६. फर्डिनंड मॅगेलन् ९४

१

# भारतवर्षीय प्राचीन जलपर्यटन

सूचना :—या प्रकरणामध्ये एखाद्या सुप्रसिद्ध प्रवाशाची माहिती किंवा त्याच्या प्रवासाचे वर्णन, असे दिलेले नाही. यात दिलेल्या माहितीवरून एखाद्या प्रदेशाचे विशेष भौगोलिक ज्ञान मिळेल असेही नाही. तथापि भारतवर्षीय प्राचीन नौकागमनाची काही तरी कल्पना यावी, याच हेतूने हे प्रकरण लिहिण्यात आले आहे. एक-दोन तुटक तुटक प्रवासवर्णनेही आहेत; नाही असे नाही.

आज जगातील प्रमुख प्रमुख आणि स्वतंत्र राष्ट्रांच्या अजस्र नौका मोठमोठ्या महासागरावरून रात्रंदिवस हजारो कोसांचा प्रवास सुखाने करीत आहेत. मात्र भारत हा देश ज्याप्रमाणे अनेक गोष्टींत आज मागे पडलेला आहे, त्याप्रमाणेच या गोष्टीतही तो बराच मागासलेला आहे; आणि ही गोष्ट भारतीय व्यापाऱ्यांच्या मनात सध्या शल्याप्रमाणे सलत आहे. भारतास समुद्रकिनारा नसताच, तर या गोष्टीचे फारसे वाईट वाटले नसते. पण पश्चिमेकडील कांडला बंदरापासून तो थेट कन्याकुमारी-पर्यंत आणि तेथून थेट पूर्वेकडील कलकत्त्यापर्यंत हजारो मैलांचा किनारा भारतास लाभलेला असूनही, या किनाऱ्या-किनाऱ्यानेसुद्धा जहाजातून चालणारा व्यापार आपल्या भारतीय लोकांच्या ताब्यात पूर्णपणे नसावा,


ही गोष्ट अति शोचनीय आणि लज्जास्पद अशी होती यांत शंका नाही. याला कारणे काय असतील ती असोत. तशी वस्तुस्थिती मात्र होती, ही गोष्ट खरी.

खरोखर भरतखंड म्हणजे प्राचीन काळी तरी एक अपूर्व खंड असेच समजले जात होते. उत्तरेस उंच उंच पर्वतांच्या धनुष्याकार वेष्टणामुळे आणि दक्षिणेस समुद्रवलयामुळे सर्व जगाशी फटकून वागण्याकरिताच निसर्गाने या खंडाची रचना केली होती की काय असे वाटते; आणि काही शतकांपर्यंत तरी ही गोष्ट खरी होती. कारण या विलगपणामुळेच आर्यसंस्कृती इतर संस्कृतीपेक्षा पुष्कळ दृष्टीने भिन्न अशी निर्माण झाली. पण प्रदेशाच्या सुपीकतेमुळे जसजशी या देशाची अनेक प्रकारे भरभराट होऊ लागली, तसतसा या तुटक पण समृद्ध भूभागाचा संबंध सभोवतालच्या बहुतेक सर्व देशांशी येऊ लागला. आर्य लोकांचा हिंदुधर्म जरी भारतातच तेवढा पसरून राहिला होता, तरी याच धर्मातून निर्माण झालेल्या बौद्ध धर्माने भरतखंडाच्या अभेद्य पर्वतांना भेदून, थंड व बर्फमय तिबेटात स्थायिक होऊन, तेथून चीन–जपानपर्यंत सर्व प्रदेश आक्रमिला. नव्हे, भारताच्या दक्षिणेस आणि पूर्वेस असलेला हिंदी महासागर ओलांडून सीलोन बेटापासून तो थेट ब्रह्मदेश, सयाम व कंबोडिआ येथपर्यंत येणाऱ्या प्रदेशात हा धर्म स्थिर होऊन राहिला आहे. धर्मप्रसारार्थ बुद्ध भिक्षूंनी जसा अनेक दूरदूरच्या प्रांतांतून संचार केला, तद्वत् व्यापारानिमित्त भारतीय वणिक्श्रेष्ठांनी ब्रह्मदेश, कंबोडिआ, मलाया, चीन, कोरिआ, जपान, यवद्वीप ( जावा ), सुमात्रा, बोर्निओ इत्यादी द्वीपकल्पे व द्वीपे या ठिकाणी जाऊन वसाहती स्थापिल्या होत्या; आणि पश्चिमेस अरबी समुद्र आणि इराणचे आखात ही ओलांडून आफ्रिकेचा पूर्व किनारा, अरबस्तान आणि इराण या ठिकाणी व्यापारी पेढ्या व वखारी मांडल्या होत्या.

याप्रमाणे भरतखंड हे अति प्राचीन काळी कित्येक म्हणजे जवळ जवळ तीस शतकांपर्यंत जुन्या जगाचे व्यापार आणि धर्म यांचे मुख्य केंद्र होऊन राहिले होते. पश्चिमेस कराची ते कन्याकुमारी आणि पूर्वेस कलकत्ता ते कन्याकुमारी या दोन्ही किनाऱ्यांवर अनेक बंदरे होती; आणि तेथून भारतवासीय साहसी लोक धर्म आणि व्यापार यांच्या प्रसारार्थ ज्याप्रमाणे पर्वतश्रेणी ओलांडून जात, तसेच ते महासागरही ओलांडून दूरदूरच्या प्रवासास जात. मात्र येथे एक गोष्ट अगदी प्रांजलपणे कबूल करणे प्राप्त आहे ती ही की, ज्याप्रमाणे पाश्चात्य प्रवाशांची किंवा चिनी प्रवाशांची वर्णने आज उपलब्ध आहेत, त्याप्रमाणे भारतवासीय प्रवाशांची वर्णने उपलब्ध नाहीत; ज्ञानकोशकारानी आपल्या ज्ञानकोश–प्रस्तावनाखंड पान ३०९ वर भारतीय जलपर्यटनासंबंधी पुढील विधान केले आहे, ते लक्षात ठेवण्यासारखे आहे : “ नौकायनासारख्या गोष्टी भारतीयांस अपरिचित होत्या असे नाही. भारतीयांनी मोठमोठ्या सफरी केल्या, क्षत्रियवर्गाने देशही जिंकले, त्यांच्या वसाहतींबरोबर ब्राह्मणही गेले व त्यांनी आपले धर्मशास्त्र, ज्योतिष यांच्या ज्ञानाचा फायदाही घेतला; पण, प्रवासवर्णने लिहून ठेवण्याची मात्र कोणी फारशी फिकीर केली नाही. ”

खरोखरच ही मोठी खेदाची गोष्ट होय. कारण कोणत्या प्रवाशांनी केव्हा, कोणत्या बंदरातून, कोणत्या मार्गाने, कोणत्या निरनिराळ्या द्वीपकल्पांचा आणि द्वीपांचा शोध लाविला, त्यांना प्रवासात कोणत्या हालअपेष्टा सोसाव्या लागल्या, प्रथमच जेव्हा त्यांनी परकीय प्रदेशांमध्ये प्रवेश केला, तेव्हा तेथील लोकांशी त्यांना कसे वागावे लागले, तेथील भौगोलिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक परिस्थिती कशी होती यांबद्दलचे सविस्तर वर्णन एखाद्या प्रवाशाच्या स्वतःच्या अनुभवावरून जर मिळाले असते, तर त्यात जास्त जिवंतपणा दिसला असता. तथापि,

या बाबतीत आपणांस अगदीच निराश होण्याचे कारण नाही. भारतवासीयांनी भरतखंडाच्या आसपास विखुरलेल्या द्वीपांचा आणि द्वीपकल्पांचा शोध लावून भौगोलिक ज्ञानात आणि मानवांच्या इतिहासात भर घातली, याबद्दलचा अप्रत्यक्ष पुरावा भरपूर आहे; आणि कार्यावरून कारणांचे अनुमान केले असताही हीच गोष्ट सिद्ध होते. भारतातील निरनिराळ्या भाषांतील प्राचीन वाङ्मय, चित्रकला, कोरीव काम, खोदकाम व जुन्या इमारती इत्यादी गोष्टी ज्या आज देशभर सर्वत्र पसरलेल्या आहेत त्यांवरून आणि ज्या ज्या द्वीपकल्पांत आणि बेटांत जाऊन भारतीय लोकांनी वसाहती केल्या त्या त्या स्थळांतीलही याच गोष्टींवरून भारतीय नौकागमनाबद्दल आणि पर्यटनांबद्दल पुष्कळच माहिती मिळालेली आहे. त्याचप्रमाणे चीन, अरबस्तान, इराण, सिलोन,



जावा बेटाच्या ( यवद्वीपाच्या ) मार्गावर

जावा, सुमात्रा व बोर्निओ इत्यादी ठिकाणांच्या वाङ्मयांत व शिलालेखात याबद्दल जे उल्लेख आले आहेत, त्यांवरूनही पुष्कळ पुरावे मिळाले आहेत. बंगालमधील कलकत्ता युनिव्हर्सिटीचे प्रो. राधाकुमुद मुकर्जी यांनी या विषयासंबंधी परिश्रमपूर्वक आणि पद्धतशीर अभ्यास करून एक शास्त्रशुद्ध आणि सुंदर असा प्रबंध प्रसिद्ध केला आहे. त्याचे नाव ‘ भारतीय नौकायन ’ ( Indian Shipping ) असे असून त्या पुस्तकात भारतवासीयांच्या समुद्रपर्यटनाबद्दल आणि समुद्रावरील व्यापाराबद्दल पुराव्यासहित साद्यंत ऊहापोह केलेला आहे. तरी ते पुस्तक प्रत्येक भारतवासीयाने पुढेमागे केव्हा तरी अवश्य वाचावे.


‘ युक्तिकल्पतरु ’ म्हणून भोज नरपतीने रचिलेला एक हस्तलिखित ग्रंथ कलकत्ता-संस्कृतपाठशाळेच्या ग्रंथालयात उपलब्ध असून त्या ग्रंथात रत्नपरीक्षा, शस्त्रपरीक्षा, हयगजपरीक्षा आणि इतर अनेकविध माहितीबरोबरच नौकारचनेविषयीही बरीच माहिती दिली आहे. प्रथम निरनिराळ्या आकारांच्या नौका, त्यांच्या बांधणीकरितां उपयोगात आणावयाचे लाकूड व इतर सामान यांचा ऊहापोह यात केलेला आहे. नौकांच्या लांबी, रुंदी आणि उंचीप्रमाणे किती तरी जाती आणि उपजाती असून लांबच्या प्रवासाकरिता विशेष प्रकारच्या नौका असाव्यात, असे यात प्रतिपादिले आहे. यांचे ‘ दीर्घा ’ आणि ‘ उन्नता ’ असे दोन मुख्य प्रकार असून त्यात ‘ दीर्घिका ’, ‘ गत्वरा ’, ‘ जंघाला ’ आणि ‘ वेगिनी ’ या पहिल्या प्रकारापैकी आणि ‘ ऊर्ध्वा ’ व ‘ स्वर्णमुखी ’ या दुसऱ्या प्रकारापैकी नौका उत्तम फलदायी आणि भाग्य प्रसवणाऱ्या समजल्या जात असत. याच ग्रंथात या नौकांना रंग देऊन त्यांवर आकृति कोरून, सोन्यामोत्यांच्या माळा घालून सुशोभित कसे करावे, प्रवाशांच्या सुखसोयी कशा पाहाव्यात, इत्यादी गोष्टींचे विस्तृत आणि पद्धतशीर विवेचन केलेले आहे. या नौकांवर मंदिरे ( Cabins )

कोठे बांधिली असता, कोणता फायदा किंवा तोटा होतो, राजांच्या जलक्रीडेकरिता नौका कशा असाव्यात, जलयुद्धाकरिता कशा असाव्यात, लांबच्या प्रवासाकरिता कशा असाव्यात, इत्यादी अनेक गोष्टींबद्दल यात त्या वेळची मते संकलित केलेली आहेत. राजर्षी तुग्र याने आपला पुत्र भुज्यु याला ' अग्रमंदिरा ' म्हणजे ज्या नौकेवरील मंदिर अग्रभागी आहे अशा – नौकेतून दूरच्या द्वीपावर राहणाऱ्या शत्रूवर स्वारी करण्याकरिता पाठविले होते. ही नौका पुढे वादळात सापडून खडकावर आपटल्यामुळे तिचा नाश झाला. त्या नौकेवरील सर्व नाविकांना जलसमाधीच मिळावयाची, परंतु अश्विनीबंधूंनी आपल्या शंभर वल्ह्यांच्या गलबताच्या साहाय्याने त्यांचे रक्षण केले. पांडवांनीही विदुराच्या मदतीने अशाच प्रकारच्या नौकेतून प्रयाण केल्यामुळे लाक्षागृहाच्या संकटातून ते निभावले. रामायणात ज्या कैवर्त लोकांचे साहाय्य श्रीरामचंद्रास मिळाले त्या कैवर्तांनी अशाच प्रकारच्या पाचशे नावांचे आरमार तयार करून शत्रूला थोपवून धरण्याचे कार्य केले आहे. हे सर्व प्रसंग पुरातन काळातील होत.

पाली वाङ्मयातसुद्धा जलपर्यटनासंबंधी पुष्कळच उल्लेख आलेले आहेत. बंगालचा राजा सिंहबाहु याने आपला पुत्र विजय यास आणि त्याच्या सातशे अनुयायांस त्यांच्या बायका, मुलेमाणसे यांसह जेव्हा हद्दपार केले, तेव्हा साहसी राजपुत्र विजय हा आपल्या अनुयायांना त्यांच्या मुलांमाणसांसह बरोबर घेऊन एका प्रशस्त गलबतात बसून जलपर्यटन करीत करीत प्रथम भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर दाखल झाला. तेथील अनेक बंदरांत त्याच्या मनाजोगा आश्रय न मिळाल्यामुळे त्याने आपले गलबत दक्षिण महासागरात लोटले. ते गलबत सीलोनच्या दक्षिण किनाऱ्यास लागल्यानंतर तेथे ते सर्व उतरले. तेव्हा तेथील राक्षशिणींनी त्यांना मोहिनीमंत्रांनी भारून टाकिले. परंतु राजपुत्र विजय

यास स्वप्नात दृष्टान्त झाल्यामुळे त्याने एका जादूने भारलेल्या घोड्यावर बसून तेथून आपली सुटका करून घेतली. नंतर त्याने एक नवे सैन्य जमविले आणि प्रत्येक सैनिकाला त्याने मंत्र दिला; या सैन्याच्या मदतीने राक्षसलोकांचा संपूर्ण मोड केल्यावर त्याने सीलोन बेटातच आपले राज्य स्थापिले. सीलोन किंवा सिंहलद्वीप हे या राजपुत्रानेच दिलेले नाव होय. हा सर्व कथाभाग पालीमधील ' महावंसो ' या ग्रंथात दिलेला आहे.

इ. स. च्या सहाव्या आणि सातव्या शतकांच्या सुमारास शक लोकांनी ज्या वेळी गुजराथ प्रांत जिंकून घेतला, तेव्हा तेथील राजपुत्र आपल्या देशाचा त्याग करून काही विश्वासू अनुयायांना बरोबर घेऊन समुद्रपर्यटनाला निघाला. ज्या नौकेत बसून हे लोक निघाले, त्या नौकेची वेगवेगळी पण क्रमवार दृश्ये जावा बेटातील



जावा बेटावर वसाहत करण्याकरिता निघालेली नौका

चीरभद्र (ओरोबुडुर) देवळातील एका भिंतीवर कोरलेली आहेत. ती इतकी सुबक आणि उठावदार रीतीने कोरण्यात आलेली आहेत की, त्याबद्दल मि. हावेल (Mr. Havell) या पाश्चात्य शिल्पकाराने भरपूर प्रशंसोद्गार काढिले आहेत. तो म्हणतो, "ही दृश्ये म्हणजे एक चालत्या गोंडस नौकेचा अत्यंत सुबक आणि डौलदार असा प्रमाणबद्ध नमुना होय. या नौकेच्या दृश्यांच्या साहाय्याने गुजराथच्या राजपुत्राला आणि त्याच्या अनुयायांना भारताचा किनारा सोडल्यापासून जावा बेटाला त्यांची नौका येऊन लागेपर्यंत त्यांना कोणकोणत्या आपत्ती सोसाव्या लागल्या, त्यांना कोणकोणत्या वादळासारख्या कठीण प्रसंगांतून जावे लागले, याचा साद्यंत आणि विश्वसनीय असा इतिहासच कोरून ठेविला आहे. जावा बेटाला ही नौका लागल्यानंतर त्यांना जो काही अत्यानंद झालेला आहे, त्याचेही दृश्य शेवटच्या चित्रात दाखविले आहे. सर्व नावाडी आनंदाने जयघोष करीत आहेत; शिडे लगबगीने उतरविण्यात येऊन नांगर खाली टाकण्यात येत आहे असा तो देखावा आहे." याच राजपुत्राने हिंदू लोकांची वसाहत जावा बेटात स्थापिली.

या नौकांच्या बांधणीसंबंधी निकोलो काँटी याने दिलेले पुढील वर्णन लक्षात ठेवण्यासारखे आहे : "हिंदुस्थानातील लोक काही काही नौका आमच्या नावांपेक्षा मोठ्या आकाराच्या बांधतात. नौकेवर दोन हजार पिपे राहतील इतकी ती मोठी असते. हिला पाच शिडे व पाच डोलकाठ्या असतात. खालचा भाग तिहेरी फळ्यांचा केलेला असतो आणि यामुळे मोठमोठ्या वादळांशी त्यांना टक्कर देता येते. काही नौकांची बांधणी अशा खुबीने केलेली असते की, नौकेचा एक भाग जरी वादळामुळे चुरडला गेला, तरी राहिलेल्या भागाचा संपूर्ण नौकेप्रमाणेच उपयोग होतो."

संस्कृत भाषेचा ज्याने आजन्म अभ्यास केला, त्या पाश्चात्य बुल्हर पंडिताने हिंदू लोकांनी हिंदी महासागराचा आंतरराष्ट्रीय व्यापारानिमित्त

दळणवळणाचा मार्ग म्हणून भरपूर उपयोग करून घेतला आहे, असे आपले स्पष्ट मत दिले आहे. ऋग्वेदामध्ये तुग्र राजर्षि आणि त्याचा मुलगा भुज्यु यांनी केलेल्या एका द्वीपावरील स्वारीचा उल्लेख आहे, हे आपण पाहिलेच आहे. रामायणात सीतेच्या शोधार्थ लंका, चीन, जावा, सुमात्रा, तांबडा समुद्र यांचा निर्देश करण्यात आला आहे. महाभारतात सहदेवाने समुद्रातील अनेक द्वीपे जिंकल्याचा उल्लेख आहे. धर्मसूत्रे आणि स्मृति या ग्रंथांतून व्यापारी, त्यांची गलबते आणि समुद्रावरील व्यापार याबद्दल आणि संहितांमधून चंद्र आणि नौकाधिपतीचे भाग्य यांसंबंधीचे उल्लेख आलेले आहेत. तसेच काव्ये, महाकाव्ये, नाटके, कथा यांमधून जलपर्यटनाच्या अनेक मनोरंजक गोष्टी दिलेल्या आहेत. हे जलपर्यटन केवळ किनाऱ्या-किनाऱ्यानेच होत होते, असे नसून समुद्राच्या मध्यभागातूनही ते केले जात होते. हे जलपर्यटन कित्येक प्रसंगी सहासहा महिनेही करावे लागत असे. किनारा जवळ आहे की दूर आहे हे कळावे म्हणून या नाविकांची एक युक्ती असे. हे नाविक आपल्याबरोबर काही दूरवर उडू शकणारे पक्षी नेत. या पक्ष्यांना मोकळे सोडल्यानंतर ते सभोवती आकाशातून प्रदेशाचे निरीक्षण करीत; जवळपास जमीन असल्यास त्या दिशेने उडून जात; मात्र जमीन जवळ नसल्यास परत नौकेवर येऊन बसत.

ज्याप्रमाणे संस्कृत भाषेचा अभ्यास पंडित बुल्हरने केला, त्याचप्रमाणे पाली वाङ्मयाचा अभ्यास पंडित रीस डेव्हिडज् याने केला आहे. त्याने भारतीय जलपर्यटनाबद्दल पुढील मत नमूद करून ठेविले आहे. तो म्हणतो, " भारतीयांच्या नौका तांदूळ, चंदन आणि मोर इत्यादी व्यापारी माल बरोबर घेऊन अरबी समुद्र ओलांडून थेट बॅबिलोन देशास जात. हा व्यापार इ. स. पूर्वी सहाव्या शतकातच बॅबिलोन आणि भारत यांमध्ये चालू असावा. "

पाश्चात्य राष्ट्रांशी भारताचा समुद्रावरून चालणारा व्यापार फार प्राचीन काळापासून सुरू होता, असे इतर बऱ्याच पंडितांचेही मत आहे. ग्रीस देशातील थीब्ज् येथील दीर-एल्-बहारी देवळात कोरलेल्या चित्रांवरून भारतातील बरेच प्राणी, सोने, चंदन, रत्ने इत्यादी वस्तू तेथे जात होत्या असे दिसते. ख्रिस्ती लोकांचे धर्मपुस्तक बायबल यातही हस्तिदंत, कापड, चिलखत, मसाल्याचे निरनिराळे पदार्थ, मोर, सोने, रत्ने, शिसवीचे लाकूड आणि सुगंधी द्रव्ये इत्यादी पदार्थ पूर्वेकडून अरबस्तान, पॅलेस्टाइन, सिरिआ इत्यादी देशांस जात, असा संदर्भ आलेला आहे. यावरून हा व्यापार इ. स. पूर्वी चौदाव्या शतकापासून सुरू असावा असे अनुमान निघते.

इ. स. पूर्वी चवथ्या शतकात मौर्य घराण्याची सत्ता ज्या वेळी भारतात प्रस्थापित झाली त्या वेळी जलमार्गाने म्हणजे नद्यांच्या खोल आणि विशाल पात्रांवरून आणि समुद्रावरून चालणारा व्यापार आणि नौका बांधण्याचा धंदा या गोष्टी अतिशयच उत्तम स्थितीमध्ये होत्या, असे ग्रीक लेखकांच्या वर्णनावरून दिसते. ह्या नौका हिमालयात वाढणाऱ्या देवदार, चिनार, सुरू आणि इतर वृक्षांच्या तक्त्यांच्या बांधण्यात येत होत्या. नावा बांधण्याचा सर्व मक्ता सरकारच आपल्या शिरावर घेत असे; म्हणजे हा एक खरोखर राष्ट्रीय धंदाच समजला जाई आणि त्याची जबाबदारी सरकारवर असे. प्रसिद्ध सम्राट् चंद्रगुप्त याच्या वेळी तर एक स्वतंत्र नौकामंडळच स्थापण्यात आले होते. 'कौटिल्याचे अर्थशास्त्र' या ग्रंथामध्ये दोन हजार वर्षांपूर्वीच्या या नौकादलमंडळाची रचना कशी होती हे दिलेले आहे. या मंडळाच्या मुख्याला 'नावध्यक्ष' ही संज्ञा दिली होती. चंद्रगुप्ताच्या कारकीर्दीत भरतखंडाचे दर्शन घेण्याकरिता अनेक दूरदूरच्या देशांतील लोकांचे थवे नेहमी येत. सम्राट् चंद्रगुप्ताचा नातू अशोक याच्या कारकीर्दीत

तर सीरिआ, ईजिप्त, मॅसिडोनिआ इत्यादी राष्ट्रांशी होणारा व्यापार अखंडित व अबाधितपणे चालला होता. आणि आश्चर्याची गोष्ट अशी की, या निरनिराळ्या राष्ट्रांतील व्यापारी लोक आर्यभूमीत एकत्र आल्याकारणाने त्यांच्यामध्ये अशोकाच्या प्रोत्साहनामुळे विश्वबंधुत्वाची उदात्त कल्पना उत्पन्न झाली होती. राजकारण, धर्म आणि व्यापार या तिन्ही गोष्टींची सांगड याप्रमाणे त्या वेळी पडली होती. एकाच धर्मसूत्राने बद्ध झाल्यामुळे भरतखंडातील राजाची आज्ञा नाग ( चिनी ) याचे लोक पाळीत आणि चीन व भरखंड यांमधील व्यापार सुरळीत चाले. भारतीय धार्मिक संस्कृतीचाच हा सुपरिणाम नव्हे काय?

चंद्रगुप्त आणि अशोक राजानंतर उत्तर हिंदुस्थानात कनिष्क राजघराण्याची सत्ता चालू झाली आणि दक्षिणेत आंध्र घराणे प्रबल झाले. या राजांच्या कारकीर्दीतही परराष्ट्रांशी चालणाऱ्या व्यापाराची भरभराटच होती. दक्षिण भारतातील प्राचीन इतिहास ज्याने अभ्यासला आहे आणि ज्याचे मत प्रमाण समजण्यात येते, तो आर. सीवेल (R. Sewell) म्हणतो, "आंध्र राजघराण्याची कारकीर्द म्हणजे दक्षिण भारतातील एक अत्यंत उत्कर्षाचा कालच होय. या कालावधीत खुष्कीच्या मार्गाने आणि जलमार्गानेही अतिशय मोठ्या प्रमाणात व्यापार चालत असे. हा व्यापारी संबंध पश्चिमेकडे पश्चिम आशिया, ग्रीस, रोम, ईजिप्त इत्यादी राष्ट्रांशी येत असून पूर्वेकडे चीन, जपान आणि मलाया द्वीपकल्पाच्या दक्षिणेकडील सर्व बेटे यांच्याशी येत असे."

'दि पेरिप्लस ऑफ दि एरिथ्रिअन् सी' ( The Periplus of the Erythraean Sea ) या नावाचा जो लॅटिन ग्रंथ आहे तो फारच महत्त्वाचा समजला जातो. त्याचप्रमाणे टॉलेमीचा भूगोल ( Ptolemy's Geography ) हाही ग्रंथ विद्वन्मान्य असा आहे. या दोन्ही ग्रंथांत भारतासंबंधी पुष्कळ उल्लेख आहेत. यांपैकी पहिला ग्रंथ म्हणजे एका

अनुभवशीर नाविकाने तयार केलेला जलमार्गप्रदीपच होय. हा ग्रंथ इ. स. १०० या वर्षी लिहिण्यात आला. या नाविकाने तांबडा समुद्र, इराणचे आखात, भारताचा पूर्व आणि पश्चिम किनारा एवढ्या भागातून प्रत्यक्ष प्रवास केला. नंतर काही दिवस तो भडोच शहरी येऊन राहिला. भडोच बंदर हे त्या वेळी व्यापाराबद्दल नावाजलेले होते. याच पुस्तकात भारतीय जहाजे ज्या मार्गाने सीलोनपासून मलबारच्या किनाऱ्याने ईजिप्त-पर्यंत प्रवास करीत, तो मार्ग दिला असून, हे सर्व जलपर्यटन मोसमी वाऱ्यांच्या मदतीनेच केले जात होते, असे त्यात म्हटले आहे.

या काळात हा जो आंतरराष्ट्रीय व्यापार चालला होता तो केवळ पाश्चात्य राष्ट्रांबरोबरच चाललेला नव्हता. भरतखंडाची व्यापारी भरभराट अद्याप शुद्धपक्षातील चंद्रकलेप्रमाणे वाढतच होती. हिंदी महासागराच्या पश्चिम भागाप्रमाणेच पूर्व भागावरूनही व्यापार जोमात चालू होता. बंगाल आणि सीलोन, मद्रास आणि ब्रह्मदेश, यांची देवघेव अखंड सुरू होती. राजा हर्षवर्धन याच्या कारकीर्दीत हा व्यापार जास्त जोरात सुरू झाला. प्राचीन भारताचा प्रसिद्ध इतिहासकार व्हिन्सेंट स्मिथ आपल्या ग्रंथात म्हणतो, "कारोमांडल किनाऱ्यावरील बंदरांचा व्यापार केवळ किनाऱ्या-किनाऱ्यानेच चालू होता असे नव्हे, तर येथील व्यापाऱ्यांची गलबते बंगालचा उपसागर बेलाशक ओलांडून गंगेच्या व इरावतीच्या मुखांपर्यंत जात. तसेच ही गलबते मलाया द्वीपकल्पाच्या दक्षिणेस असलेल्या बेटांकडेही जात येत. तामील, तेलगू आणि कलिंग इत्यादी पूर्वेकडील प्रांतांतील नाविक सिलोन, जावा, सुमात्रा, मलाया इत्यादी बेटांशी व्यापार करण्यात मोठे कुशल होते. यांच्या जलपर्यटनासंबंधी यांच्या वाङ्मयात पुष्कळच काव्ये आहेत. बंगाली लोकांनी मार्ताबान आखाताच्या किनाऱ्यावर वसाहती स्थापिल्या होत्या. कलिंग प्रांतातील पुष्कळ व्यापारी लोक मोलुक्का आणि सिंगापूर

येथे जाऊन स्थायिक होऊन राहिले होते. याच कलिंग प्रांतातून इ. स. च्या ६५ व्या वर्षी काही नावाड्यांनी नेहमीप्रमाणे बंगालच्या उपसागरात पर्यटन करण्याऐवजी मोठ्या धैर्याने दक्षिणेकडे प्रयाण केले. काही दिवस दैवावर भरवसा ठेवून जलपर्यटन केल्यावर त्यांचे गलबत एके दिवशी जावा बेटात येऊन पोहोचले. तेथे या धाडसी खलाशांनी वसाहत स्थापिली. तेथे हळूहळू नगरे व उपनगरे निर्माण झाली आणि मायभूमीशी त्यांचा व्यापार सुरू झाला. पुढे कित्येक शतके या बेटात हिंदु लोकांचेच प्राबल्य होते. तेथे अद्याप आढळणाऱ्या अनेक देवळांवरून आणि चिनी प्रवाशांच्या वर्णनावरून याला भरपूर पुरावा मिळण्यासारखा आहे.”

वरील सर्व माहितीवरून अति प्राचीन काळापासून तो मध्ययुगीन काळापर्यंत तरी भारतातील लोक नौकायन-शास्त्रात निपुण होते, त्यांच्या अंगी साहस भरपूर होते, ते नवे नवे प्रांत शोधून काढीत, तेथे वसाहती स्थापीत, तेथून मायभूमीशी व्यापार चालवीत आणि भौगोलिक ज्ञानात भर घालीत, असे साधार दिसून येते. पाश्चात्य राष्ट्रांशी ज्या पदार्थांचा व्यापार हे करीत, ते पदार्थ भारताप्रमाणेच भारताच्या पूर्वेस असलेल्या अनेक द्वीपकल्पांत आणि द्वीपसमूहांत उत्पन्न होत होते. चवदाव्या शतकानंतर मात्र हा व्यापार पाश्चिमात्य लोकांच्या हाती हळूहळू जाऊ लागला. आणि त्या शतकापासून भारतीय व्यापारास जी ओहोटी लागली, ती इतकी की, आज भारताच्या किनाऱ्या-किनाऱ्याने चालणारा व्यापारसुद्धा भारतीय गलबतातून पूर्णपणे चालत नाही. मंडलाकार परिषदेपुढे व विलायतेत भारतीय व्यापाऱ्यांनी मांडलेला हा एक अत्यंत महत्त्वाचा प्रश्न होता. तो प्रश्न सहानुभूतीने सोडवावा, म्हणून त्या वेळी बरीच खटपट झाली; पण यश आले नाही. याविषयी पुन्हा प्रयत्न

करण्याकरिता म्हणून इ. स. १९३१ साली शेठ वालचंद हिराचंद हे विलायतेस जाऊन आले खरे, पण याही खेपेस त्यांना हात हालवीतच परत यावे लागले. कारण पाश्चात्यांची स्वार्थी वृत्ती आड आली. तथापि, हा प्रश्न यशस्वीरीत्या सुटण्यावरच भारतीय नौकायनाची भावी वाढ सर्वस्वी अवलंबून होती, म्हणून या गोष्टीकडे इ. स. १९४१ झाली **सिंदिया आगबोट कंपनीने** जास्त लक्ष घालून 'विशाखापट्टन' या भारताच्या पूर्वेकडील बंदरात गलबते बांधण्याचा कारखाना धडाडीने सुरू केला. आणि पुढे स्वातंत्र्यप्राप्तीनंतर तर भारत सरकारने या कारखान्याचे राष्ट्रीय महत्त्व लक्षात घेऊन इ. स. १९५२ साली तो सिंदिया कंपनीकडून विकत घेतला. आता तेथे केवळ किनाऱ्याकिनाऱ्याने जाणारी गलबतेच नव्हे, तर महासागरावरून सफरी करणाऱ्या मोठमोठ्या बोटीसुद्धा बांधण्यात येत आहेत आणि दरवर्षी या कारखान्यात जास्त जास्त प्रगती होत आहे. स्वातंत्र्याचे हे सुंदर फळच नव्हे काय?

# २

## पोलो-बंधू आणि मार्को पोलो

आपला भारत हा देश जसा अति समृद्ध, संपन्न आणि सुसंस्कृत म्हणून एका काळी नावाजलेला होता, तसाच पूर्वेकडील चीन देशही सुपीक, सुसंपन्न आणि सुधारलेला म्हणून प्राचीन काळी फार प्रख्यात होता. भारतात गंगा-यमुना, सिंधु-ब्रह्मपुत्रा, तापी-नर्मदा, कृष्णा-गोदावरी, कावेरी-तुंगभद्रा, इत्यादी नद्यांमुळे जसा बहुतेक प्रदेश शेतकीप्रधान झाला, तसाच चीन देशही हो ऑंग-हो, यांगत्से-कि-आंग, कंतान आणि यांना मिळणाऱ्या अनेक लहानमोठ्या नद्यांमुळे शेतकी-प्रधान झाला. भारताप्रमाणेच चीन देशातही मोसमी वाऱ्यामुळेच पाऊस पडत असून, चीन देशातील हवाही भारतात उत्पन्न होणाऱ्या निरनिराळ्या पिकांना मानवणाऱ्या हवेप्रमाणेच असल्यामुळे तेथेही बहुतेक भारतात होणारी पिकेच पिकतात. भारताप्रमाणेच चीन देशातही अनेकविध आणि अफाट असे स्वाभाविक भूप्रदेश आहेत. क्षेत्रफळाने चीन देश भारतापेक्षाही मोठा आहे. म्हणून चीन देशातील लोकसंख्या भारतातील लोकसंख्येपेक्षा जास्त आहे. आणखीही एका गोष्टीत भारत आणि चीन यांचे साम्य आहे. भारतावर भारताबाहेरच्या वैराण देशातील (तुर्की, अफगाणी, मंगोलियन इ. ) लोकांनी ज्याप्रमाणे अनेक टोळधाडी

घातल्या, त्याप्रमाणेच चीन देशावरही याच लोकांनी वेळोवेळी टोळधाडी घातलेल्या आहेत. भारताभोवती हाला पर्वतापासून तो थेट आराकान पर्वतापर्यंत जो स्वाभाविक, कंसाकार आणि प्रचंड असा तट आहे त्यामुळे काही दिवस भारताचे रक्षण झाले खरे. पण पुढे हा अभेद्य वाटणारा तटही ओलांडून येऊन परकीयांनी आपले राज्य येथे स्थापिलेच. चीन देशास स्वाभाविक तट नसल्यामुळे, चिनी लोकांनी आपल्या देशाचे शत्रूपासून रक्षण करण्याकरिता पश्चिम भागी एका पर्वतापासून दुसऱ्या पर्वतापर्यंत जगाला थक्क करून सोडवणारी, १५०० मैल लांबीची अजस्र भिंत बांधली. तथापि, या भिंतीलाही न जुमानता मध्य आशियातील तार्तर लोकांनी चीन देशात आपले राज्य प्रस्थापिलेच. परकीयांचे राज्य असूनही १३ व्या शतकात चीन आणि भारत ही दोन राष्ट्रे आशियाखंडात मोठी वैभवसंपन्न होऊन राहिली होती.

याच वेळी युरोप खंडात भूमध्यसमुद्राच्या आड्रिॲटिक शाखेच्या काठी असलेले इटली देशाचे मुख्य बंदर जे व्हेनिस शहर, त्याला एक निराळेच वैभव प्राप्त झाले होते. ते शहर, या वेळी सर्व पाश्चात्य राष्ट्रांचे व्यापारी केंद्र झाले असल्यामुळे लोक त्या नगरीला ‘ लक्ष्मीचे निवासस्थान ’ मानीत. त्याचप्रमाणेच आशिया आणि युरोप या दोन्ही खंडांच्या किनाऱ्यावर वसलेली प्रसिद्ध शहरे म्हणजे कॉन्स्टँटिनोपल आणि स्मर्ना या मुख्य बंदरांतून भारतात आणि चीन देशात उत्पन्न होणारा माल अरबी लोकांच्या द्वारे पाश्चात्य राष्ट्रांकडे जाऊ लागला होता. हरतऱ्हेच्या मालाबरोबर या देशातील विद्या आणि ज्ञान यांचाही प्रसार पश्चिमेकडे होत होता. हे व्यापारी लोक आपल्या मालाची स्तुती जशी अवास्तव करीत, त्याचप्रमाणे ते चीन व भारत या देशांसंबंधी नाना प्रकारच्या आश्चर्यकारक गोष्टीही आपल्या गिऱ्हाइकांशी बोलता बोलता सांगत. भारत आणि चीन हे देश म्हणजे अमूल्य रत्ने आणि विपुल सोने यांची आगरेच

असून, रत्नखचित जरतारी कापड आणि रेशमी तलम सुताची वस्त्रे यांची ही माहेरघरेच होत, अशी समजूत त्यांनी पाश्चात्यांची करून दिली होती; आणि पुष्कळ अंशी ती खरीही होती.

व्हेनिस नगरीत युरोप खंडातील प्रमुख प्रमुख आणि धनिक वणिक्‌श्रेष्ठ राहत असत. अत्यंत मौल्यवान् आणि भारी किमतीच्या मालाची देवघेव तर हे करीत असतच. शिवाय या कामी आपली अगणित संपत्ती गुंतवून ते जसे एक प्रकारचे साहस करीत, तसेच अज्ञात खंडातील लांब लांबचे प्रवासही रात्रंदिवस हाल सोसून, स्वतःचा जीव धोक्यात घालून करण्यास हे धजत; आणि "साहसे श्रीः प्रतिवसति।" या सुप्रसिद्ध सिद्धांताचा अवलंब अक्षरशः करून त्यातील सत्यही ज्ञात जगाला पटवून देत. अशा वणिक्‌श्रेष्ठांमध्ये अत्यंत श्रेष्ठ आणि सुप्रसिद्ध असे मॅफिओ पोलो आणि निकोलो पोलो नावाचे साहसी पुरुष होऊन गेले. निकोलो पोलोचा



मार्को पोलो

मुलगा मार्को पोलो याने तर बापचुलत्यांची परंपरा चालवून साहसी प्रवाशांमध्ये आपले नाव अजरामर करून ठेविले आहे. व्हेनिसपासून चीनच्या पूर्व किनाऱ्यापर्यंतचा सर्व, म्हणजे एक ओसाड तरी, किंवा वर्फाच्छादित तरी असा प्रदेश ओलांडून जाणारा आणि त्या प्रदेशाचे मनोवेधक वर्णन अगदी बिनचूक लिहून ठेवणारा हाच पहिला प्रवासी होय.

हा प्रदेश ठिकठिकाणी वैराण, रेताड, ओसाड असा असल्यामुळे जसा रखरखीत आहे. तसाच तो पुष्कळ ठिकाणी पर्वतमय आणि हिमाच्छादित असा असल्यामुळे अति थंडहि आहे. या प्रदेशातून जी काही सुपीक खोरी मधून मधून विखुरलेली आहेत, त्यांतच शेळ्या, मेंढया, घोडी, उंट, अशा मनुष्योपयोगी प्राण्यांना घेऊन, कधी या खोऱ्यात तर कधी त्या खोऱ्यात राहणारे रानटी लोक इतस्ततः भटकत असत; आणि याच लोकांच्या धाडी चीन आणि भारत या सुसंपन्न देशावर अनेक वेळा येऊन पडत. हे लोक व्यापारी लोकांच्या उंटांच्या तांड्यांना वाटेत गाठून त्यांना लुटीत; कैक वेळा त्यांना ठार मारूनहि त्यांचे असेल नसेल ते लुबाडीत. म्हणून अशा लोकांच्या प्रदेशातून प्रवास करणे म्हणजे त्रासापेक्षाही जास्त धोक्याचे, नव्हे, जिवावरचेच होते.

पण अशा त्या प्रदेशातूनही प्रवास करणारे काही फकीर लोक असतच. फकीरच ते, तेव्हा त्यांना लुटारू लोकांची कसली भीती! उलट त्यांचाच ते पाहुणचार घेत. पण हे फकीर लोक चीन देश आणि तेथील सम्राट ' बडा खान ' यांच्या संपत्तीबद्दल आणि सत्तेबद्दल, व्हेनिस शहराच्या व्यापारी लोकांना अशा काही विलक्षण आणि मनोवेधक गोष्टी सांगत की, ते लोक आश्चर्याने अगदी थक्क होत. असा सुसंपन्न देश आहे तरी कसा, हे प्रत्यक्ष तेथे जाऊनच आपण पाहावे, अशी तीव्र जिज्ञासा उत्पन्न झाल्यामुळे आणि व्यापाराचा काही जमही तेथील

व्यापाऱ्यांबरोबर बसल्यास बसवावा, हा उद्देश मनात धरून स्वतःच तेथपर्यंत जाऊन यावे, अशी महत्त्वाकांक्षा या पोलो घराण्यातील लोकांना झाली. लगेच निकोलो आणि मॅफिओ पोलो यांनी प्रथम कॉन्स्टँटिनोपल शहरी जाऊन तेथे जडजवाहीर आणि सोने-मोत्ये यांचा व्यापार करण्यास सुरुवात केली. नंतर तेथून काळा समुद्र ओलांडून, व्होलगा नदीच्या पूर्वभागी तार्तर लोकांनी प्रस्थापित केलेल्या राज्यात जाऊन, तेथील दरबारात त्यांनी प्रवेश मिळविला. हे तार्तर लोक अत्यंत क्रूर आणि रानटी म्हणून नावाजलेले होते. तथापि, आपल्या जवळची सर्व रत्ने तेथील राजपुत्राला नजर करून त्याला त्यांनी खूष केले. पण ते खरे खरे व्यापारी असल्याकारणाने, त्यांनी त्या राजपुत्राकडून स्वतः दिलेल्या रत्नांच्या दुप्पट किंमतीच्या अनेक वस्तु मिळवून, आपल्या व्यापाराचा जमही तेथे सुरेख बसविला. पण एका वर्षाच्या अखेरीसच त्या राजपुत्राचा शेजारच्या दुसऱ्या काही रानटी टोळ्यांनी पराभव करून, त्याच्या राज्यात इतकी अंदाधुंदी माजविली की, या व्यापाऱ्यांना आपल्या मालमत्तेची आणि जिवाची सुरक्षितता वाटेना. आल्या वाटेने परत आपल्या देशी जावे म्हटल्यास, तो सर्व प्रदेश शत्रूच्या ताब्यात गेला होता. तेव्हा मागे जाणे अशक्य झाल्यामुळे त्यांनी आग्नेय दिशेनेच पुढे जाण्याचे निश्चित केले; आणि कास्पियन् समुद्र ओलांडून त्याच्या पूर्व भागी असलेल्या गवताळ प्रदेशातील प्रसिद्ध बुखारा शहरी येऊन तेथे ते राहिले. सभोवताली रानटी टोळ्या हिंडत असताही अखिल मध्यआशियात विद्ये-बद्दल हे शहर त्या वेळी अत्यंत नावाजलेले होते. या शहरी या वणिग्बंधूंना तब्बल तीन वर्षे स्वस्थ राहावे लागले. कारण त्यांना धड मागे जाता येईना किंवा पुढेही जाता येईना. भोवतालच्या सर्वच प्रदेशात रानटी लोकांनी आरंभिलेल्या बंडाचा वणवा पसरला होता.


तार्तरी हा देश कास्पियन् समुद्रापासून थेट चीन देशाच्या प्रचंड

भिंतीपर्यंत पसरलेला आहे. याचे पश्चिम तार्तरी, मध्य तार्तरी व पूर्व तार्तरी असे भाग स्वाभाविकपणेच पडतात. आणि या सर्व तार्तर लोकांचा मुख्य अधिपती 'वडा खान,' यानेच चीन देशाचे साम्राज्य काबीज केले होते. आणि तो पेकिंग शहरी राहत होता. त्याच्याकडे राजकीय बाबतीत बोलणे लावण्याकरिता काही दरबारी वकील पश्चिम तार्तरीकडून पूर्व तार्तरीकडे चालले होते. त्याचा मुक्काम बुखारा शहरी पडला. या युरोपियन पोलो-बंधूंना बुखारा शहरी पाहून त्यांना फारच आश्चर्य वाटले. या वकिलातीतील लोकांशी संभाषण करीत असताना या बंधुद्वयांनी त्याच्यावर आपल्या अंगच्या शहाणपणामुळे फारच छाप बसविली. तेव्हा त्या लोकांनी या बंधूंना मोठ्या कळकळीने असे सांगितले की "तुम्ही जर बड्या खानाच्या दरबारी याल तर तुमचा योग्य मानमरातब होऊन तुमचा फायदाही पुष्कळ होईल." पोलो-बंधूंना बुखारा येथे माशा मारीत बसण्याचा फारच कंटाळा आला होता; आणि तार्तर लोकांच्या वकिलातीबरोबरच पुढे जाण्याचे असल्यामुळे वाटेत त्यांना या जातीच्या टोळ्यांपासून कोणत्याही प्रकारचा धोका पोहोचण्यासारखा नव्हता. म्हणून त्यांनी त्यांच्याबरोबरच जाण्याचे ठरविले.

एक वर्षभर सतत प्रवास केल्यानंतर ही मंडळी एकदाची बड्या खानाच्या दरबारी येऊन पोहोचली. सर्व आशिया खंडात खानाएवढा समर्थ सम्राट या वेळी कोणीही नव्हता. त्याचे साम्राज्य कास्पियन् समुद्रापासून थेट चिनी समुद्रापर्यंत हजारो मैल पसरले होते. पेकिंग शहर पुन्हा नीट बसवून तेथे त्याने आपली राजधानी स्थापिली. पोलो-बंधूंना आपल्या दरबारी आलेले पाहून त्याला खरोखरच आनंद वाटला. त्यांच्या शहाणपणाबद्दल त्याच्या मनात आदर उत्पन्न झाला; आणि त्यांचा त्याने मनापासून मोठ्या प्रेमाने आदरसत्कारही केला. युरोप खंडाबद्दल त्यांच्याशी संभाषण करून आणि त्यांना निरनिराळे प्रश्न करून

खानाने पुष्कळ माहिती मिळविली. युरोप खंडातले लोक शहाणे आणि शिकलेले असतात, असे खानाने ऐकिले होते. धर्मगुरू पोपबद्दलही त्याला पुष्कळ माहिती कळली होती. त्याला असे वाटत होते की, आपल्या राज्यात काही युरोपियन लोकांना आणून त्यांच्याकरवी आपल्या लोकांना शिक्षण द्यावे. पोलो-बंधूंना पाहून ही त्याची इच्छा जास्तच प्रबल झाली. म्हणून त्याने पोलो बंधूंना अत्यंत आग्रहाची विनंती करून आपल्या वतीने पोपकडे जाण्यास सांगितले. तो म्हणाला, " रोम शहरी राहणारा तुमचा धर्मगुरू पोप याच्याबद्दल माझ्या मनात फारच आदर आहे. तरी तुम्ही त्याच्यापाशी जाऊन निदान शंभर धर्मशिक्षकांची माझ्या वतीने मागणी करा. त्या लोकांनी माझ्या दरबारी येऊन मला आणि माझ्या लोकांना शिकवून शाहणे करावे, अशी माझी पोपपाशी नम्र विनंती सादर करा. या बाबतीत तुम्हीच माझे वकील. तथापि, मी माझ्या सरदारांपैकी एकास तुमच्या बरोबर देतो. त्याची तुम्हांला जाताना वाटेत मदत होईल. "

बड्या खानाकडून पोपकडे वकील म्हणून जाण्याचा मान मिळाल्या-मुळे पोलो-बंधूंना मनापासून आनंद झाला. त्यांनी ती गोष्ट एकदम मान्य केली. खानाने पोपला देण्यास एक पत्र दिले आणि एका विटेएवढ्या जड सोन्याच्या पत्र्यावर आपल्या तर्फेंरी प्रजेने पोलो-बंधूंना सर्व प्रकारची मदत करावी, त्यांचा पाहुणचार करावा, आणि त्यांना सत्काराने वागवावे, अशी आज्ञा लिहून दिली. यामुळे त्यांचा प्रवास, अत्यंत खरखरीत अशा रेताड प्रदेशातून सुद्धा, अतिशय सुकर आणि शक्य तितका सुखकर असा झाला. इ. स. १२६९ साली पोलो-बंधू परत व्हेनिस शहरास सुखरूप येऊन पोहोचले. त्यांनी आपल्याबरोबर जी अगणित संपत्ती आणली होती ती, आणि ज्या निरनिराळ्या अनेक वस्तू आणिल्या होत्या त्या व्हेनिस शहरातील सर्व नगरवासियांचा


व्हेनिस
अरबस्थान
इराण
बुखारा
बल्क
ओर्मुझ
गोबीचे वाळवंट
चीन
पेकिन
तिबेट
हिंदुस्थान
सिलोन
हिंदी महासागर
पॅसिफिक महासागर
सुमात्रा
जावा
बोर्निओ
पोलो वधू व मार्को पोलो यांचा मार्ग
भारतीय प्राचीन जलपर्यटणाचा मार्ग

बोलण्याचा एक मोठा विषयच होऊन राहिला. निकोलो पोलोचा मुलगा मार्को पोलो याला तर चीनसंबंधी इतके वेड लागले की, तो आपल्या बापापाशी व चुलत्यापाशी सारखा त्याच त्याच गोष्टीसंबंधी विचारू लागला, आणि त्यांनी आणलेली संपत्ति आणि वस्तु पाहण्यातच आपला सगळा वेळ तो घालवू लागला. त्या वेळी तो सारा १५ वर्षांचा होता. ज्या वर्षी पोलो-बंधूंनी व्हेनिस शहर सोडून पूर्वेकडील प्रवासास प्रयाण केले होते, त्याच वर्षी या मुलाचा जन्म झाला होता. तथापि आपल्या बापचुलत्याबरोबर चीन देशास जाण्याचा त्याने इतका आग्रह आणि हट्ट धरला की, त्यांनी त्याला घेऊन जाण्याचे कबूल केले. ठरल्याप्रमाणे सन १२७१ साली ते त्याला बरोबर घेऊन निघाले.

पोपने पाठविलेले दोन धर्मोपदेशकही बडया खानाकडे जाण्याकरिता त्यांच्या बरोबर निघाले. खानाने शंभर धर्मोपदेशकांची मागणी केली होती खरी; पण सारे दोनच धर्मोपदेशक इतके दूर जाण्यास तयार झाले. आणि हेही धीट धर्मोपदेशक वाटेत होणाऱ्या हालअपेष्टांच्या वर्णनांना भिऊन वाटेतूनच परत फिरले. संपत्ती दुसऱ्यांना देता येते; पण साहस आणि धैर्य या गोष्टी तशा देता येत नाहीत. त्या मुळातच ज्याच्या त्याच्या अंगी असाव्या लागतात. आपली कामगिरी फसली म्हणून पोलो-बंधूंना वाईट वाटले खरे; पण या गोष्टीस त्यांचा नाइलाज होता.

पुन्हा तीन साडेतीन वर्षे ते वाट चालत होते. या खेपेस त्यांनी निराळ्याच मार्गाने प्रवास केला. प्रथम तैग्रीस आणि युफ्रेतीस या नद्यांमधील सुपीक प्रदेश, मेसॉपोटेमिआ, हा ओलांडल्यानंतर ते इराणच्या डोंगराळ आणि वैराण प्रदेशात आले. तेथून सर्व जगात उंच असे जे पामीरचे पठार, जे आशिया खंडातील पर्वताचे केंद्र, जे काश्मीरच्याही उत्तरेस सुमारे ३०० मैल असून अति उंच असल्यामुळे नेहमी

बर्फाच्छादित असते, अशा त्या निर्जन ठिकाणी येऊन ते पोहोचले. हा बर्फाच्छादित प्रदेश मोठ्या कष्टाने ओलांडल्यावर, पुन्हा मध्य तुर्कस्तान आणि मंगोलिया या विस्तीर्ण वालुकामय प्रदेशातून, रात्रीची कडक थंडी व दुपारचे प्रखर ऊन्ह यांचा दुःसह सहवास सहन करीत त्यांनी एकदाचा चीन देश गाठला. त्यांना परत आलेले पाहून बड्या खानास अतिशयच आनंद झाला. मार्को पोलोवर तर त्याचे पुत्राप्रमाणे प्रेम बसले आणि त्याचा तो अति आवडता व लाडका झाला.

मार्को पोलोने तार्तरी भाषेचा अतिशयच मन लावून अभ्यास केला; आणि ती भाषा थोड्याच दिवसात तो मातृभाषेइतकीच सफाईदार बोलू लागला. मार्को पोलोची तरतरी आणि शहाणपण पाहून खान इतका खूष झाला की, त्याने त्याला चीन देशाच्या एका दूरच्या प्रांतावर एका नाजुक कामगिरीवर पाठविले. मार्को पोलो हा मोठा धोरणी आणि कावेबाज होता. इतर लोक जेव्हा एखाद्या कामगिरीवर जाऊन येत, तेव्हा ते केवळ कामगिरीबद्दलच बोलत, आणि इतर कोणत्याही बाबतीत म्हणजे जाऊन आलेल्या प्रदेशाबद्दल, किंवा तेथे पाहिलेल्या किंवा ऐकलेल्या आश्चर्यकारक अशा गोष्टींबद्दल ते काहीच सांगत नसत अशी खानाची नेहमीची तक्रार असे. आपल्याबद्दल ही तक्रार पुढेमागे राहू नये, म्हणून त्याने पहिल्यापासूनच जास्त खबरदारी घेतली. तो प्रत्येक देश अत्यंत बारकाईने व चौकसबुद्धीने पाहून येऊ लागला, आणि त्या देशाबद्दलच्या साऱ्या नवलकथा आणि विचित्र वाटणाऱ्या गोष्टी तो खानास सांगू लागला. यामुळे खान त्याला दूरदूरच्या प्रांतावर निरनिराळ्या राजकीय कामगिऱ्यांवर पाठवू लागला, आणि हाही हौसेने जाऊ लागला. कारण यायोगे दूरदूरचे देश पाहण्याची त्याची इच्छा पूर्ण होऊन, त्याला जगातील, विशेषतः आशिया खंडातील, निरनिराळ्या भागांची बरीच माहिती मिळू लागली. ही माहिती त्याने एका पुस्तकात लिहून ठेविली

आहे, हे विशेष होय. या पुस्तकावरून आशिया खंडाची भौगोलिक-दृष्ट्या बरीच माहिती लोकांना उपलब्ध झाली. पेकिंग शहराच्या रचनेबद्दल त्याला विशेष कौतुक वाटत होते, असे दिसते. कारण तो आपल्या पुस्तकात या शहराविषयी म्हणतो, "या शहराला बारा वेशी आहेत आणि सहा सहा मैल लांबीचे प्रत्येक दिशेला एक असे चार तट आहेत. प्रत्येक वेशीवर हजार हजार लढवय्यांचा अहोरात्र पहारा असतो. तो या शहराला शत्रूपासून भीती आहे म्हणून नव्हे, तर बड्या खानाच्या सन्मानार्थ आणि केवळ अंतःस्थ चोरांपासून लोकांच्या रक्षणार्थ हा पहारा ठेवण्यात आला आहे." दुसरे एक शहर तर याहून वैभवसंपन्न होते, असे त्याच्या वर्णनावरून दिसून येते. हे शहर यांगत्से नदीवरील हैन्चौ हे असावे. "या शहराचा घेर शंभर मैल असून या शहरात १२००० दगडी पूल आहेत. बहुतेक पुलांखालून मोठमोठाली गलबते जात येत असतात." पूर्वेकडील प्राचीन काळचे हे लंडन शहरच म्हणावयाचे !


जवळ जवळ वीस वर्षे याप्रमाणे खानाच्या दरबारी काढल्यानंतर पोलो कुटुंबातील या पुरुषांना परत आपल्या मायभूमीस जाण्याची अतिशय तीव्र इच्छा झाली. आपल्या घरादारातील लोकांना, आप्तेष्टांना, जुन्या मित्रांना आणि स्वकीय लोकांना भेटावे, असे तर त्यांना वाटत होतेच; शिवाय खानाच्या हयातीनंतर आपणास येथे इतक्या सुरक्षितपणे राहता येईल की नाही, याचीही त्यांना धास्ती वाटत होती. त्यांनी आपल्या जाण्याबद्दल खानापाशी पुष्कळ वेळा गोष्टी काढिल्या. पण प्रत्येक खेपेस खान मोडता घाली; आणि त्याच्या परवानगीशिवाय किंवा अनुकूलतेशिवाय, एवढ्या अवाढव्य आणि अनेक दृष्टींनी दुर्गम अशा प्रदेशातून जाणे दुरापास्तच होते. म्हणून ते ही संधि केव्हा येईल याची वाटच पहात होते. कर्मधर्मसंयोगाने अशी संधी एके दिवशी आयतीच चालून आली.

इराण देशाचा शहा हा या बड्या खानाचा नातू होता. त्याने मोंगल घराण्यातील एका थोर सरदाराच्या मुलीशी लग्न केले होते. पण ती दिवंगत झाल्यामुळे त्याच घराण्यातील दुसऱ्या एका सरदाराच्या मुलीशी त्याचे लग्न ठरवावयाचे होते. त्या मुलीसाठी मागणी करण्याकरिता इराणच्या पादशहाकडून काही वकील आले होते. हा दुसरा सरदार बड्या खानाचा नातलगच असल्यामुळे बड्या खानाजवळ त्याने त्या मुलीबरोबर जाण्याकरिता म्हणून, पोलो लोकांची मदत मागितली. कारण त्या मुलीला खुश्कीच्या मार्गाने धाडण्यापेक्षा जलमार्गानेच धाडणे जास्त सोइस्कर आणि कमी त्रासाचे होईल, असे त्या मुलीला नेण्याकरिता आलेल्या वकील लोकांचे म्हणणे पडले. आणि समुद्रावरून प्रवास करण्याचा अनुभव पोलो मंडळीशिवाय इतर कोणासही नसल्यामुळे, या कामी त्यांचीच मदत घेणे प्राप्त झाले. बड्या खानाला धड 'होय' म्हणवेना, धड 'नाही' म्हणवेना. शेवटी त्याने मोठ्या कष्टाने परवानगी दिली.

या प्रवासाकरिता तेरा गलबते तयार करण्यात आली. पुन्हा मागच्या खेपेप्रमाणेच, म्हणजे पोपकडे जाताना, जसे खानाने सोन्याच्या विटेवर आपल्या प्रजाजनांना आज्ञा दिल्या होत्या, त्याप्रमाणे, या खेपेसही सोन्याच्या विटांवरच आज्ञा लिहून दिल्या. त्याप्रमाणे युरोप देशांतील राजे लोकांनाही त्याने मित्रत्वाची पत्रे लिहून दिली. सर्व तयारी झाल्यानंतर, सन १२९२ साली फोकीनच्या बंदरातून त्यांची चार चार शिडांची गलबते निघाली. प्रत्येक गलबतावर २५० खलाशी होते. इतक्या दिवसांनंतर ही अत्यंत विश्वासू पोलो मंडळी दूर जाणार, म्हणून खानाने रत्नाची एक भली मोठी पिशवीच त्यांना नजर केली. यातील प्रत्येक रत्नाची किंमत एकेका राजाला विकत घेण्याइतकी मनस्वी होती. तीन महिने सतत प्रवास केल्यानंतर, ही गलबते जावा बेटांस येऊन पोहोचली. पण वादळी हवेमुळे त्यांना पाच महिने सुमारा बेटातच अडकून पडावे लागले. शेवटी

एकदाची ती तेथून निघाल्यानंतर, सीलोन बेटास वळसा घालून इराणच्या आखातात येईपर्यंत, त्यांची जवळ जवळ दोन वर्षे लोटली. इराणच्या पादशहाने पाठविलेल्या वकिल लोकांपैकी दोघेजण या अवधीत मृत्युमुखी पडले होते. त्याचप्रमाणे इतरही कित्येक लोक मेले. ज्या राजकन्येकरिता हा प्रवास करावा लागला, ती मात्र आजारी तर पडली नाहीच; उलट तिची प्रकृती छान झाली होती. पण ज्या पादशहाकरिता म्हणून या राजकन्येला इतक्या दूरच्या प्रदेशातून आणण्यात आले होते, तो पादशहा दोन वर्षांपूर्वीच वारला होता. म्हणून त्या पादशहाच्या मुलाबरोबरच तिचं लग्न लावून देण्यात आले! पोलो मंडळींनी, विशेषतः मार्को पोलोने, या राजकन्येची इतकी काळजी घेतली होती की, त्यांनी तिला अगदी आपल्या नातीप्रमाणे आणि मुलीप्रमाणे वागविले होते. तिलाही त्यांचा इतका लळा लागून राहिला होता की, ते परत जावयास निघाले तेव्हा तिला अतिशयच वाईट वाटले इतके की तिला रडू आवरेना.

पोलो मंडळीही मोठ्या कष्टानेच तिचा निरोप घेऊन तेथून निघाली. इराणातून ते जे निघाले ते प्रथम खुष्कीच्या वाटेने म्हणजे मेसॉपोटेमिआ आशिया मायनर, हे प्रदेश ओलांडून भूमध्य समुद्राच्या किनाऱ्यावर येऊन दाखल झाले त्यांना आता घराकडची ओढ लागली होती. त्यांना घर सोडून जवळ जवळ २५ वर्षे होऊन गेली होती. व्हेनिस शहरी येऊन आपल्या स्वतःच्या मालकीच्या घरीच दरवेश्याप्रमाणे हे तिघे पोलो सन १२९५ साली देवडीवर दाखल झाले. पण त्यांना घरात घेणार कोण? ज्या वर्षी घर सोडले, त्या वर्षी जी मुले जन्मास आली होती, ती आज तारुण्यात आली होती, आणि त्यांच्या बरोबरचे लोक त्यांच्याचप्रमाणे वयस्क झाले होते. यांना जाऊन दोन तपे लोटल्यामुळे यांच्याबद्दलची लोकांची आठवणही पार बुजली होती. शहरातून घरापर्यंत येत असता इतर लोकांनी त्यांना ओळखणे तर शक्य नव्हतेच; उलट प्रवासामुळे अत्यंत मलिन झालेला



पोलो मंडळी व्हेनिस शहरी परत आली तेव्हाचा देखावा.
त्यांना कोणी घरातच घेईना.

त्यांचा पायघोळ पोशाख, त्यांची ती लांबच लांब दाढी, आणि उंचच उंच असे बांधलेले डोक्यावरील फेटे पाहून, व त्यांची निराळे हेल काढून विलक्षण तऱ्हेने उच्चारली जाणारी भाषा ऐकून, घरातील लोकांना सुद्धा हे कोण असावेत, याबद्दल जबर शंका आली. त्यांनी त्यांना घरात

घेण्याचे साफ नाकारिले. स्वतःच्या मालकीच्याच नव्हे, तर स्वतः अलोट संपत्ती खर्च करून बांधलेल्या घरातच स्वतःला मज्जाव! पण करावयाचे कसे? घरातील लोकांनी तरी यांना घरात कसे घ्यावयाचे? आज पंचवीस वर्षे कोणालाच यांचा पत्ता नव्हता. प्रवासास – अत्यंत दूरच्या आणि कष्टमय प्रवासास – गेलेले हे लोक, पंचवीस वर्षांत त्यांचा काहीच सुगावा नाही, तेव्हा ते जिकडे गेले तिकडेच त्यांचे बरेवाईट झाले असावे, ते इहलोक सोडूनही गेले असावेत, या कल्पनेतच घरातील सर्व वडील मंडळी आजवर होती. तरुणांना तर यांची माहितीही नव्हती!

आपण कोणी उपटसुंभ नसून, पंचवीस वर्षांपूर्वी घर सोडून गेलेली पोलो मंडळी आपणच, अशी घरातील आणि इतर सामान्य लोकांचीही खात्री कशी पटवून द्यावयाची? हा प्रश्न आपल्या प्रवासी पोलो मंडळीपुढे उभा राहिला. शेवटी त्यांना एक युक्ती सुचली. त्यांनी एका बड्या मेजवानीचा घाट घातला; आणि त्यानिमित्त पोलो घराण्यातील सर्व लहान थोर मंडळी आणि व्हेनिस शहरातील थोर थोर गृहस्थ यांना बोलाविले. या प्रसंगानिमित्त त्यांनी अतिशय उंची पोशाख केला. मेजवानीचा थाटही अभूतपूर्व आणि अश्रुतपूर्व असाच होता. इतका की, यापूर्वी असा कधी घडला नव्हताच; पण असा थाट पुढेही कधी होणे शक्य नाही, असे त्या वेळी सर्वांना वाटले. प्रथम मेजवानीस सुरुवात होण्यापूर्वी त्यांनी किरमिजी रंगाचा मऊ सॅटिनचा पोशाख केला होता. मेजवानीस सुरुवात होताच, त्यांनी हा पोशाख उतरविला आणि दुसरा त्याच रंगाचा पण दमास्क कापडाचा पोशाख अंगावर घातला. नंतर त्यांनी नोकरास असे सांगितले की, त्यांनी उतरविलेल्या पोशाखाची कापून सारखी वाटणी करावी आणि प्रत्येकाने आपल्या वाटणीचा हिस्सा घ्यावा. नंतर मेजवानी चालू असतानाच पुन्हा त्यांनी दमास्क कापडाचा पोशाख अंगावरून उतरून टाकला आणि पहिल्याप्रमाणेच तो वाटून

घेण्यास नोकरांस सांगितले; आणि स्वतः किरमिजी रंगाचा मखमलीचा पोशाख परिधान केला. मेजवानी संपल्यानंतर पुन्हा हाही पोशाख त्यांनी काढून टाकला; आणि तोही वाटून घेण्यास नोकरांना त्यांनी सांगितले आणि ते स्वतः अत्यंत साधा पोशाख करून आले. तेथे जमलेल्या सर्व मंडळींना याचे भारीच आश्चर्य वाटले. अत्यंत श्रीमंत मनुष्याखेरीज दुसऱ्या कोणाही मनुष्यास असे करणे शक्य नव्हते, हे तर उघड दिसत होतेच; पण या दरवेश्यांजवळ एवढी संपत्ती आली कोठून, आणि ज्या दिवशी हे आले, त्या दिवशीचा यांचा पोशाख इतका मलिन आणि फाटका का म्हणून ? हे कोडे अद्याप उलगडले नव्हते. मेजवानी आटोपल्यावर सर्व मंडळी दिवाणखान्यात जमली. नंतर मार्को पोलोने ज्या पोशाखात ते स्वतः व्हेनिस शहरी प्रथम आले होते तो पोशाख तेथे आणविला. त्यांनी त्याची शिवण हळूहळू उसवली. त्यासरशी प्रत्येक अंगरख्यातून रत्नांचा प्रवाहच जणू वाहू लागावा, त्याप्रमाणे अगणित रत्ने खाली ओतली गेली. त्यांत हिरे, माणिक, पाच, इंद्रनील, वैडूर्य वगैरे सर्वच प्रकारची रत्ने चमकत होती. तेथे जमलेल्या सर्व लोकांची खात्री झाली की, हे कोणी उपटसुंभ तर खास नव्हेत. घरातील मंडळींनाही हर्षवायू झाला. निकोलो पोलो, मॅफिओ पोलो आणि मार्को पोलो यांनाही आपल्या घरी पुन्हा आपलेपणाने राहावयास मिळाल्यामुळे अत्यानंद झाला, आणि व्हेनिस शहरात किती तरी दिवस संभाषणाचा असा हा एकच विषय होऊन राहिला.

याच वेळी व्हेनिस नगरवासीयांची आणि इटली देशाच्या पश्चिम भागी असलेल्या जिनोआ नावाच्या दुसऱ्या एका प्रतिस्पर्धी बंदरांतील लोकांची व्यापारी व राजकीय वर्चस्वाबद्दल लढाई जुंपली होती. यांच्या-मध्ये १२९८ साली एक आरमारी युद्धही झाले. या युद्धात मार्को पोलोला एका आरमाराचे पुढारीपण देण्यात आले होते. सुदैवाने म्हणा अगर

दुर्दैवाने म्हणा, या आरमाराचा पराजय होऊन मार्को पोलोला शत्रूच्या तुरुंगात खितपत पडावे लागले. तथापि, तुरुंगात असतानाच आशिया खंडात त्यांनी केलेल्या सर्व प्रवासाचे वर्णन त्याने एका लेखकाकरवी लिहून काढविले. पुढे त्याची सुटका होऊन, ऐषारामात आणि ऐश्वर्यातच त्याला त्याच्या सत्तराव्या वर्षी मरण आले.

त्याने लिहून काढलेल्या आपल्या प्रवासांच्या वर्णनाचा ग्रंथ प्रवास-वर्णनात आज अत्यंत नावाजला जातो. पण त्या वेळच्या लोकांना त्यातील वर्णन इतके आश्चर्यकारक वाटले की, त्यांचा त्यावर विश्वास बसेना व ते सर्व वर्णन कल्पितच असावे असे त्यांना वाटले. तीस कोटी संख्या ज्या प्रदेशात पोसली जाते, असा सुपीक प्रदेश असेल तरी कसा? आणि इतकी अगणित संपत्ती त्या देशात असेल तरी कशी? पण पुढे ज्या ज्या प्रदेशशोधकांनी या खंडातून प्रवास केला, त्यांना त्याची वर्णने पुष्कळच अंशांनी खरी होती असे आढळून आले. म्हणून कोलंबसापूर्वी जे साहसी प्रवासी होऊन गेले त्या सर्वांत मार्को पोलो हा अत्यंत श्रेष्ठ होय, अशी त्याची कीर्ती जगात होऊन राहिली आहे.

३

# नाविकांचा नेता : राजपुत्र हेन्री

आज भूगोलाचे पूर्व-गोलार्ध आणि पश्चिम-गोलार्ध असे दोन भाग आपण मानतो. पूर्व-गोलार्धास जुने जग आणि पश्चिम-गोलार्धास नवे जग अशाही संज्ञा काही काही भूगोल विषयाच्या लेखकांनी दिलेल्या आहेत. ज्या पूर्व-गोलार्धास आपण जुने जग म्हणतो, त्या जगात ज्या भूखंडांचा समावेश आज केला जातो, त्या भूखंडांचीसुद्धा एकमेकांना ५०० वर्षांपूर्वी पुरेशी ओळख नव्हती. नव्हे, त्या खंडांपैकी ऑस्ट्रेलिया खंडाचा शोध पश्चिम-गोलार्धाच्या शोधानंतरच लागला, ही गोष्ट आश्चर्य करण्यासारखीच आहे.

जुन्या जगातील ज्या खंडांची एकमेकांना थोडी तरी माहिती होती, ती खरोखर दोनच खंडे होत. ती म्हणजे युरोप आणि आशिया. ही दोन खंडे वेगळी मानावीत की 'युरेशिया' म्हणून एकच खंड मानावे, हाही एक प्रश्नच आहे. ही दोन खंडेसुद्धा या दोन खण्डांच्या सीमेवर राहणाऱ्या काही काही व्यापारी लोकांनाच तेवढी माहीत होती. इतरांना ती केवळ ऐकूनच ठाऊक होती. युरोपातील व्हेनिस शहराच्या पोलो मंडळींनी आशियाच्या अगदी पूर्वेस असलेल्या चीन राष्ट्रापर्यंत खुष्कीच्या मार्गाने आणि जलमार्गानेही प्रवास करून, युरोप आणि आशिया यांची ओळख स्वतः करून

घेतली होतीच, आणि आपल्या प्रवासवर्णनाच्या साहाय्याने दुसऱ्यांनाही थोडी थोडी ओळख करून दिली. होती. आशिया मायनर येथे राहणाऱ्या लोकांनी आपल्या पूर्वेकडे चीन देशापर्यंत पसरलेल्या भूखण्डास 'असु' म्हणजे सूर्योदय होणाऱ्या दिशेकडील भूखंड, असे नाव दिले होते आणि पश्चिमेकडे ग्रेट ब्रिटन व आयर्लंड बेटांपर्यंत पसरलेल्या भूखंडास 'इरिब्' म्हणजे सूर्यास्त होणाऱ्या दिशेकडील भूखंड, हे नाव दिले होते. या 'असु' आणि 'इरिब्' नावांचीच 'आशिया' आणि 'युरोप' ही हल्लीची रूपे होत. खरोखर ही दोन खंडे आणि भूमध्य समुद्राच्या दक्षिणेकडील आफ्रिका खंडाच्या उत्तर किनाऱ्यावरील जिब्राल्टर सामुद्रधुनीपासून सुएझच्या संयोगभूमीपर्यंतचे प्रदेश, एवढ्या भूभागांनाच 'जुने जग' ही संज्ञा साजण्यासारखी आहे. व्यापारामुळे का होईना या खंडाचा एकमेकांशी संबंध येत होता. महान अलेक्झांडर दि ग्रेट याने मॅसिडोनिआपासून तो सिंधुनदीपर्यंतचा सर्व प्रदेश आपल्या साम्राज्यातच सामाविष्ट केला होता. अरबस्तानातील मुसलमान लोकांनी आणि मध्य आशियातील तार्तरी लोकांनी भारतापासून तो स्पेन देशापर्यंत सर्वच प्रदेश एका काळी पादाक्रांत केला होता. म्हणजे जिब्राल्टरपासून चिनी समुद्रापर्यंतचा सर्व भूप्रदेश या लोकांनी आपल्या पायांखाली घातला होता. समृद्ध आणि संपन्न देशांवर टोळधाड घालण्याकरिता ओसाड प्रांतातील लुटारू तार्तरी लोकांनी, धर्मप्रसारार्थ महंमद पैगंबराच्या अनुयायांनी, आणि साम्राज्याची सीमा वाढविण्याच्या महत्त्वाकांक्षेने प्रेरित होऊन महान अलेक्झांडरच्या शिपायांनी, या नाही त्या कारणास्तव त्या वेळच्या ज्ञात जगावर म्हणजे ॲटलँटिक महासागराच्या पूर्व किनाऱ्यापासून तो पॅसिफिक महासागराच्या पश्चिम किनाऱ्यापर्यंतचा भूप्रदेश जिंकला होता. मात्र आफ्रिका खंडाचा उत्तर किनारा जरी ज्ञात होता, तरी उत्तर किनाऱ्यावरील प्रदेशाच्या दक्षिणेस

हजारो मैल लांब जे वाळवंट पसरलेले आहे, त्यामुळे या आफ्रिका खंडाचा भूभाग केवढा आहे, याची कोणालाच खरी कल्पना आलेली नव्हती.

पण ज्या पुण्यभूमीमध्ये जीसस ख्राइस्तचा जन्म झाला, त्याच्याच शेजारच्या दुसऱ्या पुण्यभूमीत महंमद पैगंबर याचाही जन्म झाला आणि या दोन जवद्वंद्य विभूतींच्या अनुयायांमध्ये आपआपल्या धर्मसंस्थापकांच्या धर्मप्रसारार्थ प्रथम झटापटीला सुरुवात होऊन त्याचे धर्मयुद्धांत रूपांतर झाले. आणि ते शेकडो वर्षे चालूच होते. याचा परिणाम आशिया आणि युरोप या दोन खंडांतील प्रमुख राष्ट्रांमध्ये चालणाऱ्या व्यापारावर इतका झाला की, जवळ जवळ हा व्यापार थंडावलाच. कारण व्यापाराचा जो मुख्य मार्ग तोच या धर्मयुद्धाच्या रणक्षेत्रातून होता. तेव्हा याला उपाय काय ? याला उपाय एकच. तो म्हणजे पूर्वराष्ट्रांशी दळणवळण ठेवण्याकरिता जलमार्ग शोधून काढणे. पाश्चात्य राष्ट्रांपुढे हा मोठाच प्रश्न होता. हा प्रश्न सोडविण्याच्या कामी ज्या राष्ट्रांनी पुढाकार घेतला, त्यात आयबेरिअन् द्वीपकल्पातील, स्पेन आणि पोर्तुगाल ही दोन राष्ट्रे प्रमुख होत. त्यातल्या त्यात पोर्तुगाल देशाचा राजपुत्र हेन्री, याने तर या गोष्टीत अतिशय व मनापासून लक्ष घातले आणि त्याने एकामागून एक असे नाविक लोकांचे किती तरी ताफे स्वतःच्या खर्चाने या कामगिरीसाठी आफ्रिका खंडाच्या पश्चिम किनाऱ्याकिनाऱ्याने शोध लावण्याकरिता पाठविले. राजपुत्राच्या या अंगीकृत कार्यात त्याची दिसून आलेली चिकाटी आणि मिळालेले सुयश यामुळे 'नाविकांचा नेता – राजपुत्र हेन्री' (Henry the Navigator) अशी संज्ञा म्हणा – किंवा उपनाव म्हणा – सर्व युरोप खंडाकडून त्याला मिळालेले आहे. हा राजपुत्र ओपोर्टो बंदरी १३९४ च्या मार्च महिन्यात चौथ्या तारखेस जन्मास आला. आविझ वंशाचा मूळ संस्थापक पहिला जॉन, याचा हा पाचवा मुलगा. जॉनच्या कारकीर्दीतच पोर्तुगाल देश युरोपिअन राष्ट्रामध्ये पुढे येऊ

लागला. आफ्रिका खंडातील मोरोक्को देशाच्या मूर लोकांशी या राष्ट्राचा १४१५ साली झगडा झाला; त्या झगड्यात राजपुत्र हेन्रीने अतिशयच पराक्रम गाजविला, अणि त्याने स्यूटा ( Ceuta ) नावाचे आफ्रिकेच्या उत्तर किनाऱ्यावरील जिब्राल्टर सामुद्रधुनीचे दार हस्तगत केले या स्थळाला इतके महत्त्व होते व आहे की, त्याला 'आफ्रिकेचे जिब्राल्टर'




नाविकांचा नेता - राजपुत्र हैन्री

ही संज्ञा हल्ली मिळालेली आहे. या राजपुत्राच्या मनात आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्याने शोध लावीत लावीत पश्चिम महासागराचा, पश्चिम नाइल नदीचा (सेनेगॉल नदीचेच हे नाव होय) आणि सहारा वाळवंटाच्या दक्षिणेस असलेल्या नीग्रो लोकांच्या सुपीक प्रदेशाचा शोध लावावा, ही महत्त्वाकांक्षा उत्पन्न झाली. १४१५ साली याने जॉन-

डि-ट्रूस्टो नावाच्या नावाजलेल्या खलाशाला या कामगिरीवर पाठविले. त्याने ग्रँड कॅनरी या बेटापर्यंत प्रवास केला. पण या बेटाचा शोध यापूर्वीच फ्रेंच आणि स्पॅनिश नावाड्यांनी लाविलेला होता. त्यानंतर १४१८ साली, हेन्रीचा कॅप्टन्, जॉन गॉनकॉलवेझ झार्को, याने पोर्टोसॅन्टो हे बेट आणि १४२० साली मदिरा बेट यांचा पुन्हा शोध लाविला. पुन्हा शोध लाविला असे म्हणण्याचे कारण एवढेच की ही सर्व बेटे यापूर्वीच काही काही धाडसी खलाशांनी शोधून काढलेली होती. पण ती युरोपिअन लोकांच्या स्मृतीतून नष्ट झाली होती. १४२४-२५ साली या राजपुत्राने कॅनरीज बेटे आपल्या ताब्यात घेऊन तेथे वसाहती स्थापिल्या. १४२७ साली डिगो-डि-सेव्हिल या राजदरबारी असलेल्या नाविकाला राजाच्या म्हणजे आपल्या वडिलांच्या अनुमतीने अझोरज बेटांच्या शोधार्थ पाठविले. ही बेटेही कोठे तरी जवळपासच आहेत, असे ऐकून माहीत होते. या कॅनरीज बेटांचा आणि अझोरज बेटांचा जो पुन्हा शोध लावण्यात आला, त्याचे महत्त्व एका दृष्टीने अतिशयच आहे. कारण ॲटलँटिक महासागरातील युरोप आणि आफ्रिका खंडापासून अत्यंत दूर अशी असलेली बेटे हीच होत. आणि ह्या बेटांपासूनच कोलंबसाने पुढे अमेरिकेकडे प्रयाण केले.

मध्यंतरी १४२८ साली पुन्हा मूर लोकांनी आणि ग्रॅनडा येथील मुसलमान लोकांनी स्यूटा किल्ल्यावर हल्ला केला, तेव्हा त्याच्या रक्षणार्थ हेन्रीला तेथे जावे लागले. त्याने या लोकांचा हल्ला परतविला. मात्र लढाई नंतर याच लोकांपासून त्याला गिनीच्या किनाऱ्याबद्दलची वरीचशी माहिती मिळाली. त्याचप्रमाणे या लोकांपासूनच आफ्रिकेच्या आंतर्भागां-विषयीही त्याने माहिती गोळा करण्याचा बराच प्रयत्न केला. १४२९ साली पोर्तुगाल देशाच्या अगदी दक्षिणेकडील प्रांताचा म्हणजे ॲल-गार्व्हेचे राज्य याचा तो गव्हर्नर झाला. त्यामुळे आफ्रिकेशी या राजपुत्राचा


पोर्तुगाल
लिस्बन
साग्रेस
व्हेनिस
स्यूटा
सेंट व्हिन्सेंट भू.
मंदिरा बे.
कॅनेरी बेटे
बोजोडोर भू.
ब्लॅंको भू.
केप वर्ड बेटे
वर्द भू.
गोल्डकोस्ट
सिएरालिओन
लोपेझ भू.
कांगो नदी
हिंदुस्थान
अरबी समुद्र
कालिकत
मलिंद
मोंबासा
मोझांबिक
अटलांटिक महासागर
हिंदी महासागर
सेंट हेलेना उ.सा.
केप ऑफ गुड होप
नाताळ
मोसलचा उपसागर
रिव्हर ऑफ मर्सी
राजपुत्र हेन्री याच्यावेळी शोधलेली स्थळे
वास्को-द-गामाने आक्रमिलेला मार्ग

अगदी जवळचा संबंध आला. त्याने केप सेन्ट व्हिन्सेंटजवळ सॅग्रेस येथे आपल्या नावाचे शहर वसविले; याच शहरी तो पुढे १४३८ मध्ये काही काळ जाऊन राहिला आणि १४६० साली तो तेथेच मरण पावला.

१४३३ साली पोर्तुगालचा राजा जॉन हा वारला. पण राजाने मरण-समयी आपल्या मुलाला त्याने हाती घेतलेले हे शोध लावण्याचे काम तसेच चालू ठेवावे, असेच उत्तेजनपूर्वक सांगितले. विशेषत: केप बोजा-डोरला वळसा घालून, पुढे काय आहे हे शोधून काढण्यासाठी, लोकांच्या उपहासाकडे मुळीच लक्ष न देता, हर प्रयत्न करण्यात यावेत, असाच त्याने आग्रहपूर्वक सल्ला दिला आणि आनंदाची गोष्ट अशी की, १४३४ सालची गिल् इन्नेसच्या ताब्यातील राजपुत्राच्या गलबतांनी त्या भूशिराला वळसा घातला. १४३५ साली राजपुत्राच्या दुसऱ्या एका खलाशाने याही भूशिरापुढे १००–१५० मैल प्रवास केला आणि १४३६ साली तर ब्लँको भूशिरापर्यंत मजल मारण्यात आली. पुढे काही वर्षे राजकारणा-मुळे हे शोध लावण्याचे कार्य थांबवावे लागले. पण १४४१ साली आन्ताम गॉंकलवेझ याने गिनीचा किनारा गाठिला; आणि तेथील काही लोकांना त्याने गुलामही करून आणिले. विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्याने आपल्याबरोबर सोन्याची वाळूही आणिली. याचा परिणाम असा झाला की, बरेच धाडशी लोक या प्रदेशांचा शोध लावण्याच्या कामी आपण होऊनच पुढे येऊ लागले. विशेषत: व्यापारी आणि खलाशी लोक यांनी तर स्वयंस्फूर्तीनेच या कामी चंग बांधिला. १४४८ साली आर्ग्यु-इमच्या उपसागरावर एक किल्ला बांधण्यात आला. तेथून गुलामांचा व्यापार, जगात तो कायमचा बंद होईपर्यंत, या पोर्तुगीज लोकांनी मोठ्या जोरात चालविला होता.

राजपुत्र हेन्रीने आपल्या शहराची वाढ मोठ्या झपाट्याने चालविली होती. राजवाडा, चर्च आणि वेधशाळा अशा मोठमोठ्या इमारती १४४३

साली पूर्ण झाल्या. आता राजपुत्र हेन्री हा येथे जाऊन कायमचा राहिला होता; आणि येथून त्याने अनेक खलाशांना प्रदेशशोधार्थ पाठविण्याचा सपाटा चालविला. १४४४ ते १४४६ या दोन वर्षांच्या अवधीत जवळ जवळ ३० गलबतांनी यांत भाग घेतला होता. डिनिज डायस व न्युनो ट्रिस्टॅम या दोघां खलाशांनी १४४५ साली सेनेगॉल नदीचा शोध लावला. डायसने तर व्हर्द भूशिरास वळसा घातला आणि १४४६ मध्ये आल्बॅरो फर्नन्डेझ याने आणखी २००-३५० मैल पुढे जाऊन सिएरा लिओनपर्यंत शोध लावला. मात्र १४६१ पर्यंत त्याच्या पलीकडील किनाऱ्याचा कोणीही शोध लावला नाही. १४४६ साली सहाराचे वाळवंट आणि त्यातील ठिकठिकाणी विखुरलेले निर्झरप्रदेश यांची विश्वसनीय माहिती मिळविण्यात आली. १४५९ पर्यंत या किनाऱ्याच्या आसपासच्या निरनिराळ्या भागांतून हिंडून तेथील रानटी रहिवाश्यांना गुलाम करून त्यांना विकण्याचा धंदा यांनी जोरात चालविला होता. पण याचा परिणाम पोर्तुगीज लोकांनाही भोवल्याशिवाय राहिला नाही. कारण रानटी लोकांनीही यांच्यावर चोरटे हल्ले करून यांच्यापैकी काही पुढाऱ्यांनाच ठार केले. तेव्हा राजपुत्र हेन्रीला दुसऱ्याचे स्वातंत्र्य हिरावण्यात काय दुःख आहे, आणि त्यापायी आपल्या सुद्धा लोकांचे प्राण नाहक कसे जातात, याचा कटू अनुभव आल्यामुळे त्याने आपले धोरण बदलले. त्याने या रानटी लोकांशी सलोख्यानेच वागण्याचे धोरण आता स्वीकारून, त्यांच्याशी आपल्या लोकांचा संबंध जास्त जोडून आणण्याचा प्रयत्न सुरू केला. इकडे अझोर द्वीपसमूहात आणि मदिरा बेटात वसाहती स्थापणे आणि त्या वाढविणे या गोष्टी राजपुत्राने चालविल्याच होत्या. या बेटांतून इमारतींना उपयुक्त असे लाकूड, साखर, धान्य, मध, दारू या वस्तूंचा मुबलक पुरवठा पोर्तुगाल देशास होऊ लागला. १४५५ आणि १४५६ च्या दरम्यान कॅडमोस्टो, या खलाशाने

अगदी जवळचा संबंध आला. त्याने केप सेन्ट व्हिन्सेंटजवळ सॅग्रेस येथे आपल्या नावाचे शहर वसविले; याच शहरी तो पुढे १४३८ मध्ये काही काळ जाऊन राहिला आणि १४६० साली तो तेथेच मरण पावला.

१४३३ साली पोर्तुगालचा राजा जॉन हा वारला. पण राजाने मरण-समयी आपल्या मुलाला त्याने हाती घेतलेले हे शोध लावण्याचे काम तसेच चालू ठेवावे, असेच उत्तेजनपूर्वक सांगितले. विशेषत' केप बोजा-डोरला वळसा घालून, पुढे काय आहे हे शोधून काढण्यासाठी, लोकांच्या उपहासाकडे मुळीच लक्ष न देता, हर प्रयत्न करण्यात यावेत, असाच त्याने आग्रहपूर्वक सल्ला दिला आणि आनंदाची गोष्ट अशी की, १४३४ सालची गिल् इन्नेसच्या ताब्यातील राजपुत्राच्या गलबतांनी त्या भूशिराला वळसा घातला. १४३५ साली राजपुत्राच्या दुसऱ्या एका खलाशाने याही भूशिरापुढे १००–१५० मैल प्रवास केला आणि १४३६ साली तर ब्लँको भूशिरापर्यंत मजल मारण्यात आली. पुढे काही वर्षे राजकारणा-मुळे हे शोध लावण्याचे कार्य थांबवावे लागले. पण १४४१ साली आन्ताम गॉंकलवेझ याने गिनीचा किनारा गाठिला; आणि तेथील काही लोकांना त्याने गुलामही करून आणिले. विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्याने आपल्याबरोबर सोन्याची वाळूही आणिली. याचा परिणाम असा झाला की, बरेच धाडशी लोक या प्रदेशांचा शोध लावण्याच्या कामी आपण होऊनच पुढे येऊ लागले. विशेषतः व्यापारी आणि खलाशी लोक यांनी तर स्वयंस्फूर्तीनेच या कामी चंग बांधिला. १४४८ साली आर्ग्यु-इमच्या उपसागरावर एक किल्ला बांधण्यात आला. तेथून गुलामांचा व्यापार, जगात तो कायमचा बंद होईपर्यंत, या पोर्तुगीज लोकांनी मोठ्या जोरात चालविला होता.

राजपुत्र हेन्रीने आपल्या शहराची वाढ मोठ्या झपाट्याने जालविली होती. राजवाडा, चर्च आणि वेधशाळा अशा मोठमोठ्या इमारती १४४३

साली पूर्ण झाल्या. आता राजपुत्र हेन्री हा येथे जाऊन कायमचा राहिला होता; आणि येथून त्याने अनेक खलाशांना प्रदेशशोधार्थ पाठविण्याचा सपाटा चालविला. १४४४ ते १४४६ या दोन वर्षांच्या अवधीत जवळ जवळ ३० गलबतांनी यांत भाग घेतला होता. डिनिज डायस व न्युनो ट्रिस्टॅम या दोघां खलाशांनी १४४५ साली सेनेगॉल नदीचा शोध लावला. डायसने तर व्हर्द भूशिरास वळसा घातला आणि १४४६ मध्ये आल्व्हॅरो फर्नन्डेझ याने आणखी २००-३५० मैल पुढे जाऊन सिएरा लिओनपर्यंत शोध लावला. मात्र १४६१ पर्यंत त्याच्या पलीकडील किनाऱ्याचा कोणीही शोध लावला नाही. १४४६ साली सहाराचे वाळवंट आणि त्यातील ठिकठिकाणी विखुरलेले निर्झरप्रदेश यांची विश्वसनीय माहिती मिळविण्यात आली. १४५९ पर्यंत या किनाऱ्याच्या आसपासच्या निरनिराळ्या भागांतून हिंडून तेथील रानटी रहिवाश्यांना गुलाम करून त्यांना विकण्याचा धंदा यांनी जोरात चालविला होता. पण याचा परिणाम पोर्तुगीज लोकांनाही भोवल्याशिवाय राहिला नाही. कारण रानटी लोकांनीही यांच्यावर चोरटे हल्ले करून यांच्यापैकी काही पुढाऱ्यांनाच ठार केले. तेव्हा राजपुत्र हेन्रीला दुसऱ्याचे स्वातंत्र्य हिरावण्यात काय दुःख आहे, आणि त्यापायी आपल्या सुद्धा लोकांचे प्राण नाहक कसे जातात, याचा कटू अनुभव आल्यामुळे त्याने आपले धोरण बदलले. त्याने या रानटी लोकांशी सलोख्यानेच वागण्याचे धोरण आता स्वीकारून, त्यांच्याशी आपल्या लोकांचा संबंध जास्त जोडून आणण्याचा प्रयत्न सुरू केला. इकडे अझोर द्वीपसमूहात आणि मदिरा बेटात वसाहती स्थापणे आणि त्या वाढविणे या गोष्टी राजपुत्राने चालविल्याच होत्या. या बेटांतून इमारतींना उपयुक्त असे लाकूड, साखर, धान्य, मध, दारू या वस्तूंचा मुबलक पुरवठा पोर्तुगाल देशास होऊ लागला. १४५५ आणि १४५६ च्या दरम्यान कॅडमोस्टो, या खलाशाने

सेनेगॉल आणि गॅम्बिआ या नद्यांच्या काही भागांचा शोध लाविला आणि केप व्हर्ड बेटांचाही समूह हुडकून काढला. यानेच आफ्रिका खंडाच्या ज्ञात झालेल्या भागाचे व्यापारी मार्ग निश्चित केले आणि तद्देशीय लोकांची जास्त माहिती मिळविली. १४५८ साली राजपुत्र हेन्रीने या गॅंबिआ नीग्रो लोकांना ख्रिस्ती धर्माची दीक्षा देण्याकरिता, काही धर्मोपदेशकांना पाठविले आणि ख्रिस्ती धर्माचा प्रसार करण्याचे काम त्याने खऱ्या ख्राइस्ताच्या अनुयायाप्रमाणे केले. याप्रमाणे प्रदेशाचा शोध लावणे आणि धर्माचा प्रसार करणे या कामीच आपले आयुष्य खर्च करीत असता, हा राजपुत्र इ. स १४६० साली ख्रिस्तवासी झाला.

खलाशांना समुद्रावरून प्रवास करणे सोपे जावे म्हणून राजपुत्र हेन्रीने अनेक गोष्टी केल्या. त्याने माजोर्का बेटातून मास्टर जॅकोम् नावाच्या एका भूगोलशास्त्रज्ञाला आणून त्याला आपल्या शहरी कामावर नेमिले; आणि त्याच्या करवी नकाशे आणि निरनिराळी यंत्रसामग्री तयार करविली, आणि या गोष्टीचे शिक्षण इतर लोकांनाही देवविले. त्याचप्रमाणे त्याने अरबी आणि ज्यू गणितशास्त्रज्ञांनाही आपल्या पदरी बाळगिले होते. भूगोल विषय शिकविण्याकरिता सॅग्रेस शहरी जरी प्रत्यक्ष शाळा अशी नव्हती, तरी त्याने भूगोलाविषयी सर्व साधनसामग्री, नकाशे, यंत्रे उपकरणी आणि इतर साहित्य जमविले; आणि सर्व प्रकारची माहितीही गोळा केली. त्याचप्रमाणे शोध लावलेल्या नव्या प्रदेशासंबंधी नकाशे तयार करण्यात येत, आणि माहिती लिहून काढली जाई. यामुळे भौगोलिक अभ्यास करण्याचे आणि नव्या नव्या प्रदेशांचा शोध लावण्याचे प्रमुख केंद्र त्याच्या दरबारी प्रस्थापित करण्यात आले. तथापि, राजपुत्र हेन्रीचा नावलौकिक हा त्याच्या हयातीत जे शोध लावण्यात आले त्यामुळेच केवळ झालेला नसून, त्याने या कामी दाखविलेल्या चिकाटी-मुळे आणि यासंबंधी दिसून आलेल्या त्याच्या बुद्धिमत्तेमुळे पुढील

पिढ्यांतील लोकांना जी स्फूर्ती मिळाली, आणि त्यामुळे जे पुन्हा नवे नवे प्रदेश शोधण्यात आले, त्यामुळे होय. हा राजपुत्र म्हणजे नव्या नव्या प्रदेशांचा (विशेषतः समुद्रावरून सफरी करून) शोध लावण्याच्या कामातील आद्य प्रवर्तक होय आणि यामुळे सर्व मानवजातीवर त्याने अनंत उपकार करून ठेवले आहेत. पूर्वेकडील राष्ट्रे आणि पश्चिमेकडील राष्ट्रे यांच्यामधील समुद्रावरून दळणवळण प्रस्थापित करण्याचे कार्य जरी याच्या मरणोत्तर ४० वर्षांनी वास्को-डि-गामाने केले असले, तरी या कामास राजपुत्र हेन्रीनेच सुरुवात करून दिली, ही गोष्ट इतिहासकारांना विसरून चालावयाची नाही. डिगो कॅम, बार्थोलिम्यू डायस आणि वास्को-डि-गामा यांनी हे काम याच्या प्रोत्साहनामुळे का होईना पण पुढे पूर्ण केले.

१४८२ साली पोर्तुगॉलच्या दुसऱ्या जॉन राजाने नाविकांचा नेता राजपुत्र हेन्री याचे अर्धवट राहिलेले काम पूर्ण करण्याकरिता, डिगो कॅमला विषुववृत्ताच्या दक्षिणेकडील आफ्रिकेचा पश्चिम किनारा शोधून काढण्याच्या कामगिरीवर पाठविले. आपल्या दोन गलबतांनिशी प्रथम गिनीच्या किनाऱ्याकिनाऱ्याने जात जात तो जवळ जवळ विषुववृत्तापर्यंत आला. त्याच्याबरोबर ख्रिस्ती धर्माची दीक्षा घेतलेले काही नीग्रो लोक होते. या नीग्रो लोकांच्या मदतीने विषुववृत्ताच्या दक्षिणेकडे जितके जाता येईल तितके जाण्याचे त्याने ठरविले. विषुववृत्ताच्या दक्षिणेस असलेल्या लोपेझ भूशिरास वळसा घालून ते दक्षिण दिशेनेच चालले. विषुववृत्ताच्या दक्षिणेस ४०० मैलांहूनही जास्तच लांब ते गेले असतील. आणखी पुढे ते तसेच चालले; तो त्यांना एके दिवशी आपल्या पूर्वेकडे असलेल्या भूप्रदेशातून एक भला मोठा जलप्रवाह समुद्रालाही मागे रेटीत रेटीत समुद्रात घुसत आहे असे आढळून आले या प्रवाहाचे पाणी गोडे होते त्यावरून कॅम याने एकदम कयास केला की, कोणत्या तरी एखाद्या प्रचंड;

नदीचाच हा ओघ असावा. प्रवाहाच्या अनुरोधाने ते किनाऱ्यापर्यंत आले. आणि कॅम याने जो अंदाज बांधिला होता तो खरा ठरला. हीच ती अफ्रिका खंडातील प्रचंड कॉंगो नदी–जिच्या काठी घनदाट आणि अति निबिड असे जंगल हजारो मैल वाढलेले आहे, आणि जी विषुववृत्ताला दोनदा छेदून धनुष्याकार होऊन ज्या अक्षांशावर उगम पावते, त्याच अक्षांशाच्या अगदी जवळ जवळ येऊन प्रथम समुद्रास रेटीत अखेर समुद्रात विलीन होते. हिच्या मुखाशेजारी असलेल्या एका खडकाळ भूभागावर कॅमने एक दगडी खांब उभारला. त्यावर त्याने एक क्रॉसही बसविला. खांबावर ' हा सर्व भूप्रदेश पोर्तुगॉलच्या राजाचा आहे, ' असे वाक्यही त्याने कोरून ठेवले.

कॅमने या नदीच्या तीरातीराने जेथपर्यंत भूप्रदेशात जाता येईल तेथपर्यंत जाण्याचा प्रयत्न केला. पण नदीमध्ये ठिकठिकाणी लहानसहान धबधबे असल्यामुळे व वेगाने वाहणारे जलौघही असल्यामुळे त्याला शंभर मैलांपलीकडे जाता येईना. पण आपणच येथपर्यंत प्रथम आलो होतो, हे लोकांना पुढेमागे कळावे, म्हणून त्याने एका कड्याच्या मऊसर खडकावर ' पोर्तुगॉलचा जो सुप्रसिद्ध दुसरा जॉन राजा त्याची गलबते येथपर्यंत आली होती ' अशा अर्थाचे वाक्य पोर्तुगीज भाषेत कोरून ठेवले. अजूनही ते वाक्य तेथे जाणाऱ्या लोकांना वाचता येण्याइतके स्पष्ट आहे.

या नदीच्या दक्षिण तीरावर राहणारे मूळचे लोक रानटी असूनही ते कॅमशी आणि कॅमच्या लोकांशी सलोख्याने वागले. हे लोक काळे होते; आणि त्यांचे केस कुरळे होते. त्यांनी मोठमोठाले हस्तिदंत ह्यांना द्यावेत आणि ह्यांच्यापासून त्यांऐवजी कापड घ्यावे, ह्याप्रमाणे यांची देवघेव सुरू झाली. या विस्तीर्ण कॉंगो प्रदेशाचा भूपती तेथून पुष्कळच दूर असलेल्या आंतल्या घनदाट प्रदेशाच्या मध्यभागी राहत असून तो बलाढ्य आहे, अशी माहिती या लोकांपासून कॅमला मिळाली. कॅमने आपल्या बरोबरच्या काही नीग्रो लोकांना या भूपतीकडे सलोखा करण्या-

करिता पाठविले; पण ते परत येईपर्यंत त्याची वाट तेथेच न पाहता, कॉंगो नदीच्याही दक्षिणेकडील किनाऱ्याच्या शोधार्थ स्वतःची गलबते घेऊन तो निघाला. काही दिवसांनी तो परत कॉंगो नदीवर आला, तरी भूपतीकडे पाठविलेल्या लोकांचा पत्ता नव्हता; म्हणून त्याने तेथील काही रानटी लोकांना ओलीस धरले व पोर्तुगॉल देशास जाण्याकरिता निघाला. पोर्तुगॉल देशास परत आल्यावर राजाने त्याचा मोठा आदरसत्कार केला, व त्याला काही किताबही वहाल केले. दोन वर्षांनी कॅम पुन्हा कॉंगो नदीच्या काठी ओलीस घेतलेल्या लोकांना घेऊन आला. या लोकांना कॅमने मोठ्या ममतेने वागविले होते. पोर्तुगॉल देशातील मोठमोठ्या हवेल्या, राजवाडे, मंदिरे आणि इतर इमारती, राजरस्ते, शृंगारलेली गलबते आणि सुंदर सुंदर हरतऱ्हेचे पोशाख पाहून ते लोक थक्कच झाले होते. कॉंगो नदीवर आल्यानंतर कॅमने त्यांना मोकळे केले आणि त्यांच्या भूपतीकरिता मोठमोठाले मौल्यवान नजराणे देऊन त्यांना घरी जाण्यास परवानगी दिली.

नंतर कॅमने या खेपेस दक्षिण दिशेनेच पुष्कळ दूरवर प्रवास केला. कॉंगो नदीच्या दक्षिणेस जवळ जवळ तो १२०० मैल तरी गेला असेल. ठिकठिकाणी आपल्या नेहमीच्या पद्धतीस अनुसरून त्याने दगडी खांब उभे केले. तो जवळ जवळ आफ्रिकेच्या दक्षिण टोकापर्यंत गेला होता. पण हे त्याला स्वतःला माहीत नव्हते. आणखी काही अंतर तो तसाच गेला असता, तर आफ्रिका खंडास वळसा घालून राजपुत्र हेन्रीला भारत देशात येण्यास जो जलमार्ग पाहिजे होता, त्याचा शोध कॅमलाच लाविता आला असता. पण कॅमने जे कार्य केले ते काही कमी महत्त्वाचे नव्हते. त्याने पुढच्या प्रवाशांचा मार्ग येथपर्यंत तरी आखून दिल्यामुळे त्यांना येथपर्यंत विशेष त्रासाशिवाय येता येऊ लागले. निदान येथपर्यंत येण्याची त्यांची भीती पुष्कळच कमी झाली.

दिनांक

डीगो कॅमने येथपर्यंत शोध लावीत लावीत जो मार्ग आक्रमिला होता, तो पुढे तसाच शोधून काढण्याचे काम वार्थेलोम्यू डायस याने चालू केले. हा खलाशी कॅमपेक्षाही धाडसी होता. कॅम आपली दुसरी सफर पुरी करून आपल्या गलबतांनिशी लिस्बन् शहरी परत आल्यावर, डायस हा आपली तीन चिमुकली गलबते घेऊन पुढचा मार्ग शोधून काढण्याच्या इराद्याने, नव्हे ईर्ष्येनेच, निघाला. डायस हा यापूर्वीच गिनीच्या आखातापर्यंत एकदोनदा जाऊन आलेला होता. तसेच गिनीच्या किनाऱ्यावर ' एल् मिना ' नावाचा किल्ला बांधण्याच्या कामीही त्याने बरीच मदत केली होती. हा किल्ला म्हणजे गिनीच्या लोकांबरोबर सोने आणि इतर मौल्यवान् वस्तू यांचा व्यापार करण्याकरिता बांधलेली एक भली मोठी आणि सुरक्षित अशी वखारच होती. या प्रदेशातून पुढे इतके सोने पोर्तुगाल देशाला जाऊ लागले की, या किनाऱ्याला ' सोन्याचा किनारा ' (Gold Coast) हे सार्थ नाव देण्यात आले. डायसची गलबते इतकी लहान होती की, अज्ञात अशा जलसंचयावरून प्रवास करावयास त्याच्यासारखी छातीचीच माणसे पाहिजेत. मात्र गलबते लहान असली तरी त्यांचे बांधकाम भले भक्कम होते. डायस गिनीच्या किनाऱ्याने जात जात काँगो नदीपार गेला. तेथून डिगो कॅम जेथपर्यंत दक्षिणेकडे गेला होता, त्याच्याहि पलीकडे हा जाऊन पोहोचला. काही झाले तरी आफ्रिका खंडाच्या या किनाऱ्याचे ( म्हणजेच आफ्रिका खंडाचे ) दक्षिण टोक गाठावयाचेच, असा त्याने पणच लाविला होता. त्याप्रमाणे तो तसाच पुढे चालला. पण एकाएकी जोरजोराने वारे वाहू लागले आणि वादळाने इतका जोर केला की, त्यामुळे त्याची गलबते दक्षिणेकडे वाहत गेली आणि अखेर जमिनीचा मागमूसही नाहीसा झाला. वादळात जरी गलबते सापडली होती, तरी डायसला जमीन नाहीशी झाली म्हणून एक प्रकारचा आनंदच वाटला. कारण ज्या ईर्ष्येने हे धाडस

त्याने केले होते, ती ईर्षा सिद्धीस जाणार असे त्याला खात्रीने वाटू लागले. त्याने आपली गलबते पूर्वेकडे वळविली; कारण त्याच्या पूर्वेलाच जमीन होती आणि ती आता नाहीशी झाली होती. तेव्हा पूर्व दिशेने शोध करीत काही अंतर पुढे जाऊन नंतर उत्तरेकडे गेल्यास, आफ्रिका खंडाचा दक्षिण किनारा सापडेल, आणि मग दक्षिण किनाऱ्याने प्रवास करीत आफ्रिकेच्या पूर्व भागी जाता येईल, किंवा दक्षिण किनारा अरुंद असल्यास एकदमच पूर्व किनारा गाठता येईल, असा त्याने अंदाज बांधिला. हा अंदाज बांधण्यात आणि त्याप्रमाणे गलबते नेण्यातच त्याच्या अंगचे शहाणपण आणि साहस हे गुण दिसून येतात. आणि खरोखर त्याच्या अंदाजाप्रमाणे थोड्याच दिवसात त्यांना आफ्रिकेचा दक्षिण किनारा लागला, आणि नंतर दक्षिण किनाऱ्याकिनाऱ्याने पूर्वेकडे काही अंतर गेल्यावर ते एका उपसागराच्या किनाऱ्याला लागले. या किनाऱ्यावर त्यांना पिवळसर, काळसर वर्णाचे लोक आपल्या गुराढोरांना पाळताना आढळले; म्हणून या उपसागराला डायसने ‘ गुराख्यांचा उपसागर ’ हे सार्थ नाव दिले. या उपसागराचे हल्लीचे नाव ‘ मोसेल् ’ उपसागर असे आहे. यानंतर डायस तसाच पुढे पूर्वेकडे गेला आणि आफ्रिका खंडाला खरोखरच वळसा घालता येतो, अशी त्याने खात्री करून घेतली. त्याच्या मनातून आणखी तसेच पुढे जावयाचे होते. पण त्याच्या बरोबरीच्या लोकांनी पुढे जाण्याचे साफ नाकारले. “ आपण जो शोध लाविला तोच पुष्कळ महत्त्वाचा आहे. तेव्हा यापुढे जाऊन आपण आपला जीव जास्त धोक्यात घालू इच्छीत नाही. आम्हांला आमची बायकामुले केव्हा पाहू असे झाले आहे, आणि म्हणून आम्ही येथूनच परत फिरणार. ” असे त्यांनी निक्षून सांगितल्यामुळे डायसचे काही चालेना. डायसला भारताकडील पुढचा मार्ग शोधण्याचे काम येथेच अर्धवट टाकून परत फिरावे लागले. यामुळे

त्याची निराशा झाली खरी. कारण वास्को द-गामा किंवा कोलंबस यांच्या अंगी आपल्या हाताखालील लोकांवर, ते कितीही विरुद्ध असताही हुकूमत चालविण्याचे जे सामर्थ्य होते, ते सामर्थ्य याच्या अंगी नव्हते. डायस परत वळला आणि ज्या भूशिरापाशी त्याची गलबते वादळात सापडून दक्षिणेकडे लोटली गेली होती, त्या भूशिरास वादळाचे भूशिर हे नाव देऊन तेथून त्याने थेट आपल्या देशाची वाट धरिली. याच भूशिराचे सध्याचे नाव 'आशाजनक भूशिर' किंवा 'केप् ऑफ गुड् होप्' असे ठेवण्यात आले आहे. कारण आजपर्यंत भारतास जलमार्गाने जाणे शक्य आहे की नाही, याबद्दल बराच संशय होता. तो संशय डायसने या भूशिरास वळसा घातल्यामुळे कायमचा दूर झाला. याप्रमाणे डीगो कॅम आणि बार्थोलोम्यू डायस यांनी वास्को-द-गामाचे काम पुष्कळच सुकर करून ठेविले. १४९७ साली वास्को-द-गामाने भारतापर्यंत धडाडीने प्रवास करून भारतास जलमार्गाने जाता येते हे जगास सिद्ध करून दाखविल्यानंतर डायस हा स्वतः भारतापर्यंत जाण्यास १५०० साली निघाला. पण याही खेपेस त्याला यश आले नाही. कारण ज्या भूशिरास डायसने 'वादळाचे भूशिर' म्हणून नाव दिले होते. त्याच भूशिराशेजारी आल्यानंतर मागच्याप्रमाणेच त्याचे गलबत वादळात सापडले आणि दुर्दैवाने या खेपेस ते गलबत बुडाले, आणि डायस याला त्याच्या इतर खलाशांसह जलसमाधी मिळाली!

४

# क्रिस्तोफर कोलंबस

पाचशे वर्षांपूर्वी आपल्या भरतखंडाची कीर्ती त्या वेळी ज्ञात असलेल्या जगावर सर्वत्र पसरलेली होती, ही गोष्ट इतिहासावरून कळण्यासारखी आहे. "भारत नावाची एक, भरजरी आणि तलम सुताची वस्त्रे विणण्यात, सोन्याचांदीवर मूर्ती कोरण्यात आणि नक्षी काढण्यात आणि त्याचप्रमाणे इतर कलाकुसरीच्या कामात अत्यंत सुधारलेली, सर्वसंपन्न अशी सुवर्णभूमी, फल, धान्य व खनिज द्रव्यांनी नटलेली या जगतीतलावर पूर्वेकडे कुठेशी आहे," अशी कुणकुण पाश्चात्य राष्ट्रांच्या कानावर गेली होती. या भूमीचे दर्शन घडावे, तिचा आपला नित्य आणि निकट संबंध जडावा, असे प्रत्येक दूरदूरच्या राष्ट्राला त्या वेळी वाटत होते. हिंदुस्थानात उत्पन्न होणारे हरतऱ्हेचे पदार्थ परदेशी जात होते खरे; पण हा व्यापार भारत आणि युरोप यांच्या मध्यभागी असलेल्या मुसलमान राष्ट्रांच्या मध्यस्थीने होत होता. तथापि या मुसलमानी धर्माचे जसे हिंदुधर्माशी वाकडे होते, तसेच खिस्ती धर्माशीही पण या वेळी वाकडे आले होते. आणि व्यापार तर या लोकांच्या हाती. त्यामुळे भारत आणि युरोप यांच्या दरम्यान चाललेल्या व्यापारात मधून मधून खंडही पडत असे. मुसलमानी राष्ट्रे मध्यभागी असल्यामुळे ती राष्ट्रे

ओलांडल्याशिवाय भारत देशाशी प्रत्यक्ष दळणवळण ठेवणेही पाश्चात्य राष्ट्रांना अशक्य झाले. तेव्हा ही गोष्ट शक्य कशी करावयाची ?

युरोप खंडातील प्रत्येक प्रमुख राष्ट्रापुढे हा प्रश्न त्या वेळी प्रामुख्याने उभा होता. खुष्कीच्या मार्गाने म्हणजे जमिनीवरून प्रवास करून भरताशी संबंध जोडणे अशक्य असे ठरल्यावर तो मार्ग बाजूलाच सारण्यात आला. समुद्रावरून प्रवास करून भारत गाठावयाचे म्हटल्यास भूमध्यसमुद्र आणि तांबडा समुद्र यांमध्ये त्या वेळी आफ्रिका आणि आशिया या खंडांना जोडणारी सुएझची संयोगभूमी आड येत होती. आणि ही संयोगभूमी मुसलमानी सत्तेच्या कक्षेतच होती. त्याचप्रमाणे तांबड्या समुद्राच्या किनाऱ्यावर मुसलमानी राष्ट्रांचाच अंमल होता. तेव्हा हा जलमार्गही त्याज्यच ठरला.

याच वेळी पृथ्वी वाटोळी असावी अशी अंधुक कल्पना काही भूगोलशास्त्रज्ञांनी व्यक्त केली होती. ही कल्पना अगदीच नवी नव्हती खरी, पण प्रत्यक्ष ज्ञानाच्या अभावी या कल्पनेला मूर्त स्वरूप न आल्यामुळे ती सर्वमान्य होणे शक्य नव्हते. पण ही कल्पना जर खरी असेल तर, पश्चिमेकडून समुद्रावरून प्रवास करीत गेल्यास, आपल्या पूर्वेस असलेल्या भरतखंडास जाता येईल, असे काही काही कल्पक लोकांना खात्रीने वाटू लागले होते. पण पश्चिमेस पसरलेला प्रचंड महासागर लहानशा नाजूक नौकांतून ओलांडावयाचा कसा ? त्या वेळी तर पश्चिमेस असलेला ॲटलँटिक महासागर म्हणजे ती एक यमलोकाचीच वाट होय, अशी समजूत रूढ होती. मृत्यूचे साम्राज्य या अज्ञात महासागरापलीकडेच पसरले आहे, अशी भाविक लोकांची दृढ श्रद्धा होती तेव्हा या अज्ञात अशा जलमय प्रदेशापलीकडील निश्चित अशा मृत्युमुखी जाणूनबुजून शिरण्यास कोणी धजावयाचे ?

पण अशा मृत्युमुखीही उडी घेणारे काही साहसी प्रवासी पुढे आलेच अशा प्रवाशांपैकी क्रिस्तोफर कोलंबस हा या कालात पहिला होय.

आपल्या डोक्यावरून आकाशात गरगर फिरणारे विमान आज आपल्या पुष्कळ परिचयाचे झाले आहे. मोटारींना तर प्रत्येक रस्त्यावरून धावताना आणि केवळ शहरांतूनच नव्हे तर खेडोपाडी सुद्धा प्रत्येकाच्या दाराशी येऊन प्रवाशाला वाटेल त्या गावी घेऊन जाताना आपण पाहतोच. आगगाड्यांचे जाळे सर्वत्रच पसरलेले आहे. त्याचप्रमाणे प्रत्येक समुद्रावरून अजस्र आकारांच्या हजारो टन वजनाच्या बोटींच्या येरझारा रात्रंदिवस नियमितपणे सुरू आहेत आणि विमानेही शेकडो लोकांना एकाच वेळी घेऊन ताशी ३०० मैलांच्या वेगाने पृथ्वीभोवती रॉकेटस जात येत आहेत. आणि सेकंदास ३०० मैल वेगाने रॉकेटस पण आकाशाचा ठाव घेत आहेत आणि आकाशमान चंद्रावर उतरत आहे. पणसाडे पाचशे वर्षांपूर्वी प्रवासास जाणे म्हणजे परत न येणेअशीच लोकांची समजूत होती. आपल्या भारतातच काशीयात्रेला किंवा रामेश्वराच्या दर्शनाला जाणारे लोक बहुतेक या जगावरील आपली यात्रा ज्यांची संपत आली आहे, असेच वृद्ध असत. आज ज्या सुखसोयी आपणास अनुभविता येतात, त्या तर त्या वेळी नव्हत्याच; उलट जमिनीवरील प्रवास खरोखरच म्हणजे अक्षरशः कंटकमय असेल तर जलाशयावरील नौकागमन अत्यंत धोक्याचे असे असे. कारण जलसमाधि केव्हा मिळेल याचा त्या काळी काहीच नेम नसे.

असो. क्रिस्तोफर कोलंबस हा मूळचा राहणारा जिनोआ बंदराचा. हा तेथील एका विणकऱ्याचा मुलगा. पण जिनोआ बंदरामध्ये येणारी जाणारी गलबते तासनतास पाहत बसण्याचा या निळ्या पाणीदार डोळ्यांच्या कणखर मुलाला एक प्रकारचा नादच लागून राहिला होता. होता होता तो नावाडी तर बनला आणि कालांतराने हा मोठ्या निधड्या छातीचा धीट मुलगा एका गलबताचा कप्तानही झाला. इंग्लंडपर्यंत याने कैक सफरी केल्या. एकदा तर तो ‘ आइसलंड ’ बेटापर्यंतही मोठ्या

धडाडीने जाऊन आला. पुढे तो पोर्तुगाल देशाची राजधानी लिस्बन या शहरी जाऊन राहिला. यात त्याचा एक हेतू होता. त्या वेळी लिस्बन शहर हे नाविक लोकांचे प्रसिद्ध ठिकाण होते. येथे बहुतेक प्रमुख प्रवासी जमत, याच शहरी नकाशे आणि इतर प्रवासोपयोगी उपकरणी करणारे कारागीरही राहत असत क्रिस्तोफरास या सर्व गोष्टींची शास्त्रीय माहिती मिळवून घ्यावयाची होती, आणि ज्यांनी ज्यांनी दूरदूरपर्यंत प्रवास केला होता, त्यांच्या स्वतःच्या मुखाने निवेदन केलेली त्यांच्या प्रवासांची वर्णनेही त्याला ऐकावयाची होती.



क्रिस्तोफर कोलंबस

हळूहळू पृथ्वी वाटोळी आहे अशी कोलंबसाची खात्री पटत चालली होतीच; आणि याच वेळी टोस्कनेली या नावाच्या एका इटॅलियन नकाशा-

काराने तयार केलेला जगाचा नकाशा याच्या हाती आला. या नकाशात जपानी बेटे अ‍ॅटलँटिक महासागराच्या पश्चिम भागी दाखविण्यात आली होती आणि तीही फार दूर नव्हेत. हा नकाशा पाहून कोलंबसाला एक प्रकारचा हुरूपच आला. कारण आजपर्यंत त्याने जितक्या जास्तीत जास्त लांबीचा प्रवास केला होता, त्याहून विशेष लांबीचा प्रवास हा खात्रीने होणार नाही असे त्याच्या मनाने घेतले. अ‍ॅटलँटिक महासागराच्या पलीकडे जमीन असली पाहिजे, हे त्याचे मत दृढ व्हावयाला आणखीही काही कारणे होतीच. युरोप खंडाच्या पश्चिम किनाऱ्याला लागून केव्हा केव्हा युरोप खंडात कुठेही न उगवणाऱ्या झाडाझुडपांच्या फांद्या, फुले व फळे, ही तर समुद्रातल्या लाटांबरोबर येऊन तरंगत असतच. शिवाय क्वचित प्रसंगी चित्रविचित्र रंगांनी पुसकट रंगविलेली, आणि ज्यांच्या डोक्यावर अस्ताव्यस्त पिसे लटकत असत अशी विचित्र प्रेते किनाऱ्यावर आपटत असलेली आढळून येत. यावरून काही लोकांनी असा शास्त्रशुद्ध तर्क बांधिला की, ज्या अर्थी झाडाझुडांची जमिनीशिवाय वाढ होणे शक्य नाही आणि ज्या अर्थी मनुष्य प्राणी हा भूमीवरच राहू शकतो, त्या अर्थी अ‍ॅटलँटिक महासागराच्या पलीकडे खात्रीने काही तरी जमिनीचा प्रदेश असला पाहिजेच.


या कल्पनेने कोलंबसाला इतके आपलेसे केले की, तो रात्रंदिवस सारखा याच विचारात गुंग होऊन राहू लागला. पण घरच्या गरिबीमुळे आपल्या स्वतःच्याच जोरावर अज्ञात समुद्रापलीकडे मदतीशिवाय जावयाचे कसे ? अंगात हिम्मत नव्हती असे नव्हे; पण गलबते तरी धड, टिकाऊ अशी पाहिजेत ? आणि प्रवास किती दिवसांचा होणार हे तरी त्याला नक्की कोठे माहीत होते ? काही झाले तरी सहासात महिन्यांपेक्षा जास्त कालावधी लागणार हे उघड उघड दिसत होते; निदान इतक्या दिवसांची तयारी तरी आपल्यापाशी पाहिजे असे त्याला वाटले असले पाहिजे. आणि

अगदी एकटे कसे जावयाचे ? बरोबर थोडे तरी खलाशी जोडीदार म्हणून पाहिजेतच. मग या सर्वांच्या पोटापाण्याची व्यवस्था ? इतकी बेगमी आणावयाची कोठून ? समुद्रावरून प्रवास करणाऱ्यांना पोटापेक्षा पाण्याची फारच गरज असते. समुद्रात पाणी नसते म्हणून नव्हे, तर प्यावयास गोडे पाणी लागते म्हणून. पाण्यामुळे समुद्रावरून प्रवास करताना अनेक साहसी प्रवाशांचे कसे हालहाल झाले हे आपणांस पुढे मागे कळून येणार आहेच.

असो. याच्या मनास याच कल्पनेचे अहोरात्र वेड लागले असल्यामुळे या हिम्मतबहादराने अनेक राजेरजवाड्यांपाशी तोंड वेंगाडले. आपली कल्पना त्यांना पटवून देण्याचा त्याने प्रयत्न केला. काहींना कल्पना पटे, पण त्यांचे मन तयार होत नसे. तो कोणकोणत्या देशांच्या राजांकडे गेला, प्रत्येक प्रसंगी त्याला निराश कसे व्हावे लागले, इत्यादी गोष्टी सांगण्याची विशेष गरज नाही. गरजवंताला अक्कल नसते, एवढे मात्र त्याच्या खास अनुभवास आले. पण त्याने चिकाटी सोडली नाही. अखेर त्याच्या प्रयत्नाला यश आलेच. स्पेन देशाच्या राजाराणींनी–विशेषतः राणीने–त्याला मदत करण्याचे कबूल केले; आणि वचनाला जागून त्यांनी कोलंबसाच्या स्वाधीन चिमुकली अशी तीन गलबते केली. कोलंबसालाच या ताफ्याचा मुख्य म्हणजे ॲडमिरल केले. कोलंबसाचा आनंद गगनात मावेना. पण त्याला पुढचे कार्य करावयाचे होते म्हणून त्या कार्यास तो ताबडतोब लागला.

ता. ३ ऑगस्ट १४९२ हा दिवस कोलंबसाच्या आयुष्यातील सोन्याचा खरा; पण हाच दिवस जगाच्या इतिहासातीलही महत्त्वाचा आहे. या रोजी स्पेनच्या पॅलॉस बंदरातून आपल्या ‘सांटा मेरिआ’ (पवित्र मेरी), ‘पिंटा’ आणि ‘निना’ या तीन छोट्याच पण पुढे जगद्विख्यात होणाऱ्या गलबतांना घेऊन, खरोखरच कविगुरू कालिदासाने रघुवंशाच्या आरंभी गाइलेल्या “ तितीर्षुर्दुस्तरं मोहादुडुपेनास्मि सागरम् ” या प्रसिद्ध चरणाप्रमाणे ॲटलँटिक महासागराचा प्रशस्त आणि दुस्तर असा जलप्रदेश

ओलांडून जाण्याच्या महत्त्वाकांक्षेने तो निघाला. सगळ्याच गलबतांचा कोलंबस हा प्रमुख होता खरा; पण त्याने स्वतः 'सांटा मेरिआ' या गलबताचे प्रत्यक्ष पुढारीपण आपल्याकडे घेतले. आणि दुसऱ्या दोन गलबतांचे पुढारीपण त्याने आपल्या विश्वासातल्या दोन कुशल खलाशांना दिले. इतर खलाशी मात्र संतुष्ट नव्हते. त्यांना मनापासून या जलाशयावरून प्रवासास जाणे पसंत नव्हते. केवळ राजाच्या सांगण्या-



सांटा मेरिओ

वरून त्यांना जावे लागत होते. कोलंबसाने पुढचा प्रवास सोडून द्यावा म्हणून दोघा खलाशांनी तिसऱ्याच दिवशी 'पिंटा' गलबताचे सुकाणू नादुरुस्त करून ठेविले. पण तात्पुरते ते दुरुस्त झाल्यावर ही गलबते स्पेनच्या दक्षिणेस सुमारे तिसाव्या अक्षांशावर असलेल्या कॅनरीज बेटाला


येऊन लागली. या ठिकाणी 'पिंटा' गलबत पूर्णपणे दुरुस्त करण्यास चांगले तीन आठवडे लागले.

ता. ६ सप्टेंबर रोजी ही गलबते पुढचा प्रवास करण्यास पुन्हा सिद्ध झाली. कॅनरीज बेटापर्यंतचा मार्ग अगदीच अनोळखीचा नव्हता. तेथपर्यंत पुष्कळ गलबते जात येत असत. यापुढे मात्र अज्ञात प्रदेशात शिरावयाचे होते. तेथे कोलंबसाने मोठ्या हिंमतीने आणि हिमकतीने आपल्या गलबतांना घेऊन खरोखरच अंधारात उडी घातली. ता. ९ सप्टेंबरला कॅनरीज बेटांचा म्हणजे ज्ञात भूगोलाचा अखेरचा किनारा दृष्टीआड झाला. त्यासरशी इतर खलाशांचे धाबे दणाणून त्यांनी परत फिरण्याबद्दल कोलंबसाची नाना तऱ्हांनी विनवणी केली; हरप्रकारे त्याला गळ घातली; पण त्याचा त्या धाडशी वीराच्या मनावर काहीच परिणाम झाला नाही.

सप्टेंबर महिन्याच्या १६ व्या तारखेस ही गलबते उत्तर गोलार्धातील ईशान्येकडून नैर्ऋत्येकडे संथपणे वाहणाऱ्या नित्य वाऱ्यांच्या म्हणजे व्यापारी वाऱ्यांच्या कक्षेत गेली. त्यामुळे त्यांचा प्रवास मोठ्या झपाट्याने होऊ लागला. दिवसामागून रात्र, रात्रीमागून दिवस भराभर गेले. डोक्यावर निरभ्र निळेनिळे आकाश आणि सभोवती पांढऱ्या फेसाने आणि अगणित लाटांनी व्यापलेला अमर्याद सागर. तथापि सर्व खलाशांना या अति वेगाने होणाऱ्या प्रवासामुळे एक प्रकारचा नवा उत्साह वाटू लागला त्यांची उदासीनता नष्ट होऊन त्यांच्या चेहऱ्यांवर प्रसन्नता आली, आणि प्रत्येकाच्या मनात आशा प्रबळ झाली. कोलंबसाने रोज किती मैलांचा प्रवास झाला याची नोंद ठेविली होती. पण ही गोष्ट त्याने कोणालाही कळविली नाही. गलबते थेट पश्चिमेकडे चालली होती. होता होता वाऱ्याचा जोर कमी पडू लागला त्यामुळे गलबतांची गतिही मंदावली. पण जपानच्या किंवा भारताच्या किनाऱ्याचा अद्याप थांग लागेना. आता समुद्राच्या ज्या भागातून प्रवास चालला होता तो भाग शेवाळ, दर्भ, बोरू

आणि समुद्रात वाढणाऱ्या इतर वनस्पती यांनी व्यापून गेला. होता, त्यामुळे या जाळ्यातून मार्ग काढणे गलबतांना फारच जड जाऊ लागले.

कित्येक वेळा रात्रीच्या वेळी समोर दूरवर जमीन दिसल्याचा त्यांना भास होई. कॅनरीज बेटे सोडून तीन आठवडे झाल्यावर एके दिवशी सूर्यास्तानंतर 'पिंटा' गलबताच्या कप्तानाने आपल्याला जमीन दिसली



निना गलबत


म्हणून मोठ्या आनंदाने आरोळी दिली. कोलंबसाने आणि सर्व खलाशांनी ईश्वराची मनःपूर्वक प्रार्थना केली. कारण 'निना' आणि 'सांटा मेरिआ' याही गलबतांच्या खलाशांना समोर जमीन दिसल्याचा भास झाला. पण दुसऱ्या दिवशी जमिनीच्या ऐवजी ते ढग ठरले. पुढे त्यांना काही पक्षी आढळले. लहानपक्षी समुद्रातील माशांना आपल्या चोचीत धरून वर आणीत तो त्यांवर मोठे पक्षी झडप घालीत, आणि त्यांच्या चोचीतले

मासे हिसकावून घेत. ज्या अर्थी हे पक्षी येथील वातावरणात उडत आहेत त्या अर्थी जवळपास कुठे तरी जमीन असावी, असा त्यांनी कयास बांधला. या तीन गलबतांपैकी 'निना' गलबत जास्त वेगवान होते. ज्याला प्रथम जमीन दिसेल त्याला स्पेनच्या बादशहाकडून मोठे वक्षीस मिळावयाचे होते. एके दिवशी सकाळी 'निना' गलबतावरील कप्तानाने आपल्या गलबतावर निशाण उभे केले आणि तोफ उडविली. जमीन दिसली रे दिसली की, ती गोष्ट सर्वांना कळकण्याकरिता ही योजना ठरविण्यात आली होती. पण पुन्हा 'दिसली ती जमीन नव्हे' असे ठरले. तेव्हा मात्र सर्व खलाशांनी यापुढे एक पाऊलभरही जावयाचे नाही असे ठरविले.

पुन्हा सर्वत्र निराशेचे साम्राज्य पसरले. खलाशांच्या मनांनी कच खाल्ली; आणि जिवावर उदार होऊन कोलंबसाविरुद्ध त्यांनी बंड पुकारले. त्याने परत फिरावे म्हणून त्यांनी पुन्हा एकदा नेटाचा प्रयत्न करून पाहिला, पण व्यर्थ. पूर्वी कोलंवसाच्या कणखर मनावर ज्याप्रमाणे त्यांच्या विनवण्यांचा परिणाम झाला नव्हता, तसाच या वेळी या बंडाचाही परिणाम त्याच्या अढळ मनावर झाला नाही. त्याच्या कार्यकठोर मनाला पूर्वी जसा पाझर फुटला नव्हता, तसे आता त्याचे धीट मन कचरले नाही. त्याने पुढे जाण्याचा आग्रह सोडला नाहीच, उलट या बंडखोर खलाशांची मने शांत करून त्यांना पुन्हा त्याने ताळ्यावर आणिले.

पुन्हा तीन दिवसांचा प्रवास तसाच धीरे धीरे करण्यात आला. तिसऱ्या दिवशी समुद्रावर काही बोरीच्या झाडांच्या फांद्या बोरांसहित तरंगताना त्यांना आढळल्या. सॅंडपाइपर नावाचे पक्षीही डोक्यावरून उडताना दिसले. आणि तिसऱ्या दिवशी रात्री दहा वाजता खुद्द कोलंबसाला मिण मिण होणाऱ्या दिव्याचा उजेड कमीजास्त होताना दिसला. कोलंबस या वेळी मात्र हर्षामुळे हुरळून गेला नाही. कारण त्याला वाटले असावे "कोणी सांगावे पुन्हा निराश होणार नाही

म्हणून ! " तथापि, त्याने सर्वांना नीट न्याहाळून लक्ष ठेवण्यास सांगितले रात्री दोन वाजता ' पिंटा ' गलबताने जमीन सापडल्याची खूण दिली. उजाडेपर्यंत सर्व गलबते जागच्या जागी थांबवावीत, असा कोलंबसाने हुकूम दिला. सुप्रभाती आपल्यासमोर जमीनच असल्याचे त्यांना दिसून आले. एका बेटाचा तो वालुकामय किनारा होता त्या किनाऱ्यावर त्या बेटातील नागवे रानटी लोक इतस्ततः धावत होते, आणि हे नवे लोक येथे का आले आहेत, हे एकत्र जमून आश्चर्यपूर्वक पाहत होते.



पिंटा गलबत

कोलंबसाचा आनंद त्रिभुवनात मावेना. सतत दहा आठवडे जलपर्यटन केल्यानंतर आणि अनेक वेळा निराश झाल्यानंतर, ज्या आशेने तो निघाला होता ती त्याची आशा सफल झाली. तो दिवस म्हणजे तारीख १२ ऑक्टोबर १४९२ हा होय. कोलंबस हा स्वतः, इतर गलबतांचे

प्रमुख आणि काही नावाजलेले खलाशी यांना बरोबर घेऊन, एका नावेत उतरला व आनंदाच्या जयघोषात त्या सर्वांनी जमिनीवर पाय ठेविले. नंतर तेथे एक काठी रोखून तीवर स्पेनचे निशाण, राजाच्या नावाचा त्रिवार उच्चार करून, फडकविण्यात आले. त्या बेटाला कोलंबसाने ' सॅन सॅल्व्हॅडोर ' ( पवित्र रक्षक ) हे नाव दिले; आणि त्याने त्या बेटावर स्पेनच्या राजाचा हक्क सांगितला. कोलंबसास आणि त्याच्या लोकांना बेटावर आलेले पाहून रानटी लोक प्रथम पार पळून गेले होते. पण काही वेळाने ते परत आले. कोलंबसाने या लोकांचे पुढीलप्रमाणे वर्णन केले आहे :

" ते रंगाने निमगोरे आहेत. त्यांच्या शरीराचा बांधा नीटस असून त्यांचा चेहरा गोंडस दिसतो. मात्र त्यांच्या डोक्यावरील केस राठ आणि तुटके आहेत. काही लोक आपले अंग पांढऱ्या रंगाने रंगवितात, तर काही तांबडया रंगाने रंगवितात. काही सर्वच शरीर रंगाने माखतात, तर काही डोळे किंवा नाकेच तेवढी रंगवितात. त्यांना शस्त्रांची काहीही माहिती नाही असे दिसते. कारण जेव्हा मी त्यांना तरवारी दाखविल्या, तेव्हा त्यांनी त्या धारेच्या बाजूनेच धरल्या. त्यामुळे त्यांच्या बोटांना जखमा झाल्या.

" या लोकांना होडयात बसणे माहीत आहे. त्यांनी आपली होडगी झाडाच्या बुंध्यांची आणि खोडांची बनविली आहेत. हे बुंधे आणि खोड एवढाले मोठे असतात की, एका एका बुंध्याच्या जोड न देता केलेल्या होडयातून चाळीस ते पंचेचाळीस लोक सहज बसतात. मात्र कित्येक होडया केवळ एका मनुष्यालाच बसता येईल इतक्या लहान आहेत; आणि उलथन्याच्या आकाराच्या वल्ह्यांनी ते लोक ह्या होडया मोठ्या वेगाने वाटेल तेथे नेतात. यदाकदाचित जर एखादे होडगे उलटलेच तर ते पोहतात आणि होडग्यातले पाणी काढून टाकल्यानंतर पुन्हा त्यात बसतात.


"येथील लोकांना सोने माहीत आहे. कारण कित्येकांनी आपल्या नाकांतून सोन्याची कडी घातलेली आहेत. मी त्यांना खुणांनी त्याबद्दल विचारल्यानंतर त्यांच्याकडून काही माहिती खुणांनीच कळली. त्यावरून दक्षिणेस एक राजा असून त्याच्यापाशी सोन्याची पुष्कळ भांडी आहेत असे मला समजले."

आपण खरोखरच भारताच्या आसपास असलेल्या एका बेटास येऊन पोहोचलो आहोत, असे कोलंबसाला वाटले. पण त्याचा समज चुकीचा होता. उत्तर अमेरिकेच्या दक्षिणेस असलेल्या मेक्सिकोच्या आखातातील बहामा नावाची जी बेटे आज इंग्लंडच्या ताब्यात आहेत त्यांपैकी वॅटलिंग् नावाने जे बेट सध्या संबोधिले जाते ते हे बेट होय. आपण अमेरिका खंडाचा शोध लाविला आहे, ही गोष्ट त्याच्या ध्यानीमनीही नव्हती. तथापि दक्षिणेस एका राजापाशी सोन्याची भांडी आहेत, असे येथील लोकांनी त्याला सांगितले होते. त्या राजाचा देश शोधून काढण्याचा त्याने आपल्या मनाशी बेत ठरविला. सॅन सॅल्व्हॅडोर बेटातील लोकांना कोलंबसाने तांबड्या टोप्या, काचेचे मणी आणि दुसऱ्या असल्याच चिजा दिल्या. त्यामुळे हे लोक अत्यंत खूप झाले. या लोकांकडून कोलंबसाला आणि इतर खलाशांना पोपट, कापसाच्या सुताचे गुंडे आणि त्या बेटात होणाऱ्या अशाच इतर वस्तू मिळाल्या. या लोकांना खूष केल्यानंतर त्यांच्यापैकी सहा-सात लोकांना आपल्याबरोबर वाटाड्ये म्हणून घेऊन कोलंबस सोन्याच्या शोधार्थ निघाला. त्याला तेथे पुष्कळच बेटे आढळली. त्याने त्या सर्वांवर स्पेनच्या राजाराणीचा हक्क सांगून एकाला 'फर्नान्डिनो' हे राजाचे नाव दिले, दुसऱ्याला 'इसाबेला' हे राणीचे नाव दिले, आणि त्याचप्रमाणे तिसऱ्या एका बेटाला राजपुत्राचे 'ज्युअन' हे नाव दिले. या बेटाचे पूर्वीचे नांव 'क्युबा' असून हल्ली हे बेट याच नावाने ओळखले जाते. क्युबा बेट सर्व बेटांत मोठे असून याच्या आजू-

बाजूला असलेल्या काही बेटांत मनुष्यभक्षक लोक राहत असत. या लोकांची इतर बेटांतील लोकांना फार भीती वाटत असे. नरमांसभक्षक लोकांना कॅरिब हे नाव इतर बेटांतील लोकांकडून देण्यात आले होते. हे नरमांसभक्षक लोक ज्या बेटात राहत असत त्या बेटांना 'कॅरिबिअन बेटे' हे नाव पडले असून, त्यांच्या शेजारी असलेल्या समुद्रास कॅरिबिअन समुद्र म्हणतात.

कोलंबसाचा खरा मनोरथ पूर्ण झाला नाही हे खरे. सोन्याच्या शोधार्थ जरी तो अनेक बेटे हिंडून आला, तरी त्याला सोने मिळाले नाही. हे जरी खरे असले, तरी मसाल्याचे पदार्थ, गोंद, कापूस, तंबाखू, राताळी, आरारूट यांसारख्या उष्ण कटिबंधात आणि बराच पाऊस पडणाऱ्या प्रदेशात उगवणाऱ्या वनस्पती आढळल्या. येथील लोक जरी नागवे असत, तरी त्यांनी कापसाच्या सुतापासून मोठमोठाली जाळी विणली होती. ही जाळी दोन झाडांच्या खोडांना बांधून त्यांत हे लोक निजत. राताळ्याच्या पिठापासून हे लोक भाकऱ्या करीत. कोलंबसाने तेथून आणिलेल्या तंबाखूचा प्रसार आपल्या भारतातही या नाही त्या रूपाने सर्वत्र झालेला आहेच.

दहा आठवडे याप्रमाणे निरनिराळ्या बेटांतून हिंडून आल्यानंतर कोलंबस परत स्पेन देशाला जाण्याच्या विचारास लागला. मध्यंतरी 'पिंटा' गलबताची आणि दुसऱ्या दोन गलबतांची ताटातूट झाली. त्यानंतर एके दिवशी कोलंबस दमून भागून निजला असताना सुकाणूवाल्याने सुकाणूचा दांडा एका मुलाच्या हवाली केला; आणि स्वतः कोठे इतडेतिकडे करावयास गेला. तेव्हा अपरात्री गलबत प्रवाहामुळे धारेला लागून भलतीकडे वहात गेले, आणि वाळूच्या बांधावर अडकून उलटून बसले. शेवटी त्या गलबतावरील माल इतर सामान कसेबसे होड्यांच्या साहाय्याने उतरून घेऊन 'निना' गलबतावर नेण्यात आले. आता या एकाच गलबतानिशी कोलंबसास परतावयाचे असल्यामुळे, त्याने आपल्यापैकी काही लोकांची




खिस्तोफर कोलंबसाने
आक्रमिलेला जलमार्ग

सॅन्सॅल्व्हॅडोर बेटावर राहण्याची व्यवस्था केली. त्याने त्यांच्याकरिता एक बुरूज बांधून देऊन तेथील मूळच्या रहिवाशांची आणि त्यांची मैत्री करून दिली.

नंतर तेथील काही रानटी लोकांसह कोलंबस 'निना' गलबतातून परत येण्यास निघाला. दोन दिवसांनंतर 'पिंटा' गलबताची वाटेत गाठ पडली. वाटेत एका बेटावरील रानटी लोकांची व त्यांची मारामारी झाली; म्हणून तेथून ते लगोलग निघाले. 'पिंटा'ची डोलकाठी बिघडल्यामुळे शीड बांधता येईना. म्हणून प्रवास वेताबेतानेच करावा लागला. तथापि, प्रतिव्यापारी वाऱ्यांचा आणि 'गल्फस्ट्रीम' प्रवाहाचा त्यांना बराच उपयोग झाला. फेब्रुवारी महिना उजाडला. समुद्रात वादळे होऊ लागली तुफानी वारा आणि प्रचंड लाटा यांच्या माऱ्यापुढे या लहानशा गलबतांचा निभाव लागेना. शेवटी 'पिंटा' गलबत बुडालेच. तेव्हा कदाचित् आपल्या राहिलेल्या गलबतालासुद्धा आणि त्याबरोबर सर्वांनाच जलसमाधी मिळाल्यास आपल्या जलपर्यटनाची सर्व हकीकत स्पेनच्या राजाराणींना कळावी म्हणून एका कातडी कागदावर सर्व वर्णन त्याने लिहून काढिले, आणि तो कागद एका पिपात घालून ते पीप समुद्रावर तरंगत सोडले. ते पीप केव्हा तरी कुणाच्या हाती लागून आपल्या प्रवासाची हकीकत जगाला कळेल, अशी त्याची अपेक्षा होती. तथापि या वादळातून कसेबसे निभावून हे गलबत एकदाचे अझोर बेटास येऊन पोहोचले. तेथे काही दिवस विश्रांती घेऊन पुन्हा ते वाटेला लागले. मध्यंतरी पुन्हा वादळ सुरू झाले. वारा, पाऊस व गारा यांचा वर्षाव होत होताच; आणि प्रचंड लाटांमुळे गलबत वाऱ्यावरच तरंगत आहे की काय असे त्यांना वाटे. पण याही वादळातून निभावून ज्या बंदरातून कोलंबस निघाला होता त्या पॅलॉस बंदरीच ता. १५ मार्च १४९३ रोजी तो परत येऊन पोहोचला. कोलंबसाचे आणि त्याच्याबरोबरच्या

खलाशांचे राजा आणि राणी यांच्याकडून आणि स्पेन देशातल्या सर्व लोकांकडून मोठ्या आदराने स्वागत करण्यात आले. यानिमित्त भला मोटा दरबार भरविण्यात येऊन त्या दरबारात कोलंबसाचा मानमरातब करण्यात आला. त्याने आपल्याबरोबर आणिलेल्या वस्तूंची लोकांनी मोठ्या कुतूहलपूर्वक पाहणी केली. कोलंबसाने आपल्याबरोबर आणिलेल्या रानटी लोकांनाही त्यांनी प्रेमाने वागविले.

कोलंबसाने त्यानंतर पुन्हा तीन वेळा याच बेटांकडे सफरी केल्या आणि काही नव्या बेटांचा तसेच द. अमेरिकेच्या किनाऱ्याचा शोध लावला. पहिली सफर यशस्वी झाल्यामुळे पुढे त्याच्याबरोबर जाण्यास लोक केव्हाही एका पायावर तयार असत. याचा परिणाम असा झाला की, कोलंबस हा जन्माने स्पॅनिअर्ड नसल्यामुळे स्पेन देशातील लोक त्याचा हेवा करू लागले. त्यांनी राजाराणींना पुष्कळ खोट्यानाट्या गोष्टी सांगून त्यांच्याच आज्ञेने कोलंबस एका सफरीवरून परत येत असताना वाटेतच त्याला त्यांनी कैद करविले. पुढे राजाराणींना खऱ्या गोष्टी कळून आल्यानंतर त्याची सुटका झाली, आणि त्यांनी त्याबद्दल आपल्याला वाईट वाटल्याचे बोलूनही दाखविले ही गोष्ट खरी. पण जग हे असे विचित्र आहे. ज्याने छाती करून अफाट आणि अज्ञात असा महासागर ओलांडून नव्या जगाचा मार्ग शोधून काढला ज्याचे राजदरबारात मोठ्या थाटाने स्वागत झाले होते, त्याच मनुष्याला एका अंधारकोठडीत काही दिवस का होईना पण खिचपत पडावे लागलेच. हा एक दुर्दैवविपाकच! यानंतरचे कोलंबसाचे पुढचे आयुष्य सुखात असे गेले नाहीच. १५०६ साली शेवटची सफर करून आल्यानंतर लवकरच कोलंबसाने येथील इहलोकच्या सफरी पुऱ्या करून परलोकची सफर करण्यासाठी प्रयाण केले. ज्याने नवे जग शोधून काढले तो वीरपुरुष अखेर अतिशय गरिबीत ना घर, ना दार, ना पैका, ना स्नेही-सोबती अशा स्थितीत मरण पावला. दुर्दैव !!

कोलंबसाने नव्या जगाचे दार शोधून काढिले खरे, पण त्याच्या मूळ समजुतीप्रमाणे ज्या बेटांचा त्याने शोध लाविला ती बेटे भारताच्या पूर्वेस असलेलीच असावीत असे त्याला वाटल्यावरून त्याने त्या बेटांना 'इंडीज बेटे' असे नाव दिले होते. पण पुढे भारताच्या पूर्वेस असलेली बेटे ती ही नव्हेत, हे कळून आल्यानंतर या बेटांचे नाव समूळ न बदलता या बेटांना 'वेस्ट इंडीज' असे व संबोधण्यात आले. म्हणजे 'पश्चिमेकडील इंडीज बेटे' एवढाच मूळ नावात फरक करण्यात आला; आणि भारताच्या पूर्वेकडील बेटास 'ईस्ट इंडीज' हे नाव देण्यात आले.

असो. येथे अशी एक शंका म्हणा किंवा प्रश्न म्हणा उत्पन्न होण्या-सारखा आहे की, कोलंबसापूर्वी ॲटलँटिक महासागर ओलांडून जाण्याचा मुळीच प्रयत्न का करण्यात आला नाही? कोलंबसापूर्वी साहसप्रिय खलाशी मुळी नव्हतेच की काय? याचे खरे कारण असे आहे की, युरोप खंडाजवळून वाहणारे समुद्रप्रवाह किंवा नित्य वारे हे युरोप खंडाकडून अमेरिका खंडाकडे जात नसून अमेरिका खंडाकडून युरोप खंडाकडे येत असतात. त्या काळी गलबताचे जाणे-येणे, प्रवाह आणि वारे यांच्या अनुकूलतेवरच बरेचसे अवलंबून असे. कारण त्या काळी हल्लीप्रमाणे वाफेने चालणाऱ्या बोटी नव्हत्या; म्हणून प्रवाहाच्या आणि वाऱ्याच्या विरुद्ध दिशेने गलबते नेण्यास खलाशी फारसे उत्सुक नसत. प्रवाह आणि वारे अनुकूल असते, तर एखादे वेळी तरी एखाददुसरे गलबत प्रवाहाच्या धारेला लागून आणि वाऱ्याने लोटले जाऊन खलाशांच्या मनाविरुद्ध का होईना, अमेरिकेच्या किनाऱ्यास सहजगत्या लागले असते, आणि कदाचित हजारो वर्षांपूर्वीच या खंडाचा शोध फारशा प्रयासाविना लागला असता!

तथापि अशीही एक समजूत नव्हे खात्री बहुतेक भूगोलवेत्त्यांची हल्लीं झाली आहे की, स्वीडन-नॉर्वेकडील खलाशी लोक देवमासे, सील

( जलसिंह ), वॉलरस ( जलव्याघ्र ) आणि इतर जलचर प्राण्यांच्या शिकारीच्या निमित्ताने आइसलंड, ग्रीनलंडपर्यंत जात-येत. नव्हे अशा लोकांनी ग्रीनलंडमध्ये वसाहतीही केल्या. हे लोक 'न्यू फाउंडलंड' बेटालाही पोहोचले होते. आणि काही उत्तर अमेरिकेच्या उत्तरभागी जाऊन राहिले होते. पण पुढे यांचे दळणवळण काही कारणामुळे थांबले ते तसेच थांबले असावे. आणि हे प्रदेश अज्ञात झाले असावेत.

५

# वास्को-द-गामा

पंधराव्या शतकाच्या उत्तरार्धात युरोपमधील स्पेन आणि पोर्तुगॉल म्हणजे आयबेरिअन द्वीपकल्पातील दोन प्रमुख राष्ट्रांमध्ये समुद्रावरील सत्तेविषयी एक प्रकारची स्पर्धाच लागून राहिली होती, ही दोन्ही राष्ट्रे युरोपच्या पश्चिमेस असूनही पूर्वेकडील भारत राष्ट्राशी जलमार्गाने व्यापार करावयाचा झाल्यास ( कारण खुष्कीचा मार्ग तेव्हा बंदच झाला होता ), हीच राष्ट्रे भारतास जवळ होण्याजोगी होती. कारण त्या वेळी सुएझ येथे आफ्रिका आणि आशिया या खंडांना जोडणारी संयोगभूमि असल्याकारणाने सध्या सुएझच्या कालव्यामुळे जसा जवळचा आणि सरळ जलमार्ग युरोप आणि आशिया यांमध्ये हल्ली उपलब्ध झाला आहे, तसा जवळचा मार्ग त्या वेळी नव्हता.

भारत हे द्वीपकल्प असल्याकारणाने भारतास जलमार्गाने जाण्यास अडचण पडू नये, हे तर उघड उघड दिसत होतेच. पण भारताच्या दक्षिणेस असलेल्या समुद्रात कसा आणि कोणत्या बाजूने प्रवेश मिळवावयाचा हा मोठाच प्रश्न त्या वेळी होता. युरोपच्या पश्चिमेच्या बाजूस पसरलेल्या विस्तृत जलाशयावरून मोठ्या हिंमतीने अनेकदा प्रवास करून त्या महासागरापलीकडे यमराज्य नसून या भूगोलावरील जमीनच

आहे. हे कोलंबसाने अनेक बेटांचा शोध लावून सिद्ध केले होते. पण ही बेटे भारताच्या पूर्वेकडील नसून, ती दुसऱ्याच एका नवीन म्हणजे तेव्हापर्यंत अज्ञात असलेल्या खंडाजवळची होती असे आढळून आले होते. ज्याप्रमाणे कोलंबसाला भारताचा मार्ग शोधण्याकरिता स्पेन देशाच्या राजाकडून प्रोत्साहन आणि सक्रीय सहानुभूती मिळाली होती, त्याचप्रमाणे पोर्तुगॉलच्या राजाकडूनही काही काही नावाजलेल्या साहसप्रिय नाविकांना प्रोत्साहन आणि सर्व प्रकारची मदत मिळत असे. नव्हे, पोर्तुगॉलच्या राजाने या कामी पुढाकारच घेतला होता, असे म्हटल्यास वावगे होणार नाही. कारण कोलंबसाने अमेरिकेचा शोध लावण्यापूर्वीही आपल्या चिमुकल्या गलबतांसह आफ्रिका खंडाच्या किनाऱ्याकिनाऱ्याने दक्षिणेस जाण्याचा हिय्या पोर्तुगॉलच्या पुष्कळ नाविकांनी केला होता. याचे खरे श्रेय पोर्तुगॉलचा राजपुत्र हेन्री यालाच दिले पाहिजे. म्हणूनच त्याला ‘ नाविकांचा नेता ’ हे टोपणनाव देण्यात आले. नौकाशास्त्रात याच्याइतका प्रसिद्ध नाविक त्या वेळी कोणीही नव्हता. तो उत्तमोत्तम नकाशे तयार करी; नाविक लोकांना उपयुक्त अशी नवीन नवीन आणि निरनिराळी उपकरणे शोधून काढी; शिवाय नवीन देशांचा शोध लावण्याकरिता तो पुष्कळांना उत्तेजनही देत असे. इ. स १४८७ साली बार्थोलोम्यू डायस नावाच्या पोर्तुगॉलच्या प्रख्यात नाविकाने आफ्रिकेच्या दक्षिण टोकाला वळसा घालून आफ्रिका खंडाच्या बहुतेक पश्चिम किनाऱ्याचा शोध लाविला होता. आफ्रिकेच्या या दक्षिण टोकापाशी त्याला वादळाशी अतिशय झुंजावे लागले, म्हणून या टोकाला ‘ वादळी भूशिर ’ असे नाव देण्याचे त्याने योजिले होते. परंतु पोर्तुगॉलच्या राजाने खलाशी लोकांची नाउमेद होऊ नये म्हणून याच टोकाला ‘ केप् ऑफ् गुड् होप ’ ( आशाजनक भूशिर ) असे नाव देण्याचा आग्रह धरिला. पोर्तुगॉलच्या इतरही काही काही खलाशांनी जवळ जवळ सत्तर

पाऊणशे वर्षे याप्रमाणे हळूहळू शोध करीत आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्याच्या 'केप ऑफ गुड होप' पर्यंत अवलोकन करून नकाशात तो भाग दाखविण्यात सुरुवात केली होती.

बार्थोलोम्यूने 'केप् ऑफ गुड होप्' चा शोध लाविल्याला दहा वर्षे होऊन गेली. त्याच्याही पुढे काय आहे ही जिज्ञासा विशेषतः पोर्तुगॉलच्या लोकांना लागून राहिली होतीच, 'केप ऑफ गुड होप' या भूशिराला वळसा घालून पुढे उत्तरेकडे जाता आल्यास, कदाचित् त्या बाजूने भारताशी दळणवळण सुरू करिता येऊन, तिकडील व्यापार आपल्याला काबीज करिता येईल, अशी महत्त्वाकांक्षाही पोर्तुगॉल देशाच्या राजाच्या मनात उत्पन्न झाली होती. कोलंबसास भारताचा मार्ग सापडला नाही, हे आता सिद्ध झाले होते. म्हणजे कोलंबसाला ज्या खंडाचा शोध लागला, त्याचे महत्त्व कमी होते असे नव्हे. पण भारतासारख्या पूर्वेकडील संपन्न आणि समृद्ध देशाशी व्यापार सुरू ठेवावयाचे ध्येय याने सिद्धीस जाण्यासारखे नव्हते. बार्थोलोम्यूने जो शोध लाविला, तोही तसा पुरता नव्हता, कारण आपल्या देशाच्या दक्षिणेकडे असलेला विस्तृत भूप्रदेश 'आफ्रिका खंड' हा अमर्याद नाहीच, तर 'केप ऑफ गुड होप' येथे तो भूप्रदेश संपत असून, त्याच्या पलीकडून गेल्यास त्या प्रदेशाच्या पूर्वभागी असलेल्या समुद्रात प्रवेश होईल, असे आता जवळ जवळ नक्की झाले होते. या समुद्रात प्रवेश करून त्या बाजूने भारत गाठता येईल की काय, हे आता पाहावयाचे होते. १४९६ साली पोर्तुगॉलच्या इमॅन्युएल राजाने या बाजूने भारताचा मार्ग शोधून काढण्याकरिता आणखी एक साहसी खलाशांचा ताफा पाठविण्याचा निश्चय केला. बार्थोलोम्यूनेच आणखी काही दिवस आपला प्रवास तसाच पुढे चालू ठेविला असता, तर त्यालाच भारताबरोबर रेशमी वस्त्रे, मसाल्याचे पदार्थ, सोने आणि रत्ने यांचा व्यापार सुरू करण्याचे

श्रेय मिळून, त्या गोष्टीला आज दहा वर्षे होऊनही गेली असती; आणि आपल्या देशाचे व्यापारी वैभव याच्या पूर्वीच वाढले असते. पण तसे अजून घडले नाही, याचे राजाला राहून राहून वाईटही वाटत होते.


इमॅन्युएल राजाने या कामगिरीकरिता काही अनुभविक खलाशांची निवड करून, आपल्या दरबारी असलेल्या वास्को-द-गामा या नावाच्या



वास्को-द-गामा

सरदाराला त्यांचे पुढारीपण दिले. त्यांच्या स्वाधीन तीन चिमुकलीच गलबते, मात्र सर्व साहित्यासहीत सिद्ध करून, देण्यात आली. या चिमुकल्या गलबतांनी ॲटलँटिक आणि हिंदी महासागर यांच्या 'केप ऑफ गुड होप' च्या भूशिरावर ज्या लाटा आपटतात, आणि जेथे सारखी वादळे होत असतात, त्या लाटांशी टक्कर देऊन त्या वादळातून तग तरी कसा धरिला, याचे खरोखरच आश्चर्य वाटते. पण इतिहासात

ही गोष्ट निर्विवाद नमूद केलेली असून, या गोष्टीचे सत्य भारताला तरी नाकारता येणे शक्य नाही. या गलबतांपैकी दोहोंची नावे ' सॅन् गेब्रिअल ' व ' सॅन रॅफेल ' अशी होती. यांची बांधणीही त्या वेळच्या पद्धतीप्रमाणे उथळ आणि चिंचोळ्या कडांची असून पुढच्या आणि मागच्या बाजूस बुरजाप्रमाणे होती. १४९६ साली जुलै महिन्यात एका निरभ्र दिवशी ही तिन्ही गलबते ख्रिस्ताचा तांबडा क्रॉस धारण करणारी आपली शिडे



वास्को-द-गामाची ध्वज नौका

शुभ्र हंसाप्रमाणे वाऱ्यावरोवर डौलाने फडकावीत, जगद्विख्यात जलपर्यटन करण्याकरिता आणि आपल्या राष्ट्राच्या कीर्तीत भर घालण्याकरिता, किनाऱ्यावर जमा झालेल्या स्वदेशातील स्त्रीपुरुषांचा आणि राजाचा निरोप घेऊन बंदर सोडून निघाली. वास्को-द-गामा हा ' सॅन् गेब्रिअल '

गलबताचा प्रमुख होता आणि 'सॅन् रॅफेल'चे नायकत्व त्याच्या भावाकडे होते.

प्रथम धुक्यामुळे या गलबतांची ताटातूट झाली. पण केपव्हर्द् बेटांपर्यंत त्यांना आपला मार्ग चांगलाच माहीत होता, म्हणून तेथे त्यांची गाठ पडली. तेथे त्यांनी काही किरकोळ दुरुस्ती केली. तेथून ऑगस्ट महिन्यात ईशान्येकडून विषुववृत्ताकडे वाहणाऱ्या व्यापारी वाऱ्यामुळे कॅनरीज बेटांकडून विषुववृत्ताकडे वाहत जाणाऱ्या प्रवाहाबरोबर ही गलबते ॲटलँटिक महासागराच्या मध्यभागाकडे लोटली जात होती. एका अर्थी वास्को–द–गामाला ही गलबते अशीच जाणे पसंत होते. कारण त्याच्या मते गलबते गल्फस्ट्रीमच्या वेगाने वाहणाऱ्या प्रवाहाच्या तडाख्यात सापडून अगदी पश्चिमेकडे धारेला लागण्यापेक्षा दक्षिणेकडेच आस्ते आस्ते लोटली जाणे काही वाईट नव्हते. दिवसामागून दिवस, आठवडे, महिनेसुद्धा लोटले. होता होता ( शहाण्णव दिवस जलपर्यटन केल्यानंतर ) नोव्हेंबर महिन्याच्या आरंभी आफ्रिकेच्या किनाऱ्याजवळ ती आली. येथून 'केप् ऑफ् गुड् होप्' भूशिर जवळच होते. वास्को–द–गामाने शेजारच्याच उपसागराच्या एका बंदरवजा निवाऱ्याच्या जागी आपली गलबते नांगरली, आणि तेथे त्याने आठ दिवस विश्रांती घेतली. या उपसागरास 'सेंट हेलेना बे' असे नाव त्याने दिले. खलाशांनी विश्रांतीच्या या अवधीत सर्व प्रकारची दुरुस्ती करून गलबते धुऊन स्वच्छ केली. येथे एके दिवशी किनाऱ्यावरून सहल करीत असताना काही खलाशांना एक तद्देशीय रानटी मनुष्य मध गोळा करीत असताना दिसला. खलाशी लोक लपत छपत त्याच्या अगदी जवळ गेले, आणि एकदम त्याच्याजवळ उडी मारून त्याला त्यांनी पकडले. वास्को–द–गामाने त्याला आपल्या गलबतावर नेऊन खावयाला प्यावयाला भरपूर दिले आणि त्याच्या अंगावर सुंदर सुंदर कपडे घालून त्याला घरी पाठविले. हा रानटी मनुष्य

हॉटेन्टॉट जातीच्या लोकांपैकी होता. हे लोक अत्यंत बुटके असून रंगाने पिंगट होते. हे अंगावर कातड्याचे कपडे घालीत असत. हा मनुष्य घरी गेल्यानंतर दुसऱ्या दिवशी या जातीचे पुष्कळ लोक किनाऱ्याजवळ आले. वास्को-द-गामाने त्यांनाही काही काही वस्तु देऊन खूष करून परत पाठविले. त्याच्याबरोबर वास्को-द-गामाच्या खलाशांपैकी एक, ते लोक राहतात कोठे, करतात काय, खातात काय हे पाहण्याकरिता गेला. 'केप् ऑफ् गुड् होप्' च्या किनाऱ्याजवळ 'सिल' नावाचे जलचर जात येत असतात. यांपैकी एकाला त्या लोकांनी पकडले. नंतर त्याचे मांस शिजवून ते स्वतः त्यांनी खाल्ले, आणि आपल्याबरोबर आलेल्या पाहुण्यालाही तेच दिले. या खलाशाच्या मनातून आणखी काहीसे पुढे जावयाचे होते, पण त्या लोकांना हे नको होते. ते लोक याला दगाफटका करण्याच्या विचारात होते. इतक्यात याच्याही मनात संशय येऊन हा तेथून जो पळाला, तो किनाऱ्याजवळ येऊन गलबतावरील लोकांना मोटमोठ्याने हांका मारू लागला. वास्को-द-गामाला ही त्याची आरोळी ऐकू आल्यामुळे स्वतः होडीत बसून त्याला आणण्याकरिता तो किनाऱ्याजवळ गेला. रानटी लोकही त्या खलाशाचा पाठलाग करीत आलेच होते. वास्को-द-गामाने आणिलेल्या होडीत हा खलाशी पाय ठेवणार तोच त्याच्या अंगावर आणि वास्को-द-गामा व इतर दोनचार खलाशी त्यांच्या अंगावरही भराभर तीर येऊन पडू लागले. या गर्दीत वास्को-द-गामाला व दुसऱ्या तीन-चार खलाशांना दुखापती झाल्या. पण त्यांच्यापाशी शस्त्रास्त्रे नसल्यामुळे त्यांना शक्य तितक्या त्वरेने आपली होडी गलबताकडे न्यावी लागली.

पुढे थोड्याच दिवसांनी वास्को-द-गामाने आपली गलबते तेथून हलवून पुन्हा वाटेला लावली. प्रथम काही दिवस वारे एकसारखे समोरून वाहत असल्यामुळे त्याच्या गलबतांना या भूशिराला वळसा घालणेच अशक्य

वाटू लागले. मधूनमधून गलबतांची गति खुंटे; नव्हे, प्रत्येक क्षणी गलबते उलथून पडतात की काय, असे खलाशांना वाटू लागल्यामुळे त्यांचे धैर्य खचले; आणि परत फिरण्याचा त्यांनी लकडा लाविला. पण काही दिवसांनी वाऱ्याची दिशा बदलल्यामुळे जे अशक्य वाटत होते, ते एकाएकी शक्य झाले. त्यामुळे या मोठ्याच अडचणीतून आपण पार पडलो, असे वास्को-द-गामाला वाटले असल्यास मोठेसे नवल नाही. कारण तेथूनच आपणांस परतावे लागून अंगीकारिलेल्या कार्यात अपयश घ्यावे लागते की काय, अशी भीती त्याला वाटत होती. वास्को-द-गामास आणि त्याच्या खलाशांना आनंद झाला. त्याच्या खलाशांना पुन्हा धीर आला आणि उत्साहही वाटला. आता मात्र पुढच्या प्रवासास सुरुवात झाली, असे म्हणावयास हरकत नाही, असे त्यांना वाटले. पुढे त्यांनी एका उपसागराच्या किनाऱ्यावर ख्रिस्ताचा क्रॉस असलेला खांब पाहिला. दहा वर्षांपूर्वी बार्थोलोम्यूने तो तेथे उभा केला होता.

वास्को-द-गामा पूर्व किनाऱ्याजवळून जाऊ लागला. वाटेत मधून मधून तद्देशीय लोकांशी मैत्री जमते की काय, हे पाहण्याकरिता तो किनाऱ्यावर उतरतही असे. डिसेंबर महिन्याचा हा शेवटचा आठवडा होता. या दिवसात ख्रिस्ती लोकांचा मोठा सण असतो. याला नाताळचे दिवस म्हणतात. कारण या दिवसांपैकी एका दिवशी जीझस ख्राइस्ताचा जन्म झाला. म्हणून ज्या प्रदेशाच्या किनाऱ्याजवळून यांची गलबते चालली होती, त्या प्रदेशाला वास्को-द-गामाने जीझस ख्राइस्तच्या जन्मदिवसाबद्दल वाटणाऱ्या आदरभावानिमित्त 'नाताळ' हे नाव दिले. आणि हल्लीही या प्रदेशाचे हेच नाव चालू आहे.

ते नाताळच्या किनाऱ्यापासून उत्तरेकडे अर्थात किनाऱ्याकिनाऱ्यानेच जाऊ लागले. या किनाऱ्यालगतच्या समुद्रातून जो 'मोझँबिक' नावाचा उष्ण प्रवाह वाहत जातो, तो दक्षिणेकडे जात असल्याने त्याचा

गलबतांना अडथळा होत होता खरा; पण हा प्रांत दक्षिण गोलार्धात असल्यामुळे आग्नेयेकडून वाहत येणाऱ्या व्यापारी वाऱ्यांची मदत या गलबतांना प्रवाहाच्या उलट जाण्याला फारच झाली. जो जो पूर्व किनाऱ्याने वास्को-द-गामा उत्तरेकडे जाऊ लागला, तो तो त्याला निरनिराळ्या जातीचे लोक आढळून येऊ लागले. प्रथम त्याला उंच, काळ्या वर्णाचे आणि नागवे लोक आढळले. त्यांनी तांब्याची कडी व वाळे हातांत व पायांत घातले होते. आणि काहींनी तर ओठातून कथिलाचे तुकडे ओविले होते.

झँबिझी नदीच्या मुखाशी एक महिनाभर राहून वास्को-द-गामाने सर्व गलबतांची मोडतोड पुन्हा दुरुस्त करून घेतली. याच वेळी काही खलाशीही आजारी होते, म्हणून त्यांना विश्रांती पाहिजेच होती. झँबिझी नदीच्याही उत्तरेला जेव्हा वास्कोद-द-गामा आला, तेव्हा मात्र त्याला वेगळ्याच तऱ्हेचे पण सुधारलेले लोक भेटले. या लोकांनी कापसाची वस्त्रे धारण केली होती, आणि त्यांनी दूर दूर प्रवासही केला होता. नव्हे, ते आशिया खंडातील इराण, अफगाणिस्तान, भारत इत्यादि देशांशी व्यापारही करीत होते. हे लोक जातीने अरब असून, त्यांनी आफ्रिकेच्या पूर्वभागी सोफालापर्यंत अनेक वसाहती स्थापन केल्या होत्या. हिंदी महासागरावरून चालणारा व्यापारही यांच्याच हाती होता. मोझँबिक शहरी तर भारताहून आणलेल्या उंची उंची पदार्थांनी भरलेली शेकडो गलबते वास्को-द-गामाच्या दृष्टीस पडली. वास्को-द-गामाला आनंदाचे भरते आले. आपण आता भारताचा किनारा खात्रीने गाठणार, आणि आजपर्यंत युरोपमधील कोणत्याही साहसी पुरुषाला जे साध्य झाले नव्हते, ते आपणाला साध्य होऊन आपल्या राष्ट्राच्या हाती युरोप आणि अशिया यामध्ये चालणाऱ्या व्यापाराची सूत्रे येऊन, आपले राष्ट्र भरभराटीच्या शिखराला पोहोचणार, याची सुखस्वप्ने त्याला पडू लागली. सुखस्वप्ने आणि सत्यसृष्टी यांमध्ये


पुष्कळच अंतर असते, याचा अनुभवही वास्को-द-गामाला लवकरच आला. हे अरब लोक त्याच्याशी प्रथम प्रथम मित्रत्वाने वागले खरे; पण वर्गातील दोन हुशार मुलांमध्ये जो मत्सर कित्येक वेळा दिसून येतो, तोच मत्सर व्यापाऱ्यांव्यापाऱ्यांमध्येही आजवर दिसून आलेला आहे. या युरोपिअन लोकांना जर का एकदा भारताचा हा जलमार्ग माहीत झाला, तर आजपर्यंत जो व्यापार निर्वेधपणे आपल्या ताब्यात आहे, तो या लोकांच्या हाती जाऊन आपले केवळ भाग्यच नव्हे, तर पोट भरण्याचे साधनही नष्ट होईल, असे या अरबी व्यापाऱ्यांना वाटले असावे. नाही तर वास्को-द-गामाशी पुढे त्यांनी जे वैर सुरू केले, ते करण्याचे दुसरे-तिसरे कोणतेही कारण नव्हते. वास्को-द-गामा हा एक चाच्यांचा पुढारी असून तो या समुद्रावर लूट करण्याकरिता आला आहे, अशी दाट वदंता त्यांनी सगळीकडे पसरविली. त्यामुळे जेथे जेथे तो गेला, तेथे तेथे त्याला अतिशय उपद्रव झाला. वास्को-द-गामाने याच मोझँबिक शहरी दोन अरबी वाटाड्ये नोकरीवर घेतले. दुसऱ्या दिवशी प्रवासास निघावयाचे ठरले, तो एक वाटाड्या नाहीसा झाला. त्याला आणण्याकरिता म्हणून आपल्या खलाशांनी भरलेल्या दोन नावा त्याने किनाऱ्यावर पाठविल्या. परंतु किनाऱ्यावर या दोन नावा जातात, तोच त्यांना धनुष्यबाणांनी सज्ज अशा अरब लोकांनी भरलेल्या सहा नावा आडव्या आल्या. वास्को-द-गामापाशी काही तोफा व दारूगोळा होता अरबी लोकांची ही लढाईची तयारी पाहून त्याने तोफा डागण्याचा हुकूम दिला. तोफा उडताक्षणीच अरबी लोकांचे धाबे दणाणून ते सैरावैरा पळून गेले. वास्को-द-गामानेही तो किनारा ताबडतोब सोडला.

वास्को-द-गामाने किनारा सोडला खरा; पण त्याला त्या वेळी वारा अनुकूल नव्हता. शिवाय त्याला गोडे पाणीही पाहिजे होते, म्हणून पुन्हा तो किनाऱ्यालगत आला. अरब लोक त्याच्या लोकांना तीरावर उतरू

देईनात. तेव्हा पुन्हा तोफ उडवावी लागली. नंतर काही खलाशांनी किनाऱ्यावर जाऊन पाणी आणिले. दुसऱ्या दिवशी पुन्हा पाण्यासंबंधीच तक्रार झाल्यामुळे वास्को-द-गामाने त्या शहरावरच हल्ला करण्याचे ठरविले. अरब लोकांनीही आपल्यापरी तयारी ठेवलीच होती. तलवारी, भाले, गोफणी, तीरकामटे यांसहित सज्ज होऊन लांकडी तटामागून गोफणीतून वास्को-द-गामाच्या गलबतांवर दगड मारण्यास त्यांनी सुरुवात केली. परंतु वास्को-द-गामाने पुन्हा तोफेचा उपयोग भरपूर केल्यामुळे अरब लोकांना तटाआड लपून बसावे लागले. त्यांचे दोन लोकही या दंगलीत कामास आले.

वास्को-द-गामाला या वेळी एक गोष्ट नक्की कळून चुकली असली पाहिजे की, (आणि ती तशी असल्याबद्दल पुढे त्याच्या प्रत्यक्ष अनुभवासही आली) या अरब लोकांना ज्या अर्थी बंदुका, तोफा व दारू-गोळा, या संहारक अस्त्रांचा उपयोग माहीत नाही, त्याअर्थी ज्या भारत देशाशी यांचा व्यापार चालतो, त्याही लोकांना ही अस्त्रे माहीत नसावीत. असे अनुमान त्याने ठरविले असावे. भारत देश सुसंस्कृत असेल; समृद्धही असेल पण त्या देशात संहारक अस्त्रांची नीटशी कल्पना नसावी; आणि जर यदाकदाचित् मारामारीचा, भांडणाचा, नव्हे लढाईचा प्रसंग आलाच, तर आपल्याजवळील दारूगोळ्याच्या जोरावर आपल्या थोड्याशा लोकांचा शत्रूकडील असंख्य लोकांविरुद्ध सहज निभाव लागू शकेल, असेही त्याला वाटले असले पाहिजे. 'या अरब लोकांना तर आजच आपण एक कटु अनुभव शिकविला आहे. यावरून ते चांगला धडा घेतीलच!' असे तो स्वतःशी म्हणाला आणि खरोखर त्याप्रमाणेच घडले. कारण यापुढे पुढील लोक त्याच्या वाटेस गेले नाहीतच.

काही दिवसांनी वास्को-द-गामा पुन्हा उत्तरेकडे जाण्यास निघाला. सुमारे आणखी एक आठवडाभर प्रवास केल्यानंतर तो दुसऱ्या एका


पोर्तुगाल
लिस्बन
साग्रेस
व्हेनिस
सेंट व्हिन्सेंट भू.
स्यूटा
मंदिरा बे.
कॅनेरी बेटे
बोजोडोर भू.
ब्लँको भू.
केप वर्ड बेटे
वर्द भू.
गोल्डकोस्ट
सिएरालिओन
हिंदुस्थान
अरबी समुद्र
कालिकत
काँगो नदी
लोपेझ भू.
मलिंद
मोंबासा
अटलांटिक महासागर
हिंदी महासागर
मोझांबिक
रिव्हर ऑफ मर्सी
सेंट हेलेना उ.सा.
नाताक
केप ऑफ गुड होप
मोसलचा उपसागर
राजपुत्र हेन्री याच्यावेळी शोधलेली स्थळं
वास्को-द-गामाने आक्रमिलेला मार्ग

मोठ्या बंदरापाशी आला. ते म्हणजे आफ्रिकेच्या पूर्व किनाऱ्यावरील आजही प्रख्यात असलेले मोंबासा बंदर होय. येथील राजाने वास्को-द-गामाला नजराणा म्हणून एक मेंढी, आणि काही मोसंबी, लिंबे व उसाची एक भली मोठी मोळी इतक्या वस्तु पाठविल्या. त्याचप्रमाणे वास्को-द-गामाला ज्या ज्या वस्तूंची जरूरी असेल, त्या त्या वस्तु पुरविण्यात येतील असा निरोपही त्याने त्याला पाठविला. पण वास्को-द-गामाला या सर्व आदरातिथ्याचा संशय आला. तो असा :— येथील राजा खरोखरच आपल्याशी मैत्री करण्याच्या इच्छेने इतक्या आदरपूर्वक नजराणे आणि निरोप पाठवीत आहे, की त्यात काही दगा फटका आहे? असो. वास्को-द-गामाला विश्वास न ठेवणेच बरे वाटले. त्याने जे लोक वाटाड्ये म्हणून बरोबर घेतले होते, त्यांच्यावरीलही त्याचा विश्वास उडाल्यामुळे त्यांना त्याने कैद्याप्रमाणे वागविण्यास सुरुवात केली. त्या दिवसात कैद्यांचे भारीच हाल हाल करीत. वास्को-द-गामानेही फार निष्ठुरपणाने त्यांचे हाल केले. आपल्याविरुद्ध तेथील राजाने काही कपटनाटक रचिले होते की काय, आणि त्याने तसा घाट घातला होता की काय, ही माहिती काढून घेण्याकरिता त्या कैद्यावर तापलेले तेल ओतण्यात आले. या कैद्यांचे जे हाल करण्यात आले त्यांचा उपयोग झाला; नाही असे नाही. त्यांच्याकडून असे कळले की, मोझँबिक शहरी वास्को-द-गामाच्या तोफांच्या मारामुळे जे लोक ठार झाले होते, त्यांच्या मरणाबद्दल सूड घेण्याचा मोंबासा येथील लोकांचा विचार होता. तथापि त्यांचा छळ जास्त जास्तच होऊ लागल्यामुळे त्यांनी जिवावर उदार होऊन समुद्रात उड्या टाकल्या. त्याच रात्री मोंबासा शहरातील लोकांनी वास्को-द-गामाच्या गलबतावर छापा घालण्याचा प्रयत्न केला, पण तो फसला. कारण गलबतावरील लोक सावध होते.

वास्को-द-गामाने यापुढे या भागात फार दिवस घालविले नाहीत.

प्रथम काही अंतर तो किनाऱ्याकिनाऱ्याने उत्तरेकडे मिलिंद बंदरापर्यंत गेला. येथील राजपुत्राने मात्र त्याचे मित्रत्वाच्या नात्याने व आदराने स्वागत केले. भेटी–परतभेटी झाल्या. एकमेकांस नजराणे पाठविण्यात आले. दहा दिवस या बंदरी सुखासमाधानात घालविल्यावर भारताकडे जाण्याची त्याने इच्छा दर्शविली. राजपुत्राने वाटाड्या दिल्यामुळे तेथून त्याने आपली गलबते थेट पूर्वेकडे हिंदीमहासागर ओलांडून जाण्याकरिता चालविली. तीन आठवडे त्याचा प्रवास सारखा चालला होता. मिलिंद बंदर सोडल्यानंतर तेविसाव्या दिवशी त्यांना सह्यपर्वताच्या उंच उंच शिखरांचे दुरून दर्शन झाले. आणि १४९७ सालच्या मे महिन्याच्या २३ व्या तारखेस भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील 'कालिकत' बंदरात ही गलबते सुरक्षितपणे येऊन पोहोचली. वास्को-द-गामाला अतिशयच हर्ष झाला. त्याला पोर्तुगॉल देश सोडून भरपूर अकरा महिने झाले होते. आणि अकरा महिन्यांनंतर का होईना पण जो हेतु मनात धरून या अज्ञात भागातील प्रवास त्याने अंगीकारिला होता, तो सिद्धीस गेलेला पाहून त्याच्या डोळ्याचे भरपूर पारणे फिटले. सुसंपन्न भारत देशाशी चालणारा युरोप खंडातील सर्व देशांचा व्यापार पोर्तुगॉलच्या–आपल्या राष्ट्राच्या–मध्यस्थीने यापुढे होणार व आपल्या राष्ट्राचे भाग्य लवकरच उदयास येणार, या भावी गोष्टीबद्दलही त्याचे अंतःकरण स्वदेशप्रेमाने उचंबळून आले असले पाहिजे.

पश्चिम किनाऱ्यावरील मुंबई बंदरास जे वैभव आज आले आहे, तेच वैभव कालिकत कोशीकोडे बंदरास पंधराव्या आणि सोळाव्या शतकात होते. दक्षिण भारताचा पश्चिमेकडील राष्ट्रांशी होणारा सर्व व्यापार याच बंदरातून चालत असे. विशेषतः मसाल्याचे पदार्थ (दालचिनी, लवंगा, सुंठ, मिरी), रत्ने आणि कापड या जिनसांचे हे आगरच होते.

युरोप खंडातून काही गोरे लोक आपल्या बंदरात येऊन दाखल

झाले आहेत, ही वार्ता हा हा म्हणता सगळीकडे पसरली आणि तेथील राजाच्याही कानी ती थडकली. वास्को-द-गामाने आपल्यापैकी दोघा इसमांना “आपण युरोपखंडातील पोर्तुगॉल देशाच्या राजाकडून काही महत्त्वाचा निरोप घेऊन सतत अकरा महिने समुद्रावरून प्रवास करीत येथपर्यंत आलो आहोत,” हे राजाला कळविण्याकरिता पाठविले. राजानेही आपल्या दरबारच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्यास त्याचेकडे पाठवून त्याचे स्वागत करून त्याला दरबारी आणण्यास सांगितले. वास्को-द-गामाने आपल्या देशातील पद्धतीप्रमाणे उत्तम तऱ्हेच्या नक्षीदार कापडाचा उंची पोषाख केला, आणि डोक्यावर झडपांची टोपी घातली आणि आपले तेरा लोक बरोबर घेऊन राजदरबारी येण्यास निघाला. त्याला आणण्याकरिता मेणा पाठविला होता. मनुष्यांनी वाहून नेण्याच्या या वाहनाची त्याला गंमत वाटली. तसेच येथील काळसर पिवळटसर लोकांना अर्धवट नग्नावस्थेत पाहूनही त्याला फारच विस्मय वाटला. वस्त्राच्छादित असा कमरेखालील भाग, पुरुषांच्या कानांतील सोन्याच्या भिकबाळ्या, बायकांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने, हातांतील गोठपाटल्या आणि बोटांतील हिरेजडित आंगठ्या या गोष्टींचे त्याला भारीच आश्चर्य वाटले. त्याचप्रमाणे हे परदेशाहून आलेले विचित्र गोरे लोक कसे दिसतात हे पाहण्याकरिता येथील लोकांच्या झुंडीच्या झुंडी रस्त्याच्या दुतर्फा जमा झाल्या होत्या. राजवाड्यापाशी तर इतका जमाव झाला होता की, त्यांना मोठ्या मिनतवारीने वाट काढीत आत जावे लागले. पहिल्या प्रथमच गोऱ्या लोकांना काळे लोक पाहून आणि काळ्या लोकांना गोरे लोक पाहून एकमेकांना अचंबा वाटला असल्यास नवल नाही. एखाद्या वानरापाठीमागे जशा मुलांच्या झुंडी लागतात, तशांतलाच हा प्रकार होता.

राजा एका लहानशा दिवाणखान्यात हिरव्या मखमालीने

आच्छादिलेल्या एका आसनावर स्वच्छ आणि पांढऱ्या शुभ्र अशा अभ्यानी गुंडाळलेल्या गाद्यांगिरद्यांवर लोळत पडला होता. या आसनावर सोन्याचे पाणी दिलेले छत होते. राजाच्या शेजारी एक भले मोठे सोन्याचे तबक असून त्यात सुपाऱ्या व विड्याचे सर्व सामान ठेविले होते. राजा विडा चघळीत होता, आणि मधून मधून सोन्याच्या पिकदाणीत पिचकारी टाकीत होता. वास्को-द-गामाला हा सर्व देखावा नवीनच असल्यामुळे तो काहीसा आश्चर्यचकित झाला होता.

वास्को-द-गामा आणि त्याच्याबरोबर आलेल्या त्याच्याच राष्ट्रबांधवांना एका दगडी चबुतऱ्यावर बसावयास सांगण्यात येऊन, त्यांच्यापुढे नारळ-केळ्यांनी आणि इतर फळफळावळांनी भरलेले ताट ठेवण्यात आले. त्यानंतर प्रथम वास्को-द-गामाने आपल्या राजाकडून आणलेला निरोप येथील राजपुरुषाजवळ सांगावा, आणि मग त्यांनी तो आपल्याला कळवावा अशी आज्ञा राजाकडून करण्यात आली. वास्को-द-गामाच्या मनातून तो निरोप सर्व मंडळीसमोर सांगावयाचा नव्हता; म्हणून त्याने म्हटले, "एका राजाकडून आणलेला निरोप दुसऱ्या राजास कळवावयाचा असल्यास तो प्रत्यक्ष त्यालाच कळविला पाहिजे, अशी आमच्याकडे पद्धत असल्यामुळे, मला माझा निरोप दुसऱ्या कोणापाशी सांगता येणार नाही; तरी एकान्तात माझा निरोप ऐकावा; आणि माझी एवढी विनंती आपण अवश्य मान्य करावी." राजाने वास्को-द-गामाच्या विनंतीला मान देऊन शेजारच्या एका दिवाणखान्यात त्याला नेले. तेथे दोघांचे संभाषण होऊन दोन्ही देशांच्या राजांमध्ये सलोखा आणि मैत्री करण्याचे ठरले. त्याचप्रमाणे आपल्या देशाच्या लोकांना भारत देशाशी व्यापार करण्यास परवानगी असावी, अशी संमती वास्को-द-गामाने राजाकडून मिळविली. तथापि वास्को-द-गामाने आपल्याबरोबर या वेळी जो माल आणिला होता, तो माल कमी

प्रतीचा असल्यामुळे त्या मालाला कोणीच गिऱ्हाईक मिळणे शक्य नव्हते. तसेच वास्को-द-गामाने राजाला नजराणा म्हणून देण्याकरिता ज्या वस्तू नेल्या, त्यांत पट्टे असलेल्या कापडाचे बारा नग, किरमिजी रंगाच्या चार कानटोप्या, पोवळ्याच्या चारपाच माळा, तोंड धुण्याची सहा पात्रे, साखरेचा एक पेटारा, तेलाची दोन पिपे आणि मधाचे दोन बुधले अशाच काही सटरफटर आणि किरकोळ वस्तू होत्या. राजाकडून जे अधिकारी या वस्तूंची पाहणी करण्याकरिता आले होते, त्यांनी तर या वस्तु पाहून डोळे मिचकाविले आणि वास्को-द-गामाची जवळ जवळ थट्टाच केली. " आमच्या वैभवसंपन्न राजाला या वस्तूंचे काय होय ! तुम्ही पोर्तुगॉल देशाच्या बलाढ्य राजाकडून मैत्री करण्याबद्दल निरोप घेऊन येता, आणि आमच्या राजाला नजराणा द्यावयालासुद्धा तुमच्यापाशी या भिकार वस्तूंशिवाय दुसऱ्या वस्तु नसाव्यातना ? आमचा एखादा यःकश्चित् वाणीसुद्धा यांपेक्षा पुष्कळच मोलाच्या जिनसा राजाला अर्पण करितो." वास्को-द-गामाला याचे भारीच वाईट वाटले. पण त्याच्याजवळ दुसऱ्या कोणत्याच सुंदर चिजा किंवा मौल्यवान् वस्तु नसल्यामुळे त्याला काहीच करता येणे शक्य नव्हते. याचा परिणाम मात्र असा झाला की, दुसऱ्या दिवशी तो पुन्हा राजाची भेट घेण्याकरिता गेला असता, त्याला भेटण्याची परवानगी मिळेपर्यंत तब्बल चार तास तेथे तिष्ठत बसावे लागले. तथापि भेट झाल्यानंतर पोर्तुगॉल देशाच्या राजाने जी पत्रे दिली होती, ती या राजास दिल्यानंतर त्या पत्रांचा बराच उपयोग झाल्याचे त्यास आढळून आले.

वास्को द-गामाने आपल्याबरोबर जो माल आणिला होता त्याची विक्री झाली नाहीच. याला दुसरेही एक कारण होते. आजपर्यंत या बंदरातून चालणारा व्यापार सर्वस्वी अरब लोकांच्या हाती असल्यामुळे त्यांना या नवख्या लोकांचा हेवा वाटू लागला. म्हणून त्यांनी त्याच्या मालाची टवाळी करण्यास आरंभ केला. तथापि त्याचा माल त्याला परतही नेण्याची

परवानगी मिळेना. अरब लोकांनी मध्यंतरी राजाची भेट घेऊन वास्को-द-गामा आणि त्याच्याबरोबर आलेले लोक लबाड व दुष्ट आहेत, असे राजाचे कान भारले. शेवटी गोष्ट इतक्या थराला आली की, वास्को-द-गामाने भली मोठी रक्कम दंडादाखल दिल्याखेरीज त्याने बंदरातून जाता कामा नये, असे राजाने त्याला सांगून पाठविले. जेव्हा वास्को-द-गामाने आपण जाणार हे कळविण्याकरिता एक जासूद पाठविला, तेव्हा त्यालाच कैद करून ठेवण्यात आले. वास्को-द-गामाही खमक्या मनुष्य होता. त्याची गलबते पाहण्याकरिता गेलेल्या काही लोकांना त्याने पकडून ठेविले, आणि आपल्या जासुदाला परत सुखरूपपणे न पाठविल्यास या सर्व लोकांसहित आपल्या देशी निघून जाण्याचे त्याने जाहीर केले. या गोष्टीचा योग्य तोच परिणाम झाला. राजाने जासुदाला तावडतोब मुक्त करून त्याच्या-बरोबर पोर्तुगॉलच्या राजाला देण्याकरिता स्नेहसंबंधाबद्दल एक पत्रही दिले. जासूद परत आला, तरी वास्को-द-गामाने पकडून ठेविलेल्या सर्व लोकांना सोडून दिले नाही. कारण त्याचा माल अद्याप अडकून पडला होता. पकडून ठेविलेल्या त्या सर्व लोकांना घेऊन स्वदेशी परत जाण्यास तेथून तो निघाला, पण वारा अजिबात पडल्यामुळे त्याची गलबते अडकून पडली. ती तेथून पुढे वेगाने जाईनात. ही संधि साधून कालिकत कोशिकोडे बंदरातील लोकांनी सत्तर नावा बरोबर घेऊन त्याच्या गलबतावर हल्ला केला. परंतु इतक्यात एकाएकी वादळ झाल्यामुळे वास्को-द-गामाची गलबते भर समुद्राकडे निसटली; त्याच्यावर देवाने एक प्रकारची ही खैरच केली.

ऑगस्ट महिना संपत आला होता. नारळी पौर्णिमा नुकतीच होऊन गेली असेल किंवा जवळ आली असेल. नारळी पौर्णिमेच्या सणाचे महत्त्व नावा, होड्या व गलबते यांतून आपल्या मालाची ने-आण ज्या व्यापाऱ्यांना करावी लागते, त्यांना आजसुद्धा किती वाटते, हे आपणा

भारतातील हिंदु, मुसलमान आणि पारसी लोकांना सुद्धा माहीत आहेच. कारण तीनचार महिने खवळलेला अरबी समुद्र नारळी पौर्णिमेनंतरच शांत होतो, आणि गलबतांना इकडून तिकडे जाण्यास सुरक्षितता वाटू लागते. वास्को-द-गामाला हा अनुकूल काल आपोआपच मिळाल्यामुळे त्याचा परत जाण्याचा प्रवास झपाट्याने होऊ लागला. स्वतःचा देश सोडून त्याला वर्ष होऊन गेले होते. पुन्हा स्वदेशी परत यावयाला एक वर्ष लागले. म्हणजे १४९८ चा सप्टेंबर महिना उजाडला. या प्रवासात वास्को-द-गामाचा पॉल नावाचा भाऊ आणि दुसरेही काही लोक वारले. त्याचे स्वतःचे आणि उरलेल्या लोकांचे अति हाल झाले. भारतातून त्याला विशेष असा कोणता मालही नेता आला नाही. या सगळ्या गोष्टी खऱ्या. परंतु, भारताच्या मार्गाचा शोध लावून भारताचा किनारा गाठणे ही आजपर्यंत केवळ कल्पनेतच असलेली गोष्ट त्याने शक्य कोटीतील असल्याचे सिद्ध केले, हा त्याच्या राष्ट्राचा बहुमान होय; आणि म्हणूनच तो परत गेल्यावर पोर्तुगॉलच्या राजाने अत्यंत संतुष्ट होऊन त्याचा बहुमान केला आणि त्याला वार्षिक वेतनही ठरवून दिले.

यानंतर लवकरच पोर्तुगॉल देशाचा आफ्रिका खंड आणि भारत यांच्याशी मोटा व्यापार सुरू झाला. त्यांनी आपल्या विरुद्ध असलेल्या शहरांचा आणि बंदरांचा एक विध्वंस तरी केला, किंवा ती जिंकून आपल्या ताब्यात तरी घेतली. भारताबरोबर चालणारा त्यांचा व्यापार पुढे इतर पाश्चात्य राष्ट्रांनी याच क्षेत्रात आपली घोडी दामटल्यामुळे हळूहळू कमी झाला खरा; पण परवा परवापर्यंत काही प्रांत आणि बंदरे त्यांच्या ताब्यात होती. ती सर्व आता भारतात सामील करून घेतली आहेत. त्यापैकी गोवे हे महाराष्ट्राच्या चांगल्या माहितीचे आहे. कारण बृहन्महाराष्ट्रात या प्रांताचा आपण समावेश करू इच्छितोच.

पोर्तुगॉल देशाने भारताशी दळणवळण करण्याचा हा जो नवा मार्ग

शोधून काढिला त्याचा परिणाम व्हेनिस शहरावर फारच झाला. आजपर्यंत या पूर्व-पश्चिम खंडाशी होणाऱ्या व्यापाराचे वैभव व्हेनिस शहरास प्राप्त झाले होते. त्या शहरी ही वार्ता जेव्हा जाऊन पोहोचली, तेव्हा सर्व शहर विजेचा धक्का बसल्याप्रमाणे किंवा भूकंपाने हादरल्याप्रमाणे खडबडून जागे झाले आणि लगेच विस्मयाने स्तंभितही झाले. शहाण्यांनी लगेच असा कयास बांधला की, व्हेनिस शहराचा लक्ष्मीने त्याग केला आणि खरोखर तसेच झाले. व्हेनिस शहराची लक्ष्मी पोर्तुगॉल देशाची राजधानी लिस्बन् या शहरी काही दिवस तरी वास्तव्य करण्यास निघून गेली.

६

# फर्डिनंड मॅगेलन्

इ. स. १४९२ साली कोलंबसाने अॅटलॅंटिक महासागर ओलांडून जाण्याचे अलौकिक धाडस केले, तेव्हा पश्चिम मार्गाने जाऊन भारताच्या पूर्वेस असलेल्या बेटांचाच आपण शोध केला, असे त्याच्या मनाने पक्के घेतले; म्हणूनच या बेटांना इंडीज हे नाव त्याने दिले होते. त्याचप्रमाणे वास्को-द-गामा याने आफ्रिकेच्या दक्षिण टोकास वळसा घालून हिंदी महासागर ओलांडून प्रत्यक्ष भारताचा पश्चिम किनारा गाठण्याचे श्रेय संपादन केले. वास्को-द-गामानंतर काही काही इतर खलाशांनी, विशेषत: हॉलंडचे डच आणि डेन्मार्कचे डेन्स या लोकांनी भारताच्या दक्षिण टोकास वळसा घालून भारत देशाच्या साधारणत: अग्नेय दिशेस असलेल्या जावा, सुमात्रा, बोर्निओ, सेलबीज, मोलक्का वगैरे बेटांचा शोध लावून त्या बेटांशी मसाल्याच्या पदार्थांचा व्यापार सुरू केला होता. या बेटांना ‘ मसाल्याची बेटे ’ असेही नाव देण्यात आले. या मसाल्याच्या बेटांनी भूगोलावर खरोखरच एका प्रकारे मोठे अपूर्व नाव मिळविलेले आहे. कारण या बेटांनीच भूगोलावरील ज्ञात प्रदेशांत केवळ भर घालण्यास सुरुवात केली एवढेच नसून, जसे परिसाच्या शोधार्थ सारे रसायनशास्त्र

उद्यास आले, तसेच या बेटांच्या मार्गाच्या शोधार्थ नव्या जगाचा शोध लागला, असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही.

याचा इतिहास थोडक्यात असा आहे. नवीन देश शोधून काढण्याच्या कामी या वेळी म्हणजे १५ व्या शतकाच्या शेवटी युरोप खंडातील शेजारी शेजारी असलेल्या स्पेन व पोर्तुगॉल या राष्ट्रांच्या राजांनी पुढाकार घेतला होता. यांच्यात स्पर्धा तर लागली होतीच. कारण साम्राज्य वाढविण्याची हाव दोघांनाही एकसारखीच होती. पण या बाबतीत अखेरची संमती किंवा मान्यता ख्रिस्ती लोकांचा जो मुख्य धर्मगुरू रोमचा पोप याने दिल्याशिवाय, कोणताही नवा प्रदेश कोणत्याही राजाला किंवा राष्ट्राला आपला म्हणून म्हणता येत नसे. कारण त्या वेळी पोपची सत्ता युरोपातील सर्व राजांवर चालत असून, त्याने दिलेला निर्णय अखेरचा समजला जात असे. तेव्हा पृथ्वी ही वाटोळी आहे, असे मत हळूहळू बनत चालले होते, ते खरेच असे ठाम समजून भूगोलाचे दोन गोलार्ध पाडावयाचे; आणि पोपच्या संमतीनेच एक गोलार्ध एकाने घ्यावयाचा आणि दुसरा दुसऱ्याने घ्यावयाचा अशी वाटणी झाली. आणि आपआपल्या गोलार्धात ज्या प्रदेशाचा शोध लागेल ते प्रदेश त्या राष्ट्राच्या हक्काचे, असेही ठरले. असे जरी ठरले होते, तरी पृथ्वीच्या एकंदर आकारमानाची कल्पना कोणालाही त्या वेळी नीटशी आलेली नसल्यामुळे कोणताही शोधून काढलेला नवा प्रदेश बरोबर कोणत्या गोलार्धात पडतो हे निश्चितपणे सांगता येत नसे; आणि त्यामुळे कित्येक वेळा एकाच प्रदेशावर दोघांचे हक्क सांगितले जात; आणि याप्रमाणे मालकी हक्कासंबंधी तंटे उत्पन्न होत. मसाल्याच्या बेटांसंबंधी हाच तंटा उत्पन्न झाला. पोर्तुगॉलचा राजा म्हणे " ती बेटे माझी " आणि स्पेनचा राजा म्हणे, " ती बेटे माझी. "

याचा अखेरचा निर्णय लावून घेण्याचे स्पेनच्या राजाने ठरविले. हे काम करावयाचे म्हणजे, ज्याप्रमाणे पूर्वेकडे जात जात या बेटांपर्यंत काही विवक्षित मैलांचा प्रवास केल्यानंतर जाता येते, तसेच पश्चिमेकडून प्रवास करीत करीत या बेटांपर्यंत जाण्यास किती मैलांचा प्रवास करावा लागतो, हे शोधून काढणे अवश्य होते. कारण त्याशिवाय ही बेटे खरोखर कोणत्या गोलार्धात पडतात, हे निश्चितपणे ठरविता येणे अशक्य होते. या कामी कोणी तरी साहसी प्रवासीच पुढे यावयाला हवा होता. पण तो मिळणार कसा ? तथापि आश्चर्याची गोष्ट ही की, हे बिकट काम आपल्या अंगावर घेऊन ते तडीस नेण्यास स्पेनच्या राजाला पोर्तुगॉल देशाचा एक आनुभविक नाविक सरदार लाभला. त्याचे नाव मॅगेलन्. या दोन राष्ट्रांचे परस्परं वाकडे होते, तरी पण पोर्तुगॉलच्या मॅगेलनने आपले नाव भूगोलावर अमर करून ठेविले आहे.



फर्डिनंड मॅगेलन्

पूर्व दिशेने प्रवास करून मसाल्याच्या बेटांपर्यंत मॅगेलन् हा यापूर्वीच एकदोनदा गेलेला होता. या बेटांना पश्चिम दिशेने जाण्याचा मार्ग शोधून काढावयाचे काम मॅगेलनने आता आपल्या अंगावर घेतले. पण ते अतिशयच कठीण होते. या कामाकरिता मॅगेलन ज्या वर्षी निघाला, ते वर्ष म्हणजे इसवी सन १५१९ हे होय. म्हणजे कोलंबसाने प्रथमच ॲटलँटिक महासागर ओलांडण्याचे मोठ्या धडाडीने जे साहस केले होते, त्या गोष्टीला आज २७ वर्षे होऊन गेली होती. एवढ्या अवधीत अनेक खलाशांनी अनेकवार प्रवास केल्यामुळे कोलंबसाने ज्या बेटांना 'इंडीज् बेटे' हे नाव दिले होते, ती खरोखरची 'इंडीज् बेटे' नव्हती. हेही सिद्ध झाले होते. ॲटलँटिक महासागराच्या पूर्वेस युरोप आणि आफ्रिका ही जशी दोन खंडे आहेत. तशीच उत्तर अमेरिका आणि दक्षिण अमेरिका या नावांची दोन खंडे ॲटलँटिक महासागराच्या पश्चिम भागी आहेत, असाही शोध लागला होता. आणि कोलंबसाने ज्यांना 'इंडीज बेटे' हे नाव दिले होते, ती बेटे उत्तर अमेरिका आणि दक्षिण अमेरिका यांच्या मध्ये असलेले जे मेक्सिकोचे आखात त्या आखातातील बेटांचा तो एक समुदाय होता, ही गोष्ट आता स्पष्ट झाली होती. म्हणून या बेटांना 'वेस्ट इंडीज' हे नाव देण्यात आले. कारण कोलंबसाने दिलेले नाव त्याच्याबद्दल वाटणाऱ्या आदरामुळे अजिबात बदलू नये असे वाटणे साहजिकच होते. तरी पण पूर्वेकडील खरी 'इंडीज् बेटे' वेगळी हे दाखविण्याकरिता यांना पश्चिमेकडील 'इंडीज बेटे' हे नाव सुचविण्यात आले. खरोखर कोलंबसाने जरी अमेरिकेचा शोध लाविला होता, तरी ज्या प्रदेशाचा आपण शोध लाविला, तो प्रदेश म्हणजे अमेरिका खंडाएवढे दोन विस्तीर्ण भूखंड आहेत, याची कल्पना त्याला मुळीच नव्हती. याचे सर्व श्रेय 'अमेरिगो व्हेस्प्युसि' नावाच्या फ्लॉरेन्सच्या रहिवाशास मिळाले; आणि या खंडांनाही या नाविकाचेच

नाव देण्यात आले आहे. अमेरिगोने एकंदर किती सफरी केल्या, त्याने अमेरिकेचे भूप्रदेश कसे शोधून काढिले, इत्यादी गोष्टी पुढे केव्हा तरी सांगण्यात येतील.

सध्या मॅगेलनपुढे जे प्रश्न होते ते म्हणजे अमेरिका खंडांना वळसा घालून पश्चिमेकडे कसे जावयाचे? हा एक; आणि अमेरिका खंडाच्या पश्चिमेस असलेल्या विस्तीर्ण अशा जलाशयावरून आपणास किती दिवस जावे लागेल? हा दुसरा, हे होत. त्याने ते कसे सोडविले हे आपणांस पाहावयाचे आहे.

मध्यंतरी 'वास्को नुनेझ-द-बालबोआ' या नावाच्या दुसऱ्या एका धाडसी खलाशाचे गलबत पनामा संयोगभूमीच्या पूर्व किनाऱ्यावर फुटल्यामुळे तो सहज तेथील सभोवतालच्या प्रदेशाचे निरीक्षण करण्याकरिता आपल्या सोबत्यांना बरोबर घेऊन एका डोंगराच्या शिखरावरून पाहू लागला. तेव्हा आपण ज्या भूभागावर उभे आहोत तो अति निरुंद असून त्याच्या पलीकडे पश्चिम दिशेला विस्तीर्ण जलसंचय पसरलेला आहे असे त्याला आढळून आले. तो स्तंभितच झाला. "हा नवा महासागर कोणता? आणि तो पूर्वेकडील ॲटलँटिक महासागराप्रमाणे पश्चिमेस किती पसरलेला असावा कोण जाणे?" अशा प्रकारचे विचार त्याच्या मनात आले असले पाहिजेत. "भारत, चीन आणि जपान ही राष्ट्रे या आपल्यासमोर पश्चिमेकडे पसरलेल्या महासागराच्या पलीकडे तर नसतीलना?" या विचाराबरोबर बालबोआला व त्याच्या अनुयायांना अतिशय आनंद झाला. आपल्याला हा नवा आणि अति आश्चर्यकारक असा शोध लावण्याचे श्रेय अचानकपणे मिळणार म्हणून त्यांनी देवाची मनःपूर्वक प्रार्थना केली; आणि बालबोआने हातात तलवार घेऊनच महासागराच्या गार पाण्यात प्रवेश केला, आणि स्पेन राजाच्या मालकीचा तो महासागर असल्याचे त्याने जाहीर केले. याच बालबोआला पुढे चार

वर्षांनी या भागातच कसे किंवा का ठार करण्यात आले ती गोष्ट आपण पुन्हा केव्हा तरी पाहू.

खरोखर मॅगेलन् याने " पश्चिमेकडून प्रदक्षिणा करीत पूर्वेकडे गेल्यास मसाल्याच्या बेटांना जाण्याच्या मार्गाचा शोध लागेल." अशी आपली योजना पोर्तुगॉल देशाच्या राजापाशीच प्रथम मांडिली होती. पण ज्या-प्रमाणे कोलंबसाची योजना त्या राजाला पसंत पडली नव्हती, त्याप्रमाणे याचीही योजना या राजाला मुळीच पटली नाही. तेव्हा कोलंबसाप्रमाणेच हाही नाविक सदर स्पेन देशाच्या राजाकडे आपली योजना घेऊन आला. स्पेन देशाच्या राजाला हे काम हाती घेण्याला कोणी तरी नाविक पाहिजेच होता. म्हणून त्याने मोठ्या उत्साहाने मॅगेलनची योजना पसंत केली. त्यालाही हा मार्ग शोधून काढून जगाचा निम्मा भाग निश्चित कण्याची जरूरी भासत होतीच. कारण मसाल्याची बेटे आपल्या निम्या भागातच यावीत असा त्याचा अंदाज होता. आणि ते खरे झाल्यास त्याचा मोटाच फायदा होणार होता. मॅगेलन् यानेही या राजाच्या मनात असेच भरवून दिले.

राजाची जरी संमती मिळाली, तरी एकंदर तयारी करावयास मॅगेलन् यास बराच त्रास पडला. त्याच्या स्वाधीन अनेकवार प्रवास केल्यामुळे बहुतेक जीर्ण झालेली अशी पाच गलबते करण्यात आली. ती इतका लांबचा प्रवास करण्यास समर्थ होतील, अशा तऱ्हेने त्यांची दुरुस्ती प्रथम करण्याकरिताच त्याला अति प्रयास पडले. त्यानंतर इतक्या दूरचा, धोक्याचा, त्रासदायक आणि संकटांनी भरलेला असा प्रवास करावयास खुषीने येणारे खलाशी मिळेनात. आपण होऊन कोण येणार? कारण पगारही भरपूर मिळावयाचा नव्हता. शिवाय माहीत असलेल्या मार्गाने प्रवास करून मसाल्याच्या बेटांशी व्यापार हा करिता येत होताच. तेव्हा मुद्दाम होऊन अज्ञात मार्गाने जाण्यास कोणीही इतर खलाशी धजेनात.

तथापि जादा बक्षिसांची लालूच दाखवून, काही या राष्ट्रातून तर काही त्या राष्ट्रातून असे सुमारे २७० खलाशी जमविण्यात आले. लढाईकरिता ज्याप्रमाणे मारून मुटकून सैन्य जमविण्यात येते, तशातलाच हा प्रकार होता. मॅगेलन् याने जी पाच गलबते आपल्या बरोबर घेतली त्यांची नावे---' त्रिनिदाद, सन् अँटोनिआ, सँटिॲगो, कन्सेप्शन् आणि व्हिक्टोरिया ' अशी होती. यांपैकी सर्वांत मोठे गलबत जे ' त्रिनिदाद ' याचे वजन सारे ११० टन होते. आणि सर्वांत लहान गलबत ' व्हिक्टोरिया ' याचे वजन तर ८५ टनच होते. पण सगळ्यात आश्चर्याची गोष्ट म्हणजे ही की, या पाच गलबतांपैकी पृथ्वीची पहिली पूर्ण प्रदक्षिणा करणारे गलबत ' व्हिक्टोरिया ' हेच होय !

१५१९ साली सप्टेंबर महिन्याच्या २० व्या तारखेस ही सर्व गलबते सेव्हिली बंदरातून निघाली. मॅगेलनने आपल्या पत्नीचा आणि लहानग्या मुलाचा मोठ्या प्रेमाने निरोप घेतला, आणि ' त्रिनिदाद ' गलबतावर स्पेन राष्ट्राचे सुवर्ण निशाण फडकवीत त्या गलबताचे पुढारीपण स्वतःकडे स्वीकारून तो स्वतः सर्वांच्या पुढे निघाला; आणि त्याच्या मागोमाग दुसरी गलबतेही निघाली. ' त्रिनिदाद ' गलबताच्या पाठीमागच्या उंच भागावर मॅगेलने एकसारखे पेटत असलेले जसे काही एक होमकुंडच ठेविले होते. आपल्यामागून येणाऱ्या गलबतांना त्याच्या उज्ज्वल ज्वाला मार्गदर्शक व्हाव्यात असा त्यात त्याचा हेतू होता. या गलबतांनी प्रथम कॅनरी बेटांवरून केपव्हर्ड बेटापर्यंतचा प्रवास नेहमीच्याच मार्गांनी केला. हा प्रवास व्यापारी वाऱ्यांच्या साहाय्यामुळे मोठ्या सुखान, आनंदात आणि जलद झाला. कॅनरी बेटांतून भरपूर अन्नसामग्री आणि इतर वस्तू घेण्यात आल्या त्याचप्रमाणे एखाद्या जहाजास गळती लागल्यास ती दुरुस्त करण्यास उपयोगी पडावे म्हणून बरेचसे काजळही मॅगेलनने घेऊन ठेविले होते. केपव्हर्ड बेटांना मागे

टाकिल्यानंतर मात्र ही गलबते नैर्ऋत्य दिशेने अज्ञात महासागरावरून दक्षिण अमेरिकेच्या धोरणाने मार्ग काढीत जाऊ लागली. विषुववृत्ताच्या जवळ जवळ जो जो ती गलबते जाऊ लागली, तो तो व्यापारी वाऱ्यांचा झोत कमी होऊ लागला; आणि पुढे तर काही दिवस वाऱ्याचा प्रवाह अगदीच नाहीसा झाला. हा विषुववृत्तावरील निर्वात प्रदेश होय. येथे वारा अगदी म्हणजे कसा तो अगदीच नसतो. उलट अति प्रखर उन्हामुळे सर्वत्र जीव कासावीस होण्याइतकी उष्णता असल्यामुळे ही गलबते कशीबशी एका प्रकारच्या गुंगीतच चालली होती, असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. शिडांचा काहीच उपयोग नव्हता आणि गलबतांच्या लाकडाच्या तक्तयांच्या चिरांमधील काजळ वितळून त्याला बुडबुडे येत होते. नंतर पुन्हा दक्षिण गोलार्धातील आग्नेय दिशेकडून वाहत येणाऱ्या व्यापारी वाऱ्यांचे झोत उपयोगी पडू लागले. पण पुढे त्यांचा जोर इतका वाढला की, त्यामुळे एखादे दिवशी आपल्या गलबतांना समुद्रसमाधीच मिळते की काय, अगर एखाद्या खडकावर आपटून त्यांचा चक्काचूर होतो की काय, अशी भीती त्यांना वाटू लागली. अन्नाचा तुटवडा पडू लागला होताच. तशात पिण्याच्या पाण्यालाही वाईट वास येऊ लागला. या सर्व गोष्टींमुळे खलाशी लोकांत असंतोष माजून त्यांनी बंड पुकारिले. मॅगेलन् हा मूळचा पोर्तुगीज मनुष्य असल्यामुळे स्पेन देशातील खलाशांनी त्याला ठार करण्याचा घाट घातला होता. पण मॅगेलनच्या अंगी असलेल्या असामान्य धैर्यामुळे त्यांचे दुष्ट बेत फसले. एका दोघांना बेड्या घालताच हे बंड पार वितळले. नोव्हेंबर महिन्याच्या अखेरीस यांना ब्राझील देशाचा किनारा दिसू लागला. त्यासरशी आता आपणास लवकरच अन्नपाण्याचा भरपूर साठा मिळणार अशी आशा वाटू लागून सर्वांच्या मनात नवीन उत्साह उत्पन्न झाला. डिसेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात याच देशाच्या किनाऱ्यावरील

म. प्र. ग. . . . शाखा.



दा. क्र. ९५१ ...

मकरवृत्ताच्या सन्निध असलेल्या आणि आज ' रिओ डी जॅनिरो ' नावाने प्रसिद्ध आणि प्रमुख असलेल्या बंदराच्या ठिकाणी ही गलबते येऊन पोहोचली. हे बंदर आज ब्राझिल देशातील पहिल्या प्रतीचे व राजधानीचे शहर आहे. डिसेंबर महिन्यातील ख्रिस्तमसच्या दिवसांत भर थंडीचे दिवस असावयाचे. पण येथे भर उन्हाळ्याचे दिवस होते, याचे या लोकांना आश्चर्य वाटले.

यांना येथील प्रदेशही विचित्र वाटला. कारण या खलाशांना येथील मूळ लोकांपासून खाण्याकरिता जे पदार्थ मिळाले, ते पदार्थ पुष्कळच वेगळ्या प्रकारचे आणि यांच्या पाहण्यात आजपर्यंत न आलेले असे होते. अननस हे फळ पाहून तर त्याना अचंबा वाटला. त्याचप्रमाणे खव्यासारखा रुचकर असा पदार्थ त्यांना खावयास मिळाला. हा पदार्थ म्हणजे एका प्रकारच्या झाडाच्या बुंध्यामधील मगज होता. येथील लोक वर्णाने तपकिरी होते. आपल्या कमरेभोवती गुंडाळलेला पोपटांच्या पिसांचा पंचा एवढेच काय ते वस्त्र ते नेशीत असत; आणि आपल्या खालच्या ओठांना भली मोठी भोके पाडून त्यांतून बोटा-एवढे लांब दगड ते अडकवीत असत. बायका आपल्या लहान मुलांना कमरेवर एका कापसाच्या जाळ्याने बांधून ते जाळे उलट्या बाजूच्या खांद्यावर अडकवीत असत. आणि यामुळे कामकाजा-करिता त्यांचे दोन्ही हात मोकळे असत. आणि मॅगेलनचा ख्रिस्त-मसचा सण या ठिकाणीच साजरा झाला. या ठिकाणी अन्नपाण्याची पूर्णपणे तरतूद केल्यावर मॅगेलन् हा स्वतःच्या समजुतीप्रमाणे या भूखंडाच्या दक्षिण टोकाला वळसा घालण्याच्या इराद्याने दक्षिण दिशेने निघाला. तीन आठवड्यांनंतर जमिनीचा भाग पश्चिमेकडे वळलेला त्याला आढळून आला, आणि याच ठिकाणी दक्षिण अमेरिकेचा दक्षिण भाग संपलेला असावा असे त्याला वाटले. म्हणून

पश्चिमेकडे गलबते नेण्यात आली. तो एके दिवशी गोड्या पाण्याचा प्रवाह यांना लागला. आणि जानेवारी महिन्यात रिव्हर-द-ला प्लाटा या नदीच्या मुखाशी येऊन त्याची गलबते थबकली. नदीचे पात्र पन्नास मैल रुंद असल्यामुळे त्यांना पलीकडील किनारा दिसत नव्हता. नदी ओलांडल्यानंतर फेब्रुवारी आणि मार्च या दोन्ही महिन्यात दक्षिणेकडे अमेरिकेच्या किनाऱ्याकिनाऱ्यानेच ही गलबते चालली. एप्रिल महिना उजाडला. तेव्हा या गोलार्धातील थंडीच्या दिवसांना सुरुवात झाल्यामुळे दक्षिणेकडील पन्नासाव्या अक्षवृत्ताशेजारी असलेल्या एका बंदराचा आश्रय घेऊन सर्व हिवाळा येथेच काढण्याचे मॅगेलनने ठरविले. या बंदरास ' सेंट ज्यूलिअन् ' हे नाव देण्यात आले.

या बंदरात येऊन दोन महिने झाले, तरी मॅगेलन् आणि त्याच्या खलाशांना कोणीही मनुष्य प्राणी आढळला नव्हता. पण पुढे एके दिवशी एकाएकी एक भला मोठा धिप्पाड आणि उंचचा उंच असा मनुष्य त्यांना दिसला. तो मोठ्या मजेत नाचत आणि गात होता. मधून मधून तो उड्याही मारीत होता. तो इतका उंच होता की, मॅगेलन् आणि त्याचे खलाशी त्याच्या छातीलाच लागत. त्याचा आवाजही खोंडाच्या डरकाळ्याप्रमाणे प्रचंड होता. मॅगेलन याने या मनुष्याशी मैत्री केली. त्यानंतर या मनुष्याच्या जातीचे याच्याचसारखे धिप्पाड असलेले आणखीही काही लोक येऊ लागले. हे लोक कातड्यांचे कपडे अंगावर घालीत आणि पायात कातड्याचेच बूट वापरीत. मूळचीच पावले मोठमोठी आणि त्यातून बूट घातल्यामुळे ती राक्षसांच्या पावलांसारखी प्रचंड आणि ओबडधोबड दिसत. म्हणून मॅगेलन् याने या लोकांना ' पॅटगॉन ' म्हणजे ' प्रचंड–पावलांचे ' असे नाव दिले. आणि हल्ली हा देश ' पॅटगोनिआ ' या नावानेच ओळखला जातो. मॅगेलनच्या मनातून या लोकांपैकी काही लोकांना

आपल्या बरोबर घेऊन स्पेन देशात न्यावयाचे होते. या हेतूनेच त्याने दोन लोकांना पकडून आपल्या गलबतावर आणून ठेविले. काही बायकांना सुद्धा न्यावे म्हणून त्यांच्यापैकी काही जणांना आणण्याकरिता मॅगेलन् याने आपल्या खलाशांना पाठविले. पण त्या बायका पळून गेल्या आणि त्यांच्या पुरुषांनी या खलाशांवर बाण टाकून त्यांच्यापैकी एकाला त्यांनी ठार केले. खलाशांजवळ बंदुका होत्या. पण हे प्रचंड पावलांचे लोक एका ठिकाणी क्षणभर सुद्धा उभे राहात नसत. ते इतक्या वेगाने इकडून तिकडे उड्या मारीत की, बंदुकीचा नेम धरून गोळी मारणे खलशांना अशक्य झाले, या लोकांचे धावणेही घोड्यापेक्षा जलद होते.

आपल्याला आणखी बरेच दिवस प्रवास करावा लागणार असे मॅगेलन् याला वाटल्यावरून त्याने अन्नपाणी बेताने खर्च करण्याचा हुकूम दिला. पण ही गोष्ट काही जणांना आवडली नाही. विशेषतः स्पॅनिश लोक हे मनातून ह्याचा फारच हेवा करीत. म्हणून त्यांनी इतरांनाही चिथावले, आणि मॅगेलनला ठार करण्याचाच कट केला. पण याही खेपेस हा कट उघडकीस आला. मॅगेलनने दोन पुढाऱ्यांना लगोलग ठार करून दोघांना त्याने किनाऱ्यावर नेऊन सोडून दिले. यानंतर मात्र कोणीही त्याचा हुकूम मोडण्यास धजला नाही.


पाच महिने सेंट ज्यूलिअन बेटात घालविल्यावर मॅगेलन् तेथून ऑक्टोबर महिन्यात पुढच्या प्रवासास निघाला. ऑक्टोबर महिना म्हणजे तेथील वसंतऋतु होय. त्याचे एक गलबत वादळामुळे मोडून फुटून गेल्यामुळे आता चारच गलबते शिल्लक राहिली होती. मात्र मोडून फुटून गेलेल्या गलबतारील लोकांना सुरक्षितपणे दुसऱ्या गलबतांवर घेण्यात आले आणि त्या गलबतावरील मालही बुडू दिला नाही, किंवा त्याची विशेष नासधूसहि होऊ दिली नाही. पुढे साठ मैलांचा प्रवास केल्यावर

ते आणखी एका लहानशा नदीच्या मुखाशी आले. तेथे त्यांनी दोन महिने काढले. या नदीतील मासे त्यांना अन्न म्हणून फारच उपयोगी पडले. या ठिकाणी मॅगेलनने अन्नपाण्याचा पुन्हा पुरवठा करून घेतला.

आणखी तीन दिवस प्रवास केल्यानंतर दक्षिण अमेरिकेच्या अगदी दक्षिण भागास वळसा घालण्याकरिता त्याने जो मार्ग मनात योजिला होता, तो सफल होण्याची चिन्हे त्याला दिसू लागली. येथे समुद्राचा भाग जमिनीच्या आत बराच गेलेला त्यांना आढळला. अमेरिकेच्या पश्चिमेस आणि पूर्वेस जे विस्तीर्ण जलाशय पसरलेले आहेत त्यांना जोडणारी सामुद्रधुनी हीच असावी असा मॅगेलन् याने मनात अंदाज बांधिला होता; आणि अखेर हा त्याचा अंदाज खरा ठरला. या सामुद्रधुनीस 'मॅगेलनची सामुद्रधुनी' हेच नाव या शोधकाचे नाव जगात अमर करण्याच्या हेतूने, देण्यात आले आहे. शोधकांच्या ठिकाणी अलोट धैर्य असणे, अधीर अथवा निराश न होता चिकाटी राखणे, कोणत्याही प्रसंगास न डगमगता त्यास तोंड देणे या प्रकारचे असामान्य असे काही काही गुण जसे असावे लागतात, तसाच योग्य अंदाज बांधता येणे हाही एक गुण असावा लागतो. हा अंदाज फसणार नाही असे नाही. पण अंदाज फसला तरी निराश होऊन धैर्य खचू न देता अंगीकृत कार्य तडीस जाईपर्यंत चिकाटी राखणे अवश्य असते. मॅगेलनने रिव्हर-द-ला-प्लाटा या नदीच्या मुखाच्या शेजारी बांधलेला अंदाज चुकला होता, हे आपण पाहिले आहेच. पण त्याने अंगीकारिलेले कार्य तेथेच अर्धवट सोडिले नाही.

सामुद्रधुनी सापडली. पण ही सामुद्रधुनी खरोखरीचीच आहे की नाही, हे तरी सामुद्रधुनी ओलांडल्याशिवाय कसे कळणार? मॅगेलनने या सामुद्रधुनीत शिरण्याचा सर्व गलबतांच्या मुख्य खलाशांना हुकूम सोडला. परंतु या चिंचोळया समुद्राच्या भागाच्या दोहो अंगास बर्फाने

आच्छादलेल्या उंच उंच पर्वतांचे तट उभेच्या उभे होते. काठी उभे असलेले कडे आणि मध्ये खळवळणाऱ्या पाण्याच्या प्रचंड लाटा! असा तो सुंदर पण भेसूर देखावा होता. यातून मार्ग काढीत जाणे म्हणजे खरोखरच यमाच्या जबड्यातूनच जाण्यासारखे होते! यातूनही काही अंतर पाणी तोडीत तोडीत गेल्यावर वादळाने फारच जोर केला. खाडीतील एका निवाऱ्याच्या जागी मॅगेलन स्वतः दोन गलबते घेऊन



राहिला. आणि दुसऱ्या दोन गलबतांना पुढच्या मार्गाच्या शोधार्थ त्याने पाठविले. पण एका गलबतावरील खलाशांच्या मनातून या खवळलेल्या, चिंचोळ्या व पदोपदी धोक्यांनी भरलेल्या सामुद्रधुनीतून वाट काढीत बसण्यापेक्षा परत स्वदेशीच जावयाचे आले, म्हणून त्यांनी आपल्या गलबताच्या कप्तानाला—हा मॅगेलनचा चुलतबंधूच होता—कैदेत टाकिले,

आणि रात्र अंधाराची आहे असे पाहून गुपचूप परत प्रयाण केले. हे गलबत 'सॅन् अॅन्टोनिओ' होय. उरलेल्या तीन गलबतानिशी एक आठवडाभर मोठ्या धैर्याने वादळांना तोंड देत देत तसेच पुढे गेल्यावर पश्चिमेस असलेल्या जलाशयात एकाएकी त्यांचा संचार झाला. त्याबरोबर त्यांच्या आनंदाला जे भरते आले, ते इतके की, तो गगनात मावेना! ज्या सामुद्रधुनीचा शोध लावण्याची मॅगेलनची ही सर्व खटपट आणि धडपड चालली होती, ती अखेर त्यास त्याच्या योजनेप्रमाणे सापडली. मात्र ह्या सामुद्रधुनीपलीकडे जाण्यास त्यांना चाळीस दिवस धडपड करावी लागली. या अरुंद सामुद्रधुनीतून प्रवास करीत असताना त्यांना त्यांच्या डाव्या हाताला असलेल्या किनाऱ्यावर रात्री नेहमी मशाली पेटविल्याप्रमाणे उजेड दिसे, म्हणून त्या प्रदेशास 'टेरा डेल फ्युएगो' म्हणजे 'अग्नीचा प्रदेश' हे नाव मॅगेलनने दिले, ते अद्याप चालू आहे.


ही सामुद्रधुनी ओलांडल्यानंतर मॅगेलन् याने उत्तर दिशेने पण किनाऱ्याकिनाऱ्यानेच जाण्याचे ठरविले. कारण या भागात थंडी तर अति होतीच; शिवाय मधून मधून पाऊस पडत असे आणि वादळेही होत असत. उत्तरेकडे तिसाव्या अक्षवृत्ताच्या आत आल्यानंतर मात्र त्याची गलबते पुन्हा व्यापारी वाऱ्यांच्या कक्षेत आली. हवा उबदार झाली; आणि आकाश निरभ्र दिसू लागले. दक्षिण गोलार्धात व्यापारी वारे आग्नेय दिशेकडून वायव्येकडे वाहत असल्यामुळे ही गलबते या महासागरावरून दक्षिण अमेरिकेला सोडून भराभर पुढे जाऊ लागली. महासागरही एकसारखा तीनचार महिने शांत होता, म्हणून या महासागरास 'पॅसिफिक' म्हणजे 'शांत महासागर' असे सार्थ नाव मॅगेलन् याने दिले. पण तीन–चार महिने प्रवास करूनसुद्धा जेव्हा या महासागराचा अंत लागेना, तेव्हा हा अमर्याद आहे की काय, या प्रकारची भीती खलाशांना वाटू लागली. वाटेत एकदोन बेटे त्यांना

लागली; पण या बेटावर कोणीही मनुष्यप्राणी किंवा इतर कोणताही प्राणी त्यांना आढळला नाही. यापुढे मात्र या लोकांचे अतिशयच हाल झाले. चार महिने त्यांना ताजे अन्नही मिळाले नाही. अळ्या, किडे व मुंग्या यांनी बुजबुजलेली, किती तरी दिवसांची शिळी, तीही उंदीर, घुशी यांनी खाल्लेली आणि घाणेरडी केलेली, अशी बिस्किटे खाऊन कसेबसे दिवस त्यांना कंठावे लागले. कैक प्रसंगी तर उंदीर, घुशी यांनाही मारून त्यांना खावे लागले. पाण्याचाही तुटवडा भासू लागला. आणि जे होते तेही फार दिवसांचे असल्यामुळे घाणेरडे आणि हिरवट पिवळट, असे झाले होते. त्यांनी आपल्याबरोबर आणिलेल्या 'प्रचंड पावलांच्या' मनुष्यांपैकी एक मेला. दुसरेही काही खलाशी मृत्युमुखी पडलेच. शेवटी शेवटी तर भुस्सा, दोरखंडातील कातड्याचा अंश, कातडी पट्टे किंवा जे खाणे शक्य वाटले ते खाऊन राहण्याचा प्रसंग आला! बहुतेकांचे धैर्य खचले. त्यांनी ईश्वराची करुणा भाकली. आणि खरोखरच ईश्वर त्यांच्या हाकेला धावून आला! त्यांना पुन्हा काही बेटे लागली आणि या बेटांवर मात्र त्यांना अन्नपाणी मनमुराद मिळाले. पुन्हा सर्वांच्या अंगात त्राण आला! या बेटावरील रानटी लोक मात्र अतिशयच चोरटे होते. म्हणून मॅगेलनने या बेटास 'लाड्रोन्स' म्हणजे 'चोरांची बेटे' हे नाव दिले.

स्पेन देश सोडून एकोणीस महिने होऊन गेले! लाड्रोन्स बेटाहून पश्चिमेकडे दहा दिवस प्रवास केल्यावर आमचे साहसी प्रवासी 'फिलीपाइन' द्वीपसमूहापैकी माल्हू बेटी आले. तेथील लोक त्यांच्याशी बऱ्या तऱ्हेने वागत असल्याचे आढळून आल्यामुळे या बेटावर काही दिवस विश्रांती घेण्याचे मॅगेलन याने ठरविले. खलाशांनी किती तरी दिवसांनी जमिनीवर एकदाचे पाय ठेवून तेथील किनाऱ्यावर त्यांनी तंबू ठोकले. तेथील लोकांनी त्यांना मासे, ताडी, निरा, केळी, नारळ इत्यादी खाण्यापिण्याचे पदार्थ भरपूर पुरविले. येथे दहा दिवस खाण्यापिण्यात आणि

मजेत घालवून पूर्ण विश्रांती घेतल्यावर सर्व खलाशी चांगलेच ताजेतवाने झाले. मॅगेलन् याने येथील लोकांना तांबड्या टोप्या, आरसे, फण्या, घंटा, हस्तिदंत इत्यादी वस्तु देऊन त्यांच्याकडून या वस्तूंचा मोबदला म्हणून, तांदूळ, फळे, कोंबडी, आणि इतर खाण्याला उपयुक्त असे पदार्थ घेतले. त्याने गलबतावर गोड्या पाण्याचा साठाही बराच करून घेतला. आणि तेथून तो निघाला. एकदोन दिवस प्रवास केल्यावर 'मासावा' नावाच्या बेटापाशी त्याची गलबते आली. या बेटावरील लोक प्रथम फार घाबरले. पण मॅगेलनच्या पदरी एक निग्रो जातीचा गुलाम होता; याला त्यांची भाषा येत होती. त्याने त्या लोकांची गाठ घेऊन आपण कोणी शत्रू नसून आपणास केवळ खाण्याचे पदार्थ तेवढेच विकत पाहिजेत अशी खात्री करून दिली. मॅगेलन् याने या बेटाच्या राजाला एक तांबडया-पिवळ्या रंगाच्या कापडाचा झगा आणि एक सुंदर तांबडी टोपी या वस्तू भेट म्हणून दिल्या. आपण भाऊ भाऊ व्हावे, अशीच आपली इच्छा असल्याचेही त्याने राजास कळविले. राजाही म्हणाला "आपण भाऊ भाऊ होऊ या," आणि ते मित्र झाले. राजा मॅगेलनच्या भेटीला आला. परत जाताना त्याने आपल्याबरोबर मॅगेलनच्या काही अधिकारी लोकांना घेतले. येथील लोक आपली घरे झाडावर बांधून राहतात, आणि त्यांना शिडीने घरात चढून जावे लागते, असे मॅगेलनच्या लोकांना दिसून आले. या बेटात सोन्याच्या खाणी असून राजाची सर्व भांडी (ताट, वाट्या, पाणी प्यावयाचे पेले इत्यादी) सोन्याचीच केलेली होती. त्यांची शस्त्रास्त्रेसुद्धा सोन्याच्या मुठीची होती. या बेटावर एक आठवडा घालविल्यावर मॅगेलन् तेथून पुढे जाण्याकरिता निघाला. त्याला 'सेबू' नावाच्या बेटाकडे जावयाचे होते. कारण त्या बेटावर मुबलक अन्न मिळेल असे मासावा बेटाच्या राजाने सांगितले होते. सेबूच्या जवळ जवळ गेल्यावर मॅगेलन् याने आपले निशाण फडकवि-

ण्यास आणि सर्व तोफा उडविण्यास खलाशांना सांगितले. त्यामुळे येथील लोक घाबरलेले दिसले. पण 'केवळ अन्नपाणी घेण्याकरिता आपण आलो आहोत' असे त्यांना मॅगेलनने कळविले. मासावाच्या राजाचीही



मध्यस्थी यांना उपयोगी पडली. त्यामुळे मॅगेलनला तांदूळ, डुकरे, शेळ्या कोंबडी इत्यादी वस्तू मिळाल्या. मॅगेलनने एका चांदीच्या ताटात रेशमी झगा, टोपी आरसे अशा काही वस्तू ठेवून त्या आपल्या एका

जासुदाबरोबर तेथील राजाकडे भेटीदाखल पाठविल्या. हा राजा आपल्या राजवाड्यात ताडामाडाच्या पानांनी विणलेल्या चटईवर बसला होता. याच्याही कमरेभोवतीच काय ते वस्त्र गुंडाळलेले होते. डोक्याला एक रेशमी फडके बांधले होते. चेहरा रंगविण्यात आला होता; गळ्यातून एक भली मोठी सोन्याची माळ लोंबत होती आणि कानात मोठमोठ्या भिकबाळ्या लटकविल्या होत्या. राजा जवळच ठेविलेल्या एका चिनी-मातीच्या तसराळ्यातून कासवांची अंडी खात होता, आणि सोन्याच्या सुरईतून ताडी, माडी किंवा निरा यासारखी पेये बांबूच्या नळीने ओढून घेत ती तो मधून मधून पीत होता काही वेळ जासुदाबरोबर संभाषण झाल्यावर राजाने आपल्या बेटावरील लोकांशी व्यापार करण्याची परवानगी मॅगेलन् यास दिली. तेव्हा त्याने एक छोटीशी वखारच एका झोपडीत उघडली. आणि लोखंड, कापड या वस्तू देऊन त्यांच्या मोबदला, सोने, तांदूळ, शेळ्या मेंढ्या, डुकरे इत्यादी वस्तू घेण्यास त्याने सुरुवात केली. मॅगेलन् याने तीन आठवडे या बेटावर घालविले. एवढ्या अवधीत त्याने राजाला खूप करून त्याला स्पेनच्या राजाचे स्वामित्वही पत्करा-वयास लाविले. त्याचप्रमाणे ख्रिस्ती धर्माचीही ओळख तेथील राजाला, त्याच्या राणीला आणि इतर लोकांना त्याने करून दिली. तेव्हा त्या सर्व लोकांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारला. मासावा बेटावरील राजाने आणि काही लोकांनीही ख्रिस्ती धर्म स्वीकारला होताच.

मॅगेलनच्या मनात इतर बेटांवरील लोकांच्यावरही स्पेनच्या राजाचे स्वामित्व प्रस्थापित करावे असे होते. या कामी सेबूच्या राजाची मदत त्याने मिळविली आणि याबद्दल त्याला या भागातील सर्व बेटांवरील राजावर प्रमुख नेमण्याचे मॅगेलनने कबूल केले. सेबूच्या जवळच्या ' मॅक्लन ' नावाच्या एका बेटावरील राजाने स्पेनच्या राजाचे स्वामित्व मान्य करण्याचे साफ नाकारल्यामुळे मॅगेलन् हा केवळ तीन होड्यांनिशी


त्या बेटावर स्वारी करण्याकरिता गेला. त्याच्या जवळ सारे साठ लोक होते. पण ते सशस्त्र आणि चिलखत व शिरस्त्राण यांनी सज्ज असे होते. बेटावर १५०० लोक होते. त्यांनी मोठ्या शौर्याने मॅगेलनच्या लोकांशी तोंड दिले. या हल्ल्यात खुद्द मॅगेलन् याच्या पायात एक विषारी बाण घुसला. तेव्हा मॅगेलन् याने आपल्या लोकांना आपआपल्या होड्यांकडे परत जाण्याचा हुकूम सोडिला. पण स्वतः भाल्याच्या एका फेकीने शत्रूकडील एका मनुष्यास ठार केले. आणि तलवार उपसून जिवावर उदार होऊन वाट काढीत तो आपल्या नावांकडे परत जाणार होता; इतक्यात त्याच्या हातातील तलवार गळून पडली. शत्रूकडील लोकांच्या ध्यानात ही गोष्ट येताच ते सर्व धावतच आले आणि त्याला त्यांनी खाली पाडून भोसकून ठार केले. मॅगेलनचे आणखी आठ लोक या हल्ल्यात कामास आले होते; आणि बाकीच्या बहुतेकांना थोड्याफार जखमा झाल्या होत्या. मॅगेलनचे हे कृत्य म्हणजे एक प्रकारचा त्याच्याकडून झालेला अति प्रसंगच ! कारण त्याने जर सरळ प्रवास केला असता, तर त्याच्याकडूनच पृथ्वीची पहिली प्रदक्षिणा पूर्ण तर झाली असतीच; शिवाय सर्व जगभर त्याचा त्या वेळी नावलौकिकही झाला असता; आणि त्याच्याकडून त्यानंतर अनेकवार पृथ्वीप्रदक्षिणाही झाल्या असत्या.

मॅगेलनच्या मरणानंतर त्याच्या बरोबरच्या लोकांवर एक प्रकारची आपत्तीच कोसळली. तथापि त्यांनी आपणांतूनच एक प्रमुख निवडला आणि त्याच्या अनुमतीने ते पुढच्या प्रवासास लागले. मॅगेलनबरोबर जो एक निग्रो गुलाम होता त्याला हा दुसरा नायक मान्य नव्हता, म्हणून त्याने सेबू बेटावरच राहावयाचे ठरविले. त्याच्या मनातून ती तीन गलबतेही पुढे जाऊ द्यावयाची नव्हती. म्हणून सेबूच्या राजाला बरेच चिथावून ती गलबते स्वतःच्या ताब्यात घेण्याबद्दल त्याने त्याचे मन वळविले. राजाने खलाशांच्या नव्या नायकाला येऊन भेटण्याबद्दल

आणि स्पेनच्या राजाला मौल्यवान् हिरे-रत्ने यांचा नजराणा घेऊन जाण्याबद्दल मोठ्या आग्रहाने निरोप पाठविला. नवा नायक आपल्या काही अधिकारी लोकांना घेऊन बेटावर गेला असेल नसेल, तोच त्या सर्वांना ठार करण्यात आले, ही बातमी गलबतावरील लोकांना, या मारण्यात आलेल्या लोकांच्या आक्रोशामुळे आणि किंकाळ्यांमुळे तेव्हाच कळली. पण गलबतावरील लोकांचा काहीच उपाय चालण्यासारखा नव्हता; म्हणून जास्त भानगडीत न पडता ते तेथून गलबतांसहित पुढे निसटले.

पुन्हा राहिलेल्या खलाशांनी ' डेल् कॅनो ' नावाच्या मॅगेलनच्या मुख्य मदतनिसांपैकीच एकाला मुख्य करून ते तावडतोब पुढच्या प्रवासास लागले. पण आता त्यांच्याजवळच्या तीन गलबतांवर मिळून सुद्धा ती तिन्ही गलबते नीटपणे चालविण्यास पुरेशी माणसे नव्हती. म्हणून सेबू बेटापासून काही अंतरावर गेल्यावर कन्सेप्शन गलबतावरील सर्व सामग्री आणि माणसे दुसऱ्या दोन गलबतांवर चढविण्यात आली; आणि रिकामे केलेले गलबत जाळण्यात आले. सर्वांनाच आता स्वदेश केव्हा एकदा गाठू असे झाले होते, म्हणून ते थेट स्पेन देशाचीच वाट धरणार होते. पण ज्या मसाल्याच्या बेटांकरिता एवढा लांबचा प्रवास, अनेक हालअपेष्टा सोसून करण्यात आला, ती ' मोलुक्का ' बेटे जवळच असल्याचे त्यांना कळाल्यामुळे ते त्या बेटांच्या अनुरोधाने निघाले. वाटेत त्यांना इतर लहानमोठी बेटे लागली. पण कोणत्याही बेटावर न उतरता केवळ अन्नपाणी यांचा पुरवठा करीत ते एकदांचे स्पेन देश सोडून २७ महिने झाल्यानंतर मसाल्याच्या बेटांपैकी ' बोर्निओ ' बेटास येऊन पोहोचले.


या मसाल्याच्या बेटांवरील लोक आणि राजेही या लोकांशी मोठ्या सलोख्याने वागले. त्यांनी या अति लांबच्या प्रवासाने त्रासलेल्या लोकांस सर्व प्रकारची मदत केली. ' मोलुक्का ' बेटावर काही दिवस विश्रांति घेतल्या-




फर्डिनंड मॅगेलन याने
पृथ्वीप्रदक्षिणेकरिता आक्रमिलेला जलमार्ग

नंतर त्यांनी आपली गलबते लवंगांच्या पोत्यांनी भरगच्चच भरून टाकिली. आणि आज निघणार तो एक गलबत अगदी नादुरुस्त झाले असल्याचे त्यांना आढळून आले. तेव्हा नाइलाज होऊन ते गलवत आणि त्यावरील लोक यांना तेथेच राहावे लागले. निघतांना पाच गलबते होती. आता त्यांपैकी एकच धड असे शिल्लक राहिलेले व्हिक्टोरिया गलबत स्पेन देशास जाण्यास निघाले. या गलबताला आल्या वाटेने आता परत जावयाचे नव्हते. तर निघताना ज्या दिशेने ते निघाले त्या पश्चिम दिशेनेच त्याला पुढे जावयाचे होते. पश्चिमेकडे प्रवास करीत करीत मसाल्याच्या बेटांना जाता आले; या गोष्टीवरून पृथ्वी वाटोळी आहे, ही गृहीत धरलेली गोष्ट आता जवळ जवळ सिद्ध झाल्यासारखीच झाली. त्यांच्या गलबताचे तोंड आताही पश्चिमेकडेच होते. या गलबताला आता हिंदी महासागर ओलांडून जावयाचा होता. हिंदी महासागर ओलांडून ते गलवत थेट आफ्रिकेच्या दक्षिण किनाऱ्याजवळ आले. त्या वेळी वारा उलटया दिशेने वाहत असल्यामुळे 'केप् ऑफ् गुड् होप्' या भूशिरास वळसा घालावयास जवळ जवळ नऊ आठवडे लागले. आता त्यांच्या जवळचे अन्न पुन्हा संपुष्टात आले. त्यामुळे शेवटचे दोन महिने तर त्यांना अर्धपोटी राहावे लागले. सरते शेवटी इ. स. १५२२ या साली सप्टेंबर महिन्यात म्हणजे तीन वर्षांनी निघताना जे २७० खलाशी होते, त्यांपैकी सारे १८ खलाशी पृथ्वीची पहिली प्रदक्षिणा पूर्ण करून परत आले!

त्या वेळच्या मानवांच्या इतिहासातील ही एक अपूर्वच गोष्ट होय! 5 शिडावर चालणाऱ्या १००-१२५ टन वजनाच्या चिमुकल्या गलबतात बसून, अनेक अज्ञान आणि म्हणूनच अनपेक्षित अशा संकटांनी भरलेले महासागर ओलांडून, कधी भयंकर तुफानी वादळांना निर्भयपणे टक्कर देत, तर कधी भयाण, भीषण, उष्ण आणि दमट अशा निर्वात प्रदेशातून धिम्मेपणाने वाट काढीत, दोन दोन तीन तीन महिने उपासमार



फर्डिनंड मॅगेलन याने
पृथ्वीप्रदक्षिणेकरिता आक्रमिलेला जलमार्ग

नंतर त्यांनी आपली गलबते लवंगांच्या पोत्यांनी भरगच्च भरून टाकिली. आणि आज निघणार तो एक गलबत अगदी नादुरुस्त झाले असल्याचे त्यांना आढळून आले. तेव्हा नाइलाज होऊन ते गलबत आणि त्यावरील लोक यांना तेथेच राहावे लागले. निघतांना पाच गलबते होती. आता त्यांपैकी एकच धड असे शिल्लक राहिलेले व्हिक्टोरिया गलबत स्पेन देशास जाण्यास निघाले. या गलबताला आल्या वाटेने आता परत जावयाचे नव्हते. तर निघताना ज्या दिशेने ते निघाले त्या पश्चिम दिशेनेच त्याला पुढे जावयाचे होते. पश्चिमेकडे प्रवास करीत करीत मसाल्याच्या बेटांना जाता आले; या गोष्टीवरून पृथ्वी वाटोळी आहे, ही गृहीत धरलेली गोष्ट आता जवळ जवळ सिद्ध झाल्यासारखीच झाली. त्यांच्या गलबताचे तोंड आताही पश्चिमेकडेच होते. या गलबताला आता हिंदी महासागर ओलांडून जावयाचा होता. हिंदी महासागर ओलांडून ते गलबत थेट आफ्रिकेच्या दक्षिण किनाऱ्याजवळ आले. त्या वेळी वारा उलटया दिशेने वाहत असल्यामुळे ' केप् ऑफ् गुड् होप् ' या भूशिरास वळसा घालावयास जवळ जवळ नऊ आठवडे लागले. आता त्यांच्या जवळचे अन्न पुन्हा संपुष्टात आले. त्यामुळे शेवटचे दोन महिने तर त्यांना अर्धपोटी राहावे लागले. सरते शेवटी इ. स. १५२२ या साली सप्टेंबर महिन्यात म्हणजे तीन वर्षांनी निघताना जे २७० खलाशी होते, त्यांपैकी सारे १८ खलाशी पृथ्वीची पहिली प्रदक्षिणा पूर्ण करून परत आले !

त्या वेळच्या मानवांच्या इतिहासातील ही एक अपूर्वच गोष्ट होय ! शिडावर चालणाऱ्या १००-१२५ टन वजनाच्या चिमुकल्या गलबतात बसून, अनेक अज्ञात आणि म्हणूनच अनपेक्षित अशा संकटांनी भरलेले महासागर ओलांडून, कधी भयंकर तुफानी वादळांना निर्भयपणे टक्कर देत, तर कधी भयाण, भीषण, उष्ण आणि दमट अशा निर्वात प्रदेशातून धिम्मेपणाने वाट काढीत, दोन दोन तीन तीन महिने उपासमार

करण्याची पाळी आल्यामुळे स्वतःच्याच गलबतांवरील बंडखोर लोकांशी वेळी कठोर आणि निष्ठुर होऊन, वाटेत नवीन नवीन शोध लाविलेल्या बेटांतील अगर भूखंडाच्या किनाऱ्यावर राहणाऱ्या नग्न अथवा अर्धनग्न स्थितीतील रानटी लोकांची कधी मैत्री तर कधी वैर संपादून, फिलिपाइन बेटांपर्यंत मॅगेलन् याने खरोखरच मोठ्या अलौकिक धैर्याने अपूर्व असा हा प्रवास केला, यात मुळीच शंका नाही. या ठिकाणीच त्याला जवळच पश्चिमेस मसाल्याची बेटे असल्याची खात्रीपूर्वक माहितीही लागली होती. तेव्हा मनात योजिलेले एकच कार्य तडीस नेण्याचे त्याने केले असते, तर पृथ्वी ही वाटोळी आहे, हे प्रत्यक्ष सिद्ध करण्याचे अपूर्व श्रेय जे डेल् कॅनो याला मिळाले, ते त्यासच मिळाले असते. पण साम्राज्य वाढविण्याची महत्त्वाकांक्षा आणि धर्मप्रसाराची अनावर इच्छा एकदम त्याच्या मनात उत्पन्न झाल्यामुळे त्याच्यावर आणि त्याच्यामुळे इतर खलाशांवर प्राण-हानीचा प्रसंग विनाकारण गुदरला. तो स्वतःच मसाल्याच्या बेटांपर्यंत आला असता, तर पुढचा प्रवास जो उरलेल्या खलाशांना अति त्रासदायक असा झाला, तो मुळीच त्रासदायक झाला नसता. कारण त्याने एक दोन वेळा मसाल्याच्या बेटांपर्यंत पूर्वेकडील मार्गाने प्रवास केला होताच.

असो. भूगोलाच्या दृष्टीने या प्रवासाचे महत्त्व मात्र विशेष म्हणजे विशेषच आहे. पृथ्वी वाटोळी असल्याची गोष्ट आता केवळ अनुमानावर न राहता प्रत्यक्ष अनुभवाने ती सिद्ध झाली, व्यक्तीच्या दृष्टीने पाहता मॅगेलन् मात्र विनाकारण मृत्युमुखी पडला, असेच म्हणणे भाग आहे. किंवा शूर आणि धाडसी लोकांना असेच मरण येणे एका प्रकारे बरे नाही का ?

BVBK-0400951

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
दा. क्र. ९५९ दिनांक ....
किशोर क्र. ४४६

| | | | |
|---|---|---|---|
| | | Deposit | 42,500. |
| | | Land Revenue | 19.00 |
| | | Audit Fee | 280.00 |
| | | Mah. Rajya Sahakari Federation's Education Fund | 140.00 |
| | | <u>Closing Balance</u> | |
| | | Cash | 38.75 |
| | | Bank | 8,122.56 |
| TOTAL | 64,928.31 | TOTAL | 64.928.31 |

For The Dhanashree Co-operative Housing
Society Ltd., Thane-2

TREASURER SECRETARY